रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक २४२ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. ९ फेब्रुवारी २०२६

किंमत ४ ₹


## बेकायदेशीररीत्या गोवंशाची कत्तल

**म्हसळा:** तालुक्यातील वरवठणे येथे घरातच बेकायदेशीररीत्या गोवंशाची कत्तल सुरू असताना म्हसळा पोलिसांनी रविवारी (दि.८) धडक कारवाई केली. सकाळच्या सुमारास टाकलेल्या या छाप्यात पोलिसांनी ७० किलो गोवंश मांस, वाहने आणि कत्तलीसाठी वापरलेली हत्यारे असा एकूण १ लाख ३५ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यातील एक आरोपी पोलिसांना धक्काबुक्की करून पळून जाण्यात यशस्वी झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पान २ वर

## निवृत्त अधिकाऱ्याच्या निवासस्थानी छापा

**अमरावती:** आंध्र प्रदेशात एका निवृत्त अधिकाऱ्याच्या निवासस्थानी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने छापा टाकला. यावेळी कल्लेपल्ली श्रीनिवास राव यांच्या घरासह वेगवेगळ्या ठिकाणी एसीबीने छापा टाकला. त्यात ५० कोटी रुपयांपेक्षा जास्त बेहिशोबी मालमत्ता आढळून आली आहे. प्राथमिक तपासात कल्लेपल्ली यांच्याकडे आढळलेली मालमत्ता ही त्यांच्या अधिकृत उत्पन्नाच्या स्रोतापेक्षा कित्येक पटींनी जास्त असल्याचे समोर आले आहे. श्रीनिवास हे पंचायत राज विभागात कार्यरत होते. ३१ डिसेंबर रोजी ते विशाखापट्टनममधून अधीक्षक अभियंता म्हणून निवृत्त झाले होते.

# आज निकाल

## मतदारांचा कौल कोणाच्या बाजूने? कार्यकर्त्यांची उत्सुकता शिगेला

### अलिबागमधील ६३ उमेदवारांचे भवितव्य पेटीत

अलिबाग तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ७ आणि पंचायत समितीच्या १४ जागांसाठी शनिवारी निवडणूक प्रक्रिया पार पडल्या. यावेळी जिल्हा परिषदेसाठी २१, तर पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी ४२ उमेदवार असे एकूण ६३ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे मतदारांनी इव्हीएम मशीनमध्ये बंद केलेला आपला कौल आज जगजाहिर होणार आहे. त्यामुळे या ६३ उमेदवारांचे भवितव्य मतदारांच्या मर्जीने ठरणार आहे.

**अलिबाग** — स्त्री मतदानः ७४ हजार ९६१; पुरुष मतदानः ७६ हजार ८१४; एकूणः १ लाख ५१ हजार ७८३

**पनवेल** — स्त्री मतदानः ९५ हजार ६३८; पुरुष मतदानः १ लाख हजार १६१; इतरः १; एकूणः १ लाख ९५ हजार ८००

**कर्जत** — स्त्री मतदानः ६३ हजार १७५; पुरुष मतदानः ६६ हजार ७७६; एकूणः १ लाख ३० हजार ७५१

**खालापूर** — स्त्री मतदानः ४१ हजार ९७; पुरुष मतदानः ४३ हजार २०९; इतरः २; एकूणः ८४ हजार ३०८

**सुधागड** — स्त्री मतदानः १७ हजार १९४; पुरुष मतदानः १८ हजार ५३१; एकूणः ३५ हजार ७२५

**पेण** — स्त्री मतदानः ५१ हजार ७०; पुरुष मतदानः ५४ हजार ८३; एकूणः १ लाख ५ हजार १५३

**उरण** — स्त्री मतदानः ४१ हजार ८५४; पुरुष मतदानः ४१ हजार २०४; इतरः १; एकूणः ८३ हजार ५९

**मुरुड** — स्त्री मतदानः २० हजार १८७; पुरुष मतदानः १९ हजार ५०२; एकूणः ३९ हजार ६८९

**रोहा** — स्त्री मतदानः ४२ हजार ३०१; पुरुष मतदानः ४५ हजार ४६७; एकूणः ८७ हजार ७६८

**तळा** — स्त्री मतदानः ८ हजार ६६; पुरुष मतदानः ८ हजार ५८२; एकूणः १६ हजार ६४८

**माणगाव** — स्त्री मतदानः ४१ हजार ४०७; पुरुष मतदानः ४४ हजार २१; एकूणः ८५ हजार ४२४

**म्हसळा** — स्त्री मतदानः ११ हजार ६२४; पुरुष मतदानः १० हजार ७३४; एकूणः २२ हजार ३५८

**श्रीवर्धन** — स्त्री मतदानः १६ हजार ७३४; पुरुष मतदानः १४ हजार ८७९; एकूणः ३१ हजार ६१३

**महाड** — स्त्री मतदानः ४५ हजार ५०८; पुरुष मतदानः ४८ हजार ३६; एकूणः ९३ हजार ५४४

**पोलादपूर** — स्त्री मतदानः ११ हजार ८८३; पुरुष मतदानः १२ हजार ८९७; एकूणः २४ हजार ७८०




**जिल्ह्यात ११ लाख ८८ हजार ८०४ मतदारांनी बजावला हक्क**

### ही लढत चुरशीची की एकतर्फी?

जिल्हा परिषदेच्या ५९ आणि पंचायत समितीच्या ११८ सदस्यपदांच्या जागांसाठी निवडणूक पार पडील. काही जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या मतदार संघात दोन उमेदवार, तर काही मतदार संघात चार ते सहा उमेदवारांमध्ये लढत झाली. जिल्ह्यातील निम्म्याहून अधिक मतदार संघात पाचपेक्षा अधिक उमेदवार रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे काही ठिकाणी एकमेकांविरोधात चुरशीची, तर काही ठिकाणी एकतर्फी विजय होण्याची अपेक्षा वर्तविली जात आहे. त्यामुळे मतदारांचा कौल कोणाला मिळणार, हे चित्र आज स्पष्ट होणार आहे.

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

**जिल्हा परिषदेच्या ५९ आणि पंचायत समितीच्या ११८ जागांसाठी शनिवारी (दि.७) सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पडली. यावेळी १७ लाख मतदारांपैकी ११ लाख ८८ हजार ८०४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. आता वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांचे निकालाकडे लक्ष लागले आहे. सोमवारी (दि.९) सकाळी १० वाजता तालूका स्तरावर मतमोजणी होणार असून त्यानंतर चित्र स्पष्ट होणार आहे. निकाल प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी जिल्हा व पोलीस प्रशासनाकडून तयारी पूर्ण झाली आहे. अलिबागची मत मोजणी नेहुली येथील क्रिडा संकुलात होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.**



रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे मतदान शनिवारी उत्साहात व शांततेत पार पडले. सकाळी साडेसात वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली. सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत ६९.९१ टक्के मतदान झाले. यावेळी ६ लाख ४ हजार ८९६ पुरुष मतदारांनी मतदान केले. तर, ५ लाख ८३ हजार ९०४ महिला मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यामुळे महिलांपेक्षा २० हजार ९९२ पुरुष मतदारांनी अधिक मतदान केल्याची आकडेवारी समोर आली आहे. त्यामुळे अलिबाग तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्याचे आता निकालाकडे लक्ष लागून पान २ वर

# इलेक्शन ड्युटीवर आशा सेविकांची फरफट

## आरोग्य किट, मानधन न मिळाल्याने नाराजी

**| रायगड | प्रतिनिधी |**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इलेक्शन ड्युटीवर नियुक्त करण्यात आलेल्या आशा सेविकांमधून नाराजीचा सूर उमटू लागला आहे. जिल्ह्यात शनिवारी (दि.७) मतदान प्रक्रिया पार पडली. यावेळी मतदान बूथवर आशा सेविकांना आरोग्य किट उपलब्ध करून देण्यात आले नाही. तसेच, योग्य मानधन देखील देण्यात आले नसल्याचा आरोप संबंधित सेविकांनी केला आहे. या प्रकारामुळे आशा सेविकांची फरफट होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक प्रक्रिया शनिवारी पार पडली. यावेळी जिल्ह्यातील मतदान बुथवर आशा सेविकांचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, काही मतदान बुथवरील आशा सेविकांकडून आरोपांचा फेऱ्या झडताना दिसल्या. सकाळच्या सुमारास काही मतदान बूथवर आशा सेविकांसाठी आरोग्य किट उपलब्ध झाले नव्हते. काही ठिकाणी त्यांचे नाव आणि पद नोंदवलेले नव्हते; तसेच, इलेक्शन ड्युटीवर असूनही मानधन नाही, अशी तक्रारी नोंदवल्या गेल्या. दिवसभर बूथवर उपस्थित राहूनही कोणतीही स्पष्ट सूचना किंवा आर्थिक मोबदला मिळाला नसल्यामुळे सेविकांमध्ये संभ्रम आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. काही सेविकांनी सांगितले की, आमच्या समोर इतरांना मानधन वाटप झाले; मात्र, आम्हाला काहीच मिळाले नाही. आम्ही दिवसभर फक्त बसून राहायचे का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. निवडणुकीसारख्या जबाबदारीच्या कामात आरोग्य सेविकांची नियुक्ती केली जाते; मात्र त्यांना आवश्यक साहित्य व मानधन न मिळाल्यास कामावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकारामुळे आशा सेविकांची फरफट होत असल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने या तक्रारींची दखल घेऊन तातडीने चौकशी करून कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, निवडणूक प्रक्रियेदरम्यान कोणत्याही कर्मचाऱ्यांवर अन्याय होऊ नये आणि सर्वांना नियमानुसार मानधन व सुविधा मिळाव्यात, यासाठी प्रशासनाने स्पष्टता देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

## २ लाख ७० हजारांची फसवणूक

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

डेबिट कार्ड आणि क्रेडिट कार्ड मधून २ लाख ७० हजार ७७२ रुपयांची फसवणूक केल्याची घटना पनवेलमध्ये घडली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पनवेल येथील शरदचंद्र प्रधान यांना, रात्री गॅस कनेक्शन कट करण्यात येणार आहे, असा व्हाट्सअपवर मेसेज आला. त्यावेळी प्रधान यांनी पेमेंट केल्याचा मेसेज केला. मात्र, ते अपडेट झाले नसून ते पुन्हा अपडेट करावे लागेल, असे समोरच्याकडून सांगण्यात आले. त्यासाठी समोरूप व्हिडिओ कॉल आला आणि प्रधान यांच्या मुलीने अपडेट करण्याची प्रक्रिया केली. पान २ वर

## मतदानकेंद्रात नियमांचा खेळखंडोबा

### सुरक्षेवर थेट संशयाचा बॉम्ब

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीदरम्यान लोकशाहीच्या नियमांची उघडपणे पायमल्ली झाल्याचे चित्र समोर आले आहे. त्यामुळे निवडणूक यंत्रणा, पोलीस प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांच्या दुजाभावावर जनतेतून संताप व्यक्त होत आहे.

उरण तालुक्यात मतदानाच्या दिवशी वृत्तसंकलन करत असलेल्या पत्रकारांकडून पोलिसांनी आक्रमक पद्धतीने ओळखपत्रांची मागणी करत मतदानप्रक्रियेचेफोटोकाढण्यासमनाई केली. ओळखपत्र दाखवल्यानंतर त्यांच्याकडून दिलगिरी व्यक्त करण्यात आली. मात्र, पत्रकारांसाठी कडक नियम असताना लोकनेत्यांचे मतदानानंतरचे मतदान कक्षातील फोटोसमाजमाध्यमांवरव्हायरलझाले आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांसाठी आणि सत्ताधाऱ्यांसाठी वेग वेगळे नियम आहेत का, असा थेट सवाल उपस्थित करण्यात आला आहे. त्यातच राज्याचे आमदार भुमरे यांनी स्वतःच्या मुलाला मतदान केंद्रावर नेऊन त्याच्या बोटाला शाई लावल्याचे फोटो व्हायरल झाल्याची चर्चा आहे. त्यामुळे हा प्रकार म्हणजे निवडणूक आचारसंहितेची पायमल्ली असल्याचा आरोप होत आहे.

मतदानानंतर उरण-बोकडवीरा येथील सिडको प्रशिक्षण केंद्रातील स्ट्राँगरूम परिसरात रात्रीच्या अंधारात ९ ते १० व्यक्ती विना ओळखपत्र वावरत असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला. प्रशासनाकडून ते आमचेच पान २ वर

## एपस्टिन फाइल्सबाबत मोठा खुलासा

**नवी दिल्ली :** एपस्टिन फाइल्स प्रकाशित झाल्यानंतर जगभरात खळबळ उडाली आहे. अमेरिकेच्या न्याय विभागाने नुकतेच एपस्टिन फाइल्स ट्रान्सपरन्सी ॲक्ट अंतर्गत ३५ लाखांपेक्षा जास्त कागदपत्रे, ईमेल, पोलीस रिपोर्ट, फोटो आणि व्हिडीओ जारी केले आहेत. त्यात जेफ्री एपस्टिन आणि गिसलेन मॅक्सवेल यांच्याकडून चालवल्या जाणाऱ्या लैंगिक शोषणाच्या रॅकेटबाबत धक्कादायक गोष्टींचा खुलासा झाला आहे. या फाइल्समुळे फक्त अमेरिकाच नाही तर युरोप आणि इतर देशातील अनेक बड्या लोकांबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# बेडीसगावचा मतदार रात्रभर रांगेत

## रात्री आठपर्यंत बजावला मतदानाचा हक्क

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील बेडीसगाव येथील मतदार राजा रात्री सव्वाआठ वाजेपर्यंत मतदानाचा हक्क बजावताना दिसला. बेडीसगाव हे भौगोलिकदृष्ट्या दुर्गम भागात असल्यामुळे या ठिकाणी पोहोचेपर्यंत मतदारांची दमछाक होताना दिसली. त्यातच याठिकाणी एकच मतदान केंद्र असल्यामुळे मतदारांनी एकच गर्दी केली होती. त्यामुळे मतदारांना रात्रभर रांगेत उभे राहावे लागले. त्यामुळे त्यांच्यातून संताप देखील व्यक्त करण्यात आला.




कर्जत तालुक्यातील शेवटच्या टोकावर असलेल्या शेलू ग्रामपंचायत हद्दीतील बेडीसगाव येथे मतदानाचा प्रचंड उत्साह पाहायला मिळाला. मात्र, एकाच मतदान केंद्रामुळे मतदारांना रात्री सव्वाआठ वाजेपर्यंत रांगेत उभे राहावे लागले. बेडीसगाव हे भौगोलिकदृष्ट्या दुर्गम भागात असून या केंद्रावर एकूण १,१५९ मतदार आहेत. येथील वाड्या एकमेकांपासून दूर अंतरावर असल्याने आणि संपूर्ण गावांसाठी केवळ एकच मतदान केंद्र असल्याने शाळेच्या वाडीतील केंद्रावर सकाळपासूनच मतदारांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. दिवसभर सुरू असलेली ही गर्दी रात्री उशिरापर्यंत कायम होती. बेडीसगाव हा दुर्गम भाग असूनही या केंद्रावर ८२.३१ टक्के इतके विक्रमी मतदान झाले आहे. पान २ वर


# कोर्लई किल्ल्यावर पर्यटकांची गैरसोय

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

मुरूड तालुक्यातील पोर्तुगिजकालीन कोर्लई किल्ला पर्यटकांसाठी खास आकर्षण ठरत आहे. त्यामुळे पर्यटक मुरूड पर्यटनात कोर्लई किल्ला पाहण्यासाठी हमखास भेट देत असतात. परंतु, या किल्ल्यात होणाऱ्या प्रचंड गैरसोयींमुळे पर्यटक तसेच दुर्ग प्रेमींकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. या समस्यांकडे पुरातत्व खाते जाणिव पुर्वक दुर्लक्ष करत असल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे.

मुरूड तालुका पर्यटकांसाठी खास आकर्षण ठरत असून या तालुक्याला मिनी गोवा म्हणून संबोधले जाते. येथील निसर्गरम्य परिसर, सुंदर व स्वच्छ समुद्रकिनारा, तसेच लगतच फणसाड अभयारण्य असल्यामुळे पर्यटक या ठिकाणी भेटी देत असतात. तसेच, मुरूडच्या प्रवेशद्वारानजीकच साळावपासून दोन किमी अंतरावर असलेला पोतुगिजकालीन कोर्लई किल्ला हा सुद्धा पर्यटकांचे खास आकर्षण ठरत आहे. या किल्ल्याच्या तीनही बाजूस समुद्र असून त्या काळी पोतुगिजांना चौफेर तसेच समोरील आगरदंडा किल्ल्यावर नजर ठेवण्यास उपयुक्त असा होता. हा ऐतिहासिक पोर्तुगिज बनावटीचा किल्ला पहाण्यास नित्याने या ठिकाणी असंख्य पर्यटक येत असतात. परंतु, हा किल्ला विविध समस्यांच्या गर्तेत अडकला आहे. येथील असुविधांमुळे पर्यटकांमधून नाराजीचे सुर उमटत आहेत.

कोर्लई किल्ल्यात जाण्यासाठी मार्गफलकांचा अभाव असल्याने पर्यटकांना किल्ल्याकडे जाणारा रस्ता शोधावा लागतो. या किल्ल्यात जाण्यासाठी दोन मार्ग उपलब्ध आहेत. मात्र, याठिकाणी गाईड उपलब्ध पान २ वर



### पुरातत्व खात्याला निवेदन

कोर्लई किल्ल्यावरील गैरसोयींबाबत कोर्लईच्या सरपंच राजश्री मिसाळ यांनी पुरातत्व खात्यास लेखी निवेदन दिले आहे. त्यात किल्ल्यावर साफसफाई करीता कर्मचारीवर्ग वाढविणे, स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सोय तसेच किल्ल्याकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरूस्ती व मार्गफलक लावणे इत्यादींबाबत मागणी करण्यात आली आहे.

## ढाब्यावर आढळली मतदान यंत्रे

**मोहोळ :** तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी शनिवारी मतदान प्रक्रिया पार पडली. दरम्यान, मोहोळ शहराजवळील एका ढाब्यावर रात्री ११ वाजण्याच्या सुमारास दोन मतदान यंत्र आढळल्याने प्रचंड गोंधळ निर्माण झाला होता. याबाबतची माहिती राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील व काही सामाजिक कार्यकर्त्यांना मिळाल्यानंतर त्यांनी घटना स्थळावर ठिय्या मांडला. त्यानंतर मोहोळचे निवडणूक निर्णय अधिकारी व पोलीस यंत्रणा तातडीने घटना स्थळावर दाखल झाली. जिल्हाधिकारी घटना स्थळावर आल्याशिवाय उठणार नाही, असे सांगत कार्यकर्त्यांनी गोंधळ घातला होता. दरम्यान, प्रशासनाने ही मतदान यंत्रे राखीव असल्याचा दावा केला आहे.

**बचत गटाच्या महिलांच्या मेहनतीचे फळ | मशरूम उत्पादनाचा यशस्वी प्रयोग**

# चिरनेर गावातील शेतकऱ्यांना नवसंजीवनी

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यात येणाऱ्या नवनवीन प्रकल्पांमुळे शेती विकून झटपट पैसा मिळेल म्हणून तरुणांनी शेतीकडे दुर्लक्ष करून, शेतीची विक्री करण्याचा मार्ग अवलंबिला आहे. त्यातच वाढलेली महागाई, मजुरांची कमतरता, निसर्गाचा लहरीपणा, उत्पादनात शाश्वती नसणे या सर्व बाबींमुळे शेतीला दुय्यम स्थान देण्यात आले आहे. त्यामुळे शेतीला उतरती कळा लागली आहे. अशातच काही शेतकरी आणि त्यांना मार्गदर्शन करणारे कृषी अधिकारी आणि कृषी सहाय्यक अधिकारी यांनी शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करण्यास सुरुवात केली आहे. एकंदरीत त्यांचा हा प्रयोग चिरनेर गावातील शेतकऱ्यांना नवसंजीवनी देणारा ठरला आहे.



उरण तालुक्यातील कृषी अधिकारी अर्चना सुळनारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा अंबुलगेकर यांच्या विशेष पुढाकारातून आणि चिरनेरमधील बचत गटाच्या महिलांच्या मेहनतीतून मशरूमच्या शेतीचा प्रयोग यशस्वी करण्यात आला आहे. या अनुषंगाने आत्मा योजनेअंतर्गत महिलांना मशरूम उत्पादनासाठी आवश्यक साहित्य देऊन, मार्गदर्शन करण्यात आले. ही योजना केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात प्रयोगातून पान २ वर

> बचत गटाच्या महिलांनी केलेले काम पाहून मला वैयक्तिक पातळीवरही मोठे समाधान मिळाले आहे. रायगडच्या आत्म्याच्या प्रकल्प संचालक वंदना शिंदे यांनी केलेली विशेष मदत, तसेच कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा अंबुलगेकर यांनी बचत गटाच्या महिलांना प्रत्येक टप्प्यावर केलेले मार्गदर्शन व घेतलेले विशेष परिश्रम यामुळे हा महिलांना आर्थिक उत्पादनासाठी नवसंजीवनी देणारा प्रयोग यशस्वी झाला आहे. भविष्यातही अशाच प्रकारे त्या नवनवीन प्रयोग करत राहतील. आणि समाजाची प्रगती साधतील याची मला खात्री वाटते. हे काम ग्रामीण विकासासाठी प्रेरणादायी आहे.
>
> – अर्चना सुळ नारनवर, कृषी अधिकारी, उरण

> हा प्रयोग करण्यासाठी मोठे चॅलेंज होते. अडचणी होत्या, पण केवळ शेतकऱ्यांची प्रगती साधण्यासाठी, मी एक कृषी सहाय्यक अधिकारी म्हणून पुढाकार घेऊन, या मशरूमचे उत्पादन घेण्याचा निर्णय घेतला. हा प्रयोग २२ दिवसांचा आहे. शेतकऱ्यांकडे सहज उपलब्ध होणाऱ्या पेंढ्याच्या भुशाचा या मशरूमच्या प्रयोगासाठी वापर केला जातो. मधुमेय व हृदयविकार यासारख्या आजारांवर मशरूमची भाजी अत्यंत गुणकारी आहे. भाजी चविष्ट असून ती हेल्दी आहे. हा प्रयोग शेतकऱ्यांना नवसंजीवनी देणारा आहे.
>
> – सुषमा अंबुलगेकर, कृषी सहाय्यक अधिकारी

# खोट्या नामफलक धारकांची दहशत

**| रेवदंडा | विषेश प्रतिनिधी |**

अलिबाग ते वडखळ व अलिबाग ते रेवदंडा या मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणवर रहदारी सुरू असते. सुट्ट्यांच्या दिवशी तर या मार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असते. यादरम्यान, पोलीस व महाराष्ट्र शासनाचे नामफलक लावलेल्या दुचाकी व चारचाकी गाड्या वाहतूक कोंडी करून दमदाटी करताना दिसत आहेत.

प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, अशा प्रकारचे नामफलक असणाऱ्या गाड्या आडेमधे घुसवून वाहतुक रोखतात आणि इतर चालकांशी उद्धटपणे बोलून, अरेरावी करत धमक्या देतात. तसेच, काही ठिकाणी या नामफलकांचा गैरफायदा घेत अपव्यवहार करतात. तर, काही ठिकाणी अपघाताला देखील कारणीभुत ठरतात. नुकतीच नवी मुंबईत एक पान २ वर

> खोट्या पोलीस किंवा महाराष्ट्र शासन नामफलकांचा गैरवापर ही गंभीर बाब आहे. मोटार व्हेईकल कायद्यांतर्गत गाडी मालकीची तपासणी आणि चौकशी आवश्यक. आहे. त्यामुळे पोलिसांनी संबंधितांवर तातडीने कारवाई करावी, जेणेकरून जनतेचा विश्वास राखला जाईल
>
> – ॲड विनोद नाईक, सामाजिक कार्यकर्ते

# कोळीवाड्यांच्या सीमांकनाचा मार्ग मोकळा

## राज्य शासनाकडून विशेष समिती गठित



### तीन महिन्यांत अहवाल सादर करणार

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदींचा अभ्यास करून ही समिती आपला सविस्तर अहवाल पुढील तीन महिन्यांच्या मुदतीत शासनास सादर करणार आहे. या निर्णयामुळे कोळीवाड्यांना हक्काचे सीमांकन मिळणार असून, अतिक्रमण आणि विकासात्मक कामांमधील अडथळे दूर होण्यास मदत होणार आहे. महसूल व वन विभागाने २९ जानेवारी रोजी हा शासन निर्णय निर्गमित केला असून, यामुळे प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असलेला कोळीवाड्यांच्या सीमांचा प्रश्न आता सुटण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

**। रायगड । प्रतिनिधी ।**

पिढ्यान्‌पिढ्या वास्तव्यास असलेल्या कोळीबांधवांच्या कोळीवाड्यांची अधिकृत नोंद भूमी अभिलेख दप्तरी व्हावी, यासाठी कार्यपद्धती निश्चित करण्याकरिता राज्य शासनाने विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती गठित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे स्थानिक स्तरावरील सीमांकनाचे प्रश्न मार्गी लागण्यास मदत होणार आहे.

रायगड जिल्ह्याला २४० किलोमीटरपर्यंत किनारपट्टी लाभली असून, येथे अनेक पारंपरिक कोळीवाडे आहेत. त्यामध्ये मोरा, वरसोली, अलिबाग, मुरूड, एकदरा, जीवनाबंदर ही आकाराने मोठी व दाट लोकवस्तीची कोळीवाडे आहेत. वाढत्या लोकसंख्येने या कोळीवाड्यांना काही गंभीर समस्या जाणवू लागल्या आहेत. नव्या पिढीला येथील गावठाणात घरे बांधण्यासाठी जागाच शिल्लक राहिलेली नाही. समुद्राची कमाल भरती रेषेची मर्यादा, सीआरझेड यामुळे या अडचणी वाढतच जात आहेत. गावठाणांप्रमाणे या कोळीवाड्यांच्या सीमांची नोंद भूमी अभिलेख विभागात नसल्याने अनेक तांत्रिक अडचणी निर्माण होत होत्या. रायगडसह कोकण किनारपट्टीवरील कोळीवाड्यांचे सर्वेक्षण आणि सीमांकन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने अखेर एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

### समितीची मुख्य जबाबदारी व कार्यकक्षा

कोळीवाडे असणाऱ्या गावांची तालुकानिहाय यादी तयार करणे आणि भरतीची रेषा, मेरिटाइम बोर्डाची सीमा व कांदळवनांची सीमारेषा निश्चित करण्यासाठी जिल्हास्तरीय समिती स्थापन करणे. कोळीवाड्यांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण व सीमांकन कसे करावे, याची मार्गदर्शक तत्त्वे ठरवणे. जिल्हाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करून सीमांकनाचे काम वेळेत पूर्ण करण्यासाठी निश्चित वेळापत्रक तयार करणे.

> **कोळीवाड्यांची संख्या, तेथील घरांची आकडेवारी संकलित करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. यासंदर्भात जिल्हाधिकारी यांच्याच माध्यमातून प्रक्रिया राबवली जात आहे.**
>
> **– सुनील इंदलकर, जिल्हा भूमी अभिलेख अधीक्षक.**

# श्रीवर्धनमध्ये निकालाची उत्सुकता शिगेला



**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन तालुक्यात पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीसाठी मंगळवारी झालेली मतदान प्रक्रिया कोणताही अनुचित प्रकार न घडता शांततेत पार पडली. सकाळपासून मतदान केंद्रांवर मतदारांची वर्दळ दिसून आली. दुपारनंतर काही प्रमाणात मतदानाचा वेग वाढला असून अखेर तालुक्यात ५५.६३ टक्के मतदानाची नोंद झाली आहे. आता तालुक्याचे राजकीय भवितव्य ईव्हीएममध्ये बंद झाले असून सर्वांचे लक्ष निकालाकडे लागले आहे.

अधिकृत आकडेवारीनुसार श्रीवर्धन तालुक्यातील एकूण ५६,८२६ मतदारांपैकी ३१,६१३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये १४,८७९ पुरुष आणि १६,७३४ महिला मतदारांचा समावेश आहे. रायगड जिल्ह्यातील इतर तालुक्यांच्या तुलनेत श्रीवर्धनमधील मतदान सरासरीच्या आसपास असले, तरी अपेक्षेपेक्षा काहीसे कमीच राहिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या श्रीवर्धन तालुक्यात यंदा राजकीय लढत चांगलीच रंगली होती. पारंपरिक वर्चस्व असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला भाजप युतीसह शेतकरी कामगार पक्ष, काँग्रेस, शिवसेना (शिंदे गट), शिवसेना (ठाकरे गट) तसेच मनसे यांनी जोरदार आव्हान दिले. काही मतदारसंघांत बहुरंगी तर काही ठिकाणी थेट दुरंगी लढती पाहायला मिळाल्या.

विशेषतः काँग्रेस व शेकाप यांनी राष्ट्रवादीच्या मतपेढीला धक्का देण्याचा प्रयत्न केला, तर मनसे व अपक्षांची मते 'किंगमेकर' ठरण्याची शक्यता राजकीय विश्लेषकांकडून व्यक्त केली जात आहे. प्रचाराच्या काळात गावागावांत सभा, आरोप-प्रत्यारोप, विकासकामांचे दावे आणि सत्तेच्या गणितांवरून जोरदार चर्चा रंगली होती. पंचायत समिती व जिल्हा परिषद यांच्यावर वर्चस्व मिळवण्यासाठी सत्ताधारी व विरोधकांनी शेवटच्या क्षणापर्यंत मोर्चेबांधणी केली. सत्ताधारी गट सत्ता कायम ठेवणार की विरोधक मोठी उलथापालथ घडवणार? हा प्रश्न सध्या प्रत्येकाच्या ओठांवर आहे. महिला मतदान, तरुण मतदारांचा कल आणि स्थानिक प्रश्नांवर मतदारांनी दिलेला कौल कोणाच्या बाजूने गेला, हे आज जाहीर होणाऱ्या निकालातूनच स्पष्ट होणार आहे. तोपर्यंत श्रीवर्धन तालुक्यातील राजकीय वातावरण तापलेलेच राहणार आहे.

# कर्जतमध्ये बारा टेबलांवर मतमोजणी



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात शनिवारी (दि.७) मतदान झाले असून ईव्हीएममध्ये बंदिस्त झालेल्या मतांची मोजणी आज (दि.९) कर्जत येथील प्रशासकीय भवन येथे होणार आहे. कर्जत तालुक्यात पंचायत समितीचे १२ गण असून मतमोजणीसाठी १२ टेबल लावण्यात आले आहेत. त्या टेबलवर प्रत्येकी एका मशीनमधील मतमोजणी होणार असून त्यात गट आणि गण अशी मतमोजणी केली जाणार आहे. सर्वाधिक २३ बूथ नेरळ गणात असून त्या गणांची मतमोजणी सर्वात उशीरापर्यंत चालणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

कर्जत तालुक्यामध्ये अत्यंत चुरशीने पार पडलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी शनिवार मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. तालुक्यातील २२० मतदान केंद्रावर १ लाख ३० हजार १७५ मतदान झाले आहे. त्या ईव्हीएम मशीन सध्या कर्जत प्रशासकीय भवन येथील स्ट्राँग रूम मध्ये आहेत. आज (दि.९) मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे. सकाळी दहा वाजता मतमोजणी सुरू होणार असून मतमोजणी साठी १२ टेबल लावण्यात आले आहे. प्रत्येक टेबलवर १ ते १२ गण अशी मतमोजणी एकाचवेळी सुरू होणार आहे. ईव्हीएम मशीन मधील गट आणि गणांची मतमोजणी प्रक्रिया पूर्ण झाल्यावर त्या मतपेट्या पुन्हा स्ट्राँग रूममध्ये ठेवण्यात येतील आणि दुसऱ्या १२ मशीन मतमोजणी कक्षात आणल्या जातील. अशी प्रक्रिया सर्व मतमोजणी टेबलवर सुरू राहणार आहे. नेरळ गणामध्ये सर्वाधिक २३ बूथ असून तेथील मतमोजणी सर्वात उशीरा संपणार आहे. २२० मतदान केंद्रावरील मतमोजणी पूर्ण होण्यास साधारण दुपारचे दोन वाजण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### तगडा पोलीस बंदोबस्त

निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त तैनात केला आहे. महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांनीही आतापर्यंत आपली भूमिका चोख बजावली असून, आजच्या मतमोजणीसाठी विशेष पथके नियुक्त करण्यात आली आहेत. प्रशासकीय भवन परिसरात केवळ अधिकृत व्यक्तींनाच प्रवेश दिला जाणार असून, परिसरात पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात असणार आहे.

## विजयाची माळ कोणाच्या गळ्यात?

**चिरनेर :** उरण तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या गटासाठी व पंचायत समितीच्या गणांसाठी एकूण ३७ उमेदवारांनी निवडणूक लढविली. त्यांचे आज (दि.९) भवितव्य निश्चित होणार आहे. त्यामुळे त्याची उत्कंठा सर्वच राजकीय पक्षातील नेते आणि कार्यकर्त्यांना लागून राहिली आहे. एकंदरीत तालुक्यातील ४ जिल्हा परिषद संघात व ८ पंचायत समिती गणात मविआ विरुद्ध भाजप अशीच थेट लढत झाली आहे. मात्र, या निवडणुकीत मविआचे पारडे जड असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे विजयाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार, हे आज होणाऱ्या निकालानंतर स्पष्ट होणार आहे.



# 'आधी कर्तव्य, मगचं लग्न'


**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या रणधुमाळीत अनेकजण मतदानाचा हक्क बजावण्यास टाळाटाळ करत असताना घोडीवली गावातील एका नवरीने लोकशाहीवरील असलेली निष्ठा दाखवली. शनिवारी (दि.७) तिचा विवाह सोहळा असतानाही तिने लग्न मांडवात जाण्यापूर्वी मतदान केंद्रावर जाऊन आपला हक्क बजावला. त्यामुळे तिच्या या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत आहे. खालापूर तालुक्यातील ग्रामीण घोडीवली गावामधील वैष्णवी महादू पिंगळे हिचा विवाह ७ फेब्रुवारी रोजी ताकई येथे पार पडणार होता. घरात लग्नाची लगबग, पाहुण्यांची ये-जा आणि लग्नाचा मुहूर्त जवळ येत असतानाही वैष्णवी हिने हळदीच्या अंगाने मतदान केंद्र गाठत मतदान केले. या कृतीने उपस्थित कर्मचारी आणि ग्रामस्थ भारावून गेले.

## संभ्रमात टाकणारी मतदानाची टक्केवारी

**पोलादपूर :** तालुक्यातील उमेदवारांचे खर्चाचे कोट्यवधींचे आकडे आणि विजयाचे दावे हे मतदानाची अंतिम टक्केवारी पाहता संभ्रमात टाकणारे आहेत. बहिस्थ मतदारराजाने कोणासाठी मतदान केले हे आज (दि.९) मतमोजणीनंतर स्पष्ट होणार आहे. तालुक्यातील ६७ मतदान केंद्रांमध्ये शनिवारी ३९ हजार २४२ पैकी २४ हजार ७८० मतदान झाले आहे. हे केवळ ६३.१५ टक्के मतदान झाले. दरम्यान, राजकीय नेत्यांनी ताकद लावून व मित्र पक्षांची मदत घेऊन चारही पंचायत समिती गणांतील मतदारांचे संभाव्य डॅमेज कंट्रोल केल्याने तालुक्याचे राजकारण ढवळून निघाले होते.

# शिवछत्रपतींच्या ४२२ किल्ल्यांचा कलात्मक इतिहास एका चित्रात



**। कल्याण । वार्ताहर ।**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा, स्वराज्य संकल्पनेचा आणि देदीप्यमान नेतृत्वाचा अनोखा आविष्कार प्रो. डॉ. दिनेश गुप्ता यांनी आपल्या कलाकृतीतून साकारला आहे.

महाराजांनी जिंकलेल्या तब्बल ४२२ किल्ल्यांच्या नावांपासून त्यांनी शिवछत्रपती महाराजांचे एक अद्वितीय, आविष्कारक आणि ऐतिहासिक चित्र निर्माण केले असून, या कलाकृतीत इतिहास, कला आणि संशोधन यांचा प्रभावी संगम दिसून येतो.या प्रेरणादायी उपक्रमाची सुरुवात गेल्या वर्षी झाली, जेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित १२ ऐतिहासिक किल्ल्यांना युनेस्कोने 'जागतिक वारसा' दर्जा प्रदान केला.

या ऐतिहासिक घटनेने प्रेरित होऊन, महाराजांच्या पराक्रमाचे प्रतीक असलेले सर्व किल्ले एका चित्ररूपात साकारण्याचा संकल्प डॉ. गुप्ता यांनी केला.हे संपूर्ण पोर्ट्रेट साकारण्यासाठी त्यांना सलग दोन दिवस लागले. मात्र, या निर्मितीतील सर्वात आव्हानात्मक टप्पा म्हणजे ४२२ही किल्ल्यांवर केलेले सखोल संशोधन, त्यांची अचूक नावे, ऐतिहासिक संदर्भ आणि त्या सर्वांना महाराजांच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वात कलात्मकरीत्या गुंफण केली आहे.

भावी पिढीसाठी प्रेरणा या कलाकृतीचे खरे महत्त्व केवळ तिच्या कलात्मक सौंदर्यात नसून, ती भावी पिढीसाठी जिवंत इतिहास ठरते यात आहे. आजच्या पिढीला इतिहासाशी जोडण्यासाठी अशा सर्जनशील उपक्रमांची नितांत गरज आहे. ४२२ किल्ल्यांची नावे एका चित्रात एकत्र आणून, छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, प्रशासन कौशल्य आणि स्वराज्याची व्यापक दृष्टी एका नजरेत उलगडून दाखवण्याचे कार्य या कलाकृतीतून घडते.

# उरणमध्ये निकालाची प्रतिक्षा

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील जिल्हा परिषदच्या ४ व पंचायत समितीच्या ८ जागांसाठी शनिवारी (दि.७) मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. सकाळी ७ वाजल्यापासून मतदारांनी मोठ्या उत्साहात मतदानाचा हक्क बजावला. कोणतीही अनुचित घटना न घडता मतदान यशस्वीरीत्या पार पडले.

उरण तालुक्यात महाविकास आघाडी विरुद्ध भाजपा अशी सरळ लढत पाहायला मिळाली. सकाळपासूनच मतदान केंद्रांवर मतदारांची रांग लागलेली दिसत होती. विविध पक्षांच्या बूथवर पदाधिकारी व कार्यकर्त्यांची गर्दी लक्षवेधी होती. मतदान प्रक्रिया संपूर्ण दिवस सुरळीतपणे पार पडली. तालुक्यात कोणताही अनुचित प्रकार घडला नसल्याची माहिती उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलाणी यांनी दिली. पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

दरम्यान, सध्या तरी उरणमध्ये महाविकास आघाडीचे पारडे जड असल्याचे चित्र आहे. अनेक मतदारांनी उघडपणे भाजपा विरोधी वातावरण असल्याची कबुली दिली. गेल्या अनेक वर्षांत भाजपचे उमेदवार निवडून येऊनही अपेक्षित विकासात्मक कामे न झाल्याची खंत मतदार व्यक्त करीत आहेत. तालुक्यातील एकूण १२ जागांसाठी (जिल्हा परिषद ४, पंचायत समिती ८) ३६ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. १३५ मतदान केंद्रांवर एकूण १ लाख ८ हजार ५२० मतदार नोंदणीकृत होते. त्यामध्ये ५२,८७३ महिला, ५५,६४५ पुरुष व २ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, मतदानाची वेळ संपेपर्यंत उरण तालुक्यात सुमारे ७४.५४ टक्के मतदान झाले आहे.

सायंकाळी मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर १२ जागांसाठी ३६ उमेदवारांचे भवितव्य मतदान पेटीत बंद झाले. त्यात कोण बाजी मारतो, याचा फैसला आज (दि.९) दुपारपर्यंत स्पष्ट होणार असून तोपर्यंत सर्वांना निकालाची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

पान १ वरून

## मतदान केंद्रात नियमांचा खेळखंडोबा

कामगार असल्याचा खुलासा करण्यात आला. तरीदेखील त्यातील एकाही व्यक्तीकडे ओळखपत्र नसणे ही बाब धक्कादायक आहे. त्यामुळे स्ट्राँगरूमसारख्या अतिसंवेदनशील ठिकाणी विनाओळखपत्र, विनापरवाना आणि रात्रीच्या वेळी वास्तव्य करण्याची मुभा देणारे आदेश कोणी दिले? सुरक्षेशी खेळ करून लोकशाहीच्या मुळावर घाव घातला जात आहे का? असा संतप्त सवाल उमेदवार दीपक भोईर यांनी उपस्थित केला आहे. तसेच, या संपूर्ण प्रकरणाची सखोल, पारदर्शक आणि निर्भीड चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अन्यथा व निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास कायमचा उद्ध्वस्त होईल, असा इशारा दीपक भोईर यांनी दिला आहे.

## २ लाख ७० हजारांची फसवणूक

त्यावेळी व्हाट्सअपवर महानगर गॅसची डॉट एपीके फाईल पाठवण्यात आली. ती फाईल ओपन करून प्रधान यांना बारा रुपये पाठवण्यास सांगितले. त्यावेळी बँकेच्या क्रेडीट कार्डची माहिती मागितली. मात्र, पेमेंट डिकलाईन होत असल्याचे सांगून दुसऱ्या कार्डची देखील माहिती मागितली. त्यानंतर प्रधान यांनी डेबिट कार्डची माहिती समोरच्या व्यक्तीला दिली. त्यावेळी बँकेतून रक्कम जात असल्याचे मेसेज त्यांना आले. महानगर गॅसमध्ये अपडेट करण्याचे दाखवून २ लाख ७० हजार ७२२ रुपयांची फसवणूक केल्याचे शरदचंद्र प्रधान यांच्या लक्षात आले.

## कोर्लई किल्ल्यावर पर्यटकांची गैरसोय

नसल्याने किल्ल्यात प्रवेश कोठून करावा, असा प्रश्न पर्यटकांमध्ये निर्माण होतो. किल्ल्यात जाण्यासाठी पायरी मार्ग उपलब्ध आहे. मात्र, तो मार्ग नादुरूस्त असल्याने तो मार्ग अवघड बनला आहे, तर दुसऱ्या बाजूकडून जाताना झाडीझुडूपातून रस्ता शोधत पर्यटक व किल्लाप्रेमी मंडळींना मार्गक्रमण करावे लागते. त्यानंतर मार्गातील अडचणी दूर करत किल्ल्यात प्रवेश केल्यावर जिकडे तिकडे अवास्तव वाढलेले गवत, तसेच रानटी झाडीझुडपी त्रासदायक ठरतात. त्यामुळे किल्ल्यात फिरताना प्रचंड समस्या निर्माण होतात. गेल्या काही वर्षांपासून या किल्ल्यावरील बुरूज ढासळत आहे. मात्र, अद्यापी या बुरूजाचे संवर्धन करण्यात आलेले नाही. तसेच, कोर्लई किल्ल्यावर साफसफाई करीता एकच कर्मचारी असल्याने तेथे घाणीचे साम्राज्य देखील वाढले आहे. त्याचबरोबर या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची कमतरता आणि मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याने कोर्लई किल्ल्यावर येणारा पर्यटक व दुर्गप्रेमी निरूत्साही होत आहेत. यासर्व समस्यांकडे पुरातत्व खाते जाणिवपुर्वक दुर्लक्ष करत असल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे.

## खोट्या नामफलक धारकांची दहशत

घटना घडली. एका मद्यधुंद इनोव्हा कार चालकाने शनिवारी (दि.७) अनेक वाहनांना धडक दिली. त्या कारवर 'पोलीस' नावाचे नामफलक होते. तसेच, त्या कारमध्ये मुंबई पोलीस वरिष्ठ निरीक्षक अरुण बबन पोखरकर यांचे ओळखपत्र देखील आढळले. मात्र, त्या मद्यधुंद चालकाने त्या अधिकाऱ्याच्या नावाचा गैरफायदा घेतला का, याचा तपास पोलीस करत आहेत. त्यामुळे अशा घटना अलिबाग तालुक्यातील महामार्गावर देखील घडण्याची शक्यता वर्तविली जात आहे. तसेच, रायगडचे वाहतूक शाखेचे उपप्रादेशिक कार्यालय अधिकारी अशा गाड्यांची मालकी तपासून चौकशी का करत नाहीत? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेमधून उमटत आहे. तसेच, खोट्या नाम फलकांनी महाराष्ट्र शासनाची फसवणूक केल्याबद्दल त्यांच्यावर कायदेशीर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी देखील करण्यात येत आहे.

## बेडीसगावचा मतदार रात्रभर रांगेत

यादरम्यान, तासनतास रांगेत उभे राहावे लागल्याने मतदार राजाने निवडणूक आयोगाच्या ढिसाळ नियोजनाबद्दल काहीशी नाराजी व्यक्त केली आहे. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून कर्जत उपविभागीय अधिकारी राहुल गायकवाड आणि नेरळ पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल वरोटे यांनी स्वतः केंद्राला भेट देऊन व्यवस्थेची पाहणी केली. कर्जतचे तहसीलदार धनंजय जाधव हे देखील या केंद्रावरील घडामोडींची वेळोवेळी माहिती घेत होते. दरम्यान, रात्री उशिरापर्यंत मतदान सुरू असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. अखेर रात्री ८ वाजता मतदानाची प्रक्रिया शांततेत पूर्ण झाली. यावेळी एकूण १,१५९ मतदारांपैकी ९५४ मतदारांनी आपला हक्क बजावला.

## चिरनेर गावातील शेतकऱ्यांना नवसंजीवनी

यशस्वी करून दाखविली आहे. याचे श्रेय अर्चना सुळ नारनवर व सुषमा अंबुलगेकर या कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांबरोबर चिरनेर येथील बचत गटाच्या सोनाली जाधव, अंजली चिर्लेकर, ज्योती म्हात्रे, सुकन्या रसाळ, नेहा फोफेरकर, निर्मला भोईर, प्रणिता मोकल, रेवती ठाकूर, बिंदिया म्हात्रे व कामिनी हातनोलकर या सहभागी महिलांना जाते. या महिलांनी दिलेल्या संधीचे सोने केले आहे. प्रशिक्षण, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी मशरूम उत्पादनात समाधानकारक यश मिळवले आहे. स्वकष्टातून त्यांनी आर्थिक उत्पन्नाचे साधन निर्माण केले आहे. हे त्यांच्या आत्मविश्वासाचे आणि कार्यक्षमतेचे उत्तम उदाहरण आहे. त्यांच्या कामातून स्वावलंबन, शिस्त आणि जबाबदारीची जाणीव स्पष्टपणे दिसून येते. या योजनेच्या यशामागे महिलांची सकारात्मक वृत्ती, शिकण्याची तयारी आणि त्यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न महत्त्वाचे ठरले आहेत.

## बेकायदेशीररीत्या गोवंशाची कत्तल

वरवठणे येथील नियाज महामुद तालीब याच्या राहत्या घरात गोवंशाची कत्तल सुरू असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे म्हसळ्याचे पोलीस शिपाई अक्षय पुरी आणि पथकाने घटनास्थळी छापा टाकला. याप्रकरणी नियाज महमुद तालीब (४२) व मेहफूज किफायती तालीब (२०) या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर, तिसरा व्यक्ती फरार झाला आहे.

## आज निकाल

राहिले आहे. बंद मशीनमध्ये असलेले ५०२ उमेदवारांचे भविष्य सोमवारी सकाळी १० वाजल्यापासून उजाडणार असून कोणाला किती मते मिळाली, हे स्पष्ट होणार आहे. यावेळी अलिबाग तालुक्यातील मत मोजणी नेहूली येथील क्रीडा संकूलमध्ये होणार आहे. सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरुवात होणार आहे. त्यात २० टेबल असून अकरा फेऱ्या आहेत. त्यासाठी कर्मचारी नेमणूक केली आहे. तसेच, मतमोजणीच्या ठिकाणी कोणताही गैरप्रकार घडू नये, तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी रायगड पोलिसांमार्फत बंदोबस्त ठेवला आहे.

## खारघरमध्ये सम-विषम पार्किंग सुरू करण्याची मागणी

**पनवेल :** खारघर सेक्टर २० परिसरातील अंतर्गत रस्त्यांवर होणाऱ्या बेकायदा व अस्ताव्यस्त वाहन पार्किंगमुळे नागरिकांना रोजच वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. दुचाकी व चारचाकी वाहने रस्त्याच्या दुतर्फा वळणांवर तसेच मोकळ्या जागी मनमानी पद्धतीने उभी केल्याने वाहतुकीस अडथळे निर्माण होत असून अपघातांचा धोका वाढला आहे. याचा फटका पादचारी, शालेय विद्यार्थी तसेच रुग्णवाहिका व अग्निशमन वाहनांसारख्या आपत्कालीन सेवांना बसत आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिका आयुक्तांकडे पत्र देऊन सेक्टर २० मधील प्रमुख अंतर्गत रस्त्यांवर तातडीने सम-विषम पार्किंग व्यवस्था लागू करण्याची मागणी केली आहे. आर्म अव्हेन्यू ते जलवायू फेज दोन, ट्विन्स टॉवर ते प्रिन्स टॉवर, शुभ होम टॉवर परिसर, साईसृष्टी सोसायटी मागील रस्ता व केशर गार्डनसमोरील रस्त्यावर ही व्यवस्था राबविल्यास वाहतूक सुरळीत होऊन नागरिकांची गैरसोय कमी होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# उमेदवारांकडून विकासकामांची अपेक्षा



**। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या रेवदंडा, चौल, नागाव, वरंडे मतदारसंघातील नागरिकांनी शनिवारी (दि.७) लोकशाहीचा उत्सव साजरा केला. या मतदानाने स्थानिक विकासाच्या दृष्टीने नवा अध्याय सुरू होण्याची आशा निर्माण झाली आहे. मतदारांनी निष्ठेने मतदान केले असले तरी निवडून आलेल्या उमेदवारांनी जनतेच्या भावनांशी खेळू नये, अशी ठाम मागणी होत आहे. तसेच, पैशाच्या लालसेपोटी टक्केवारीच्या मोहात पडून जनतेचे दुर्लक्ष करणारे राजकारणी आता नकोत, असा सूर रेवदंड्यातील प्रत्येक गल्लीत ऐकायला मिळाला. उमेदवारांनी उत्कृष्ट दर्जाची विकासकामे रस्ते, पाणी, शिक्षण, आरोग्य तात्काळ सुरू करावीत, अन्यथा पुढील निवडणुकीत जनतेचा विश्वासच हरवला जाईल. रेवदंडा-चौल भागात कायमस्वरूपी पाणीपुरवठा, दर्जेदार रस्ते व वीज योजना तातडीने कार्यान्वित करा. वाडीवाल्यांसाठी खते, बियाणे व बाजारव्यवस्था सुधारण्यासाठी ठोस पावले उचला. पर्यटन व मासेमारी क्षेत्राला चालना देण्यासाठी स्थानिकांना प्राधान्य द्या. या निवडणुकीने जनतेत जागृती निर्माण झाली असून, आता निवडून आलेल्यांना जबाबदारीची जाणीव होण्याची गरज आहे. रेवदंड्यातील मतदारांनी आपले कर्तव्य चोख पार पाडले आहे, आता निवडून आलेल्या उमेदवारांच्या कामांची वेळ, असे मत रेवदंडा ग्रामस्थांनी व्यक्त केले आहे.

## नि|व|ड|क

### मानसिक आजारातून आत्महत्या

**रेवदंडा** : अलिबाग तालुक्यातील वढाव बुद्रुक परिसरात एक दुर्दैवी व मन हेलावून टाकणारी घटना उघडकीस आली आहे. काही दिवसांपासून घरातून बेपत्ता असलेल्या तरुणाचा मृतदेह स्मशानभूमीच्या जवळ झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला असून, या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोक व खळबळ पसरली आहे.

मृत तरुणाचे नाव बुद्धेश कमलाकर नाईक (वय २०) असून तो फणसापूर आदिवासी वाडी, पो. बापळे, ता. अलिबाग येथील रहिवासी आहे. सध्या तो बामणगाव येथील वीटभट्टीवर वास्तव्यास होता.

या प्रकरणी मयताचा वडील कमलाकर वसंत नाईक (वय ४७) यांनी रेवदंडा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली होती. त्यांचा मुलगा दि. ३ फेब्रुवारी २०२६ पासून बेपत्ता होता. त्यानुसार रेवदंडा पोलीस ठाण्यात मनुष्य बेपत्ता नोंद क्र. ०१/२०२६ प्रमाणे नोंद करण्यात आली होती. त्यानंतर पोलीस व नातेवाईकांकडून बामणगाव व लगतच्या जंगल परिसरात शोधकार्य सुरू होते. दरम्यान, शुक्रवार (दि. ७ ) सकाळी सुमारे ८.३५ वाजता, वढाव बुद्रुक, पो. बामणगाव, ता. अलिबाग येथील स्मशानभूमीच्या परिसरात असलेल्या रांजणीच्या झाडाला, कमरेच्या कापडी पट्ट्याच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत बुद्धेशचा मृतदेह आढळून आला. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांकडून करण्यात आलेल्या प्राथमिक तपासात, संबंधित तरुणास मानसिक स्वरूपाचा आजार असल्याचे समोर आले असून, त्याच पार्श्वभूमीवर आत्महत्येचा निर्णय घेतल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. घटनास्थळी पंचनामा करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### नागोठणे गटात काटें की टक्कर

**नागोठणे :** रायगड जिल्हा परिषदेच्या पंचवार्षिक सार्वत्रिक निवडणुका संपूर्ण रायगड जिल्ह्यात ७ फेब्रुवारी रोजी पार पडल्या. रायगड जिल्हा परिषदेच्या निवडणुकीतील रोहा तालुक्यातील मतदान प्रक्रियेत रायगड जिल्हा परिषदेच्या रोहा तालुक्यातील चार गटात सर्वात जास्त मतदान नागोठणे जिल्हा परिषद गटात ७४.०३ टक्के एवढे झाले आहे. याचबरोबर रोहा पंचायत समितीच्या नागोठणे गणात ७१.६० टक्के आणि सुकेळी गणात ७६.४२ टक्के असे सर्वात जास्त मतदान नागोठणे विभागात झाल्याचे रोहा तालुका निवडणूक अधिकारी यांच्यामार्फत अधिकृतपणे प्रसिद्ध करण्यात आले आहे.

त्यामुळे नागोठणे जिल्हा परिषद मतदार संघात राष्ट्रवादी भाजपा युतीचे उमेदवार किशोरभाई जैन विरुद्ध दोन्ही शिवसेना, काँग्रेस व आरपीआय यांची परिवर्तन विकास आघाडीचे उमेदवार सुमित काते यांच्यात काटे की टक्कर झाल्याची चर्चा नागोठणे शहर व विभागात दिसून येत आहे. त्यामुळे राजकारणात मातब्बर असलेले राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपा युतीचे किशोर जैन आणि शिंदे शिवसेना व परिवर्तन विकास आघाडीचा नवीन तरुण चेहरा असलेला नवखा उमेदवार सुमित काते यांच्यात कोण बाजी मारणार याची जोरदार चर्चा नागोठणे शहर व विभागात आहे. तसेच रोहा पंचायत समितीच्या नागोठणे गणात युतीच्या समृद्धी कोळी व परिवर्तन विकास आघाडीच्या अंजली दुर्गावले यांच्यातील सरळ लढत तसेच सुकेळी गणातील युतीच्या योगिता शिद, आघाडीच्या अरुणा हंबीर व शेकापचे गुलाब वाघमारे यांच्यातील तिरंगी लढत लक्षवेधी ठरणार आहे. रोहा तालुक्यातील चार जिल्हा परिषद मतदार संघांपैकी उर्वरित तीन मतदार संघात ४० आंबेवाडी गटात ६४.५९ टक्के, ४१ भुवनेश्वर गटात ६४.१४ टक्के तर ४२ घोसाळे गटात ७०.०१ टक्के मतदान झाले आहे. जिल्हा परिषद निवडणुकीसाठी रोहा तालुक्यातील चार गटात एकूण ६८.१६ टक्के मतदान झाले आहे. तर रोहा पंचायत समितीच्या उर्वरित सहा गणात ७९ कोलाड ६०.२४ टक्के, ८० आंबेवाडी ६९.९२ टक्के, ८१ धाटाव ६७.६५ टक्के, ८२ भुवनेश्वर ६०.४७ टक्के, ८३ व्हावे ७४.४९ तर ८४ घोसाळे गणात ६५.४२ टक्के मतदान झाले आहे. रोहा पंचायत समितीसाठी एकूण मतदान ६८.१६ टक्के झाले आहे.

### कर्जत तालुक्यात ७६.६० टक्के

**नेरळ :** कर्जत तालुक्यात रायगड जिल्हा परिषदेचे सहा गट आणि कर्जत पंचायत समितीचे १२ गण यांच्यासाठी शांततेत मतदान झाले. तालुक्यातील सहा गट मध्ये सर्वाधिक मतदान माणगाव तर्फे वरेडी गटात झाले आहे.तर पंचायत समिती गणामध्ये सर्वाधिक मतदान वाकस गणात ८०.२६ टक्के आणि सर्वात कमी मतदान नेरळ गणात ६३.९३ टक्के एवढे झाले आहे. तालुक्यातील एक लाख ७० हजार ७०२ मतदार यांच्यापैकी एक लाख ३० हजार ७५१ मतदार यांनी मतदान केले.

कर्जत तालुक्यात काल सात फेब्रुवारी रोजी रायगड जिल्हा परिषदेचे सहा गट आणि कर्जत पंचायत समितीचे १२ गण यांच्यासाठी मतदान घेण्यात आले.तालुक्यात २२० मतदान केंद्रावर मतदान घेण्यात आले असून तेथे असलेले एक लाख ७० हजार ७०२ मतदार यांच्यापैकी एक लाख ३० हजार ७५१ मतदार यांनी मतदानाचा अधिकार बजावला. तालुक्यात जिल्हा परिषद गट निहाय सर्वाधिक मतदान माणगाव तर्फे वरेडी गटामध्ये २३०६८ एवढे नोंदवले गेले आहे.तालुक्यातील ९ कळंब जिल्हा परिषद गटात २८५९३ पैकी २२३३१ मतदान केले तर १० कशेळे गटामध्ये २८४३१ मतदार यांच्या पैकी २२०८१ मतदारांनी मतदान केले.११ माणगाव तर्फे वरेडी गटामध्ये २९७७७ पैकी २३०६८ मतदार यांनी मतदान झाले आहे.नेरळ जिल्हा परिषद गटात ३०६२७ मतदार यांच्यापैकी २०९४७ मतदार यांनी मतदान केले. कडाव जिल्हा परिषद गटात २६९४७ मतदार यांच्या पैकी २०९७४ मतदार यांनी आणि मोठे वेणगाव या गटातील २६४८५ मतदार यांच्या पैकी २१३५० मतदार यांनी मतदानाचा अधिकार बजावला. तालुक्यात एकूण एक लाख ७० हजार ७०२ मतदार असून त्यातील एक लाख ३० हजार ७५१ मतदारांनी म्हणजे ७६.६० टक्के एवढे मतदान केले आहे.

# ए भावा कुणाची हवा




- उमेदवारांसह कार्यकर्त्यांच्या जीवाची घालमेल
- घासून नाय ठासून येणार सोशल मिडिया व पारावर चर्चांना उधाण
- आज निकालाची उत्सुकता संपणार

**धम्मशील सावंत**
**| पाली /बेणसे |**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांची रणधुमाळी शनिवारी (दि. ७) संपली. मात्र मतदान झाल्यानंतर लगेच सर्वांनाच उत्सुकता लागली आहे ती निकालाची. सोमवारी (दि. ९) निकाल लागणार आहे. आपलाच उमेदवार कसा निवडून येणार याबाबत सोशल मीडिया व पारावर चर्चांना उधाण आले आहे. सोशल मीडियावर वाकयुद्ध सुरु झालेले दिसत आहे.

रायगड जिल्ह्यात सरासरी ७२ टक्के मतदान झाले. रायगड जिल्हा परिषदेच्या ५९ गटांतील १७३ उमेदवार आणि १५ पंचायत समित्यांमधील ३२९ उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएम मशीन मध्ये बंद झाले. निवडणुका झाल्यावर एक दिवसाच्या खंडानंतर निकाल आहे. मात्र निकालासाठी सर्वचजण आतुर आहेत. त्यामुळे अनेकजण निवडणुकीच्या रात्री तसेच रविवारी (दि. ८) दिवसभर व रात्री मतांची आकडेमोड करतांना दिसले.

अनेक उमेदवारांच्या राजकीय प्रतिष्ठा व अस्तित्वाची ही निवडणूक असल्याने दिग्गज उमेदवारांचे भवितव्य ठरविणाऱ्या या निकालाची उत्सुकता सर्वांनाच लागली आहे. एकूणच प्रचाराचा धुरळा खाली बसला आहे. आणि आता विजयाचा गुलाल उधळण्याची कार्यकर्त्यांनी जोरदार तयारी केली.

निवडणुकीची मदार कार्यकर्त्यांवर असते, त्यामुळेच प्रत्येक नेता कार्यकर्त्यांची मोठी फळी तयार करतो. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कार्यकर्त्यांशिवाय उमेदवारांचे पान हालत नाही. निवडणुकीची तारीख जाहीर झाल्यापासून उमेदवारांनी व पदाधिकाऱ्यांनी प्रचाराचे नियोजन केले आहे. त्यामध्ये कार्यकर्त्यांना अग्रस्थान होते प्रचार फेऱ्या, बैठका, पत्रके वाटणे, मतदारांच्या गाठीभेटी घेणे, छुपा प्रचार करणे या कामांत कार्यकर्ते व्यग्र होते. प्रमुख कार्यकर्त्यांची तर दमछाक झाली. त्यामुळे मतदान झाल्यानंतर त्यांनी निश्वास टाकला आहे. आता त्यांचे लक्ष निकालाकडे लागले आहे. काही कार्यकर्ते गावात, समाज मंदिर आणि पारावर तसेच पार्टी कार्यालयात जमून आपल्या उमेदवाराला किती मते मिळणार याचा अंदाज घेण्यासाठी आकडेमोड करीत होते.

काहींनी रविवारी (दि. ८) आराम करण्याचा निर्धार केला आहे. तर काही जण आपल्या कामाकडे व कुटुंबाकडे लक्ष पुरविणार आहेत. निखिल खैरे या कार्यकर्त्याने सांगितले की गेल्या अनेक दिवसांपासून प्रचारासाठी फिरत होतो. त्यामुळे जरा थकलो आहे मात्र अजूनही आराम नाही सध्या आमच्या उमेदवाराच्या निकालाची उत्सुकता आहे. आमचा उमेदवार निवडून येणार याची खात्री आहे. एकूणच काय तर निकलानंतरच सर्वजण सुटकेचा श्वास सोडणार हे नक्की.

#### हॉटेल व ढाब्यावर गर्दी


निवडणूक मतदान प्रक्रिया संपल्यावर शनिवारी (दि. ७) आणि रविवारी (दि.८) बहुतांश कार्यकर्त्यांनी रात्री हॉटेल व ढाब्यावर गर्दी केली होती. महामार्गांवरील हॉटेल व ढाबे रात्री फुल्ल होते. शिवाय गावखेड्यातील छोटे मोठे हॉटेल देखील कार्यकर्त्यांच्या गर्दीने भरली होती. यामुळे हॉटेल व ढाबे वाल्यांचा धंदा चांगला झाला. परतीचे मतदार देखील काही प्रमाणात येथे थांबले होते.

#### सोशल मीडियावर चर्चांना उधाण

सोशल मीडियावर मतदार संघात कोण जिंकणार व कोणाला किती मत मिळतील याचा अंदाज मांडला जात आहे. कुठे कोणता उमेदवार वरचढ आहे. कुठे कोणाला फटका बसेल याचा एकूण आढावा घेऊन मते मांडली जात आहेत. अनेकजण या पोस्टवर साधकबाधक प्रतिक्रिया सुद्धा देत आहेत.

## संरक्षण भिंतीमुळे पंचवटी नगरच्या रहिवाशांना दिलासा

### नगरसेवक शिवाजी शिंदेंच्या प्रयत्नांना यश!



**| माथेरान | प्रतिनिधी |**

माथेरानचा परिसर हा चोहोबाजूंनी डोंगर दऱ्यांनी हा संपूर्ण भूभाग व्यापलेला आहे. जागेअभावी अनेकांनी पूर्वीपासून जवळपास कड्यालगत कुटुंबाच्या निवाऱ्यासाठी घरे बांधलेली आहेत. झोपडपट्टी म्हणून हा भाग आजही ओळखला जात आहे.पावसाळ्यात पावसाचे प्रमाण अधिक असल्याने कड्यालगत असणाऱ्या घरांच्या बाजूच्या मातीची पूर्णपणे धूप होऊन वाहून गेली आहे.

त्यामुळे तेथील रहिवाशांना अतिवृष्टी काळात जीव मुठीत धरून रात्रभर जागे राहून आपले जीवन कंठावे लागत होते. पंचवटी नगर येथील रहिवासी राकेश कोकळे यांनी याबाबत मागील पंधरा वर्षांपासून अनेकदा प्रशासनाला निवेदने देऊनही काहीएक साध्य झाले नव्हते. अखेरीस ही बाब नगरसेवक शिवाजी शिंदेंच्या प्रत्यक्ष निदर्शनास आणून दिल्यावर त्यांनी अधिकारी वर्गाशी चर्चा करून याभागात संरक्षण भिंतीचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे.या महत्वपूर्ण कामामुळे नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.

> “मागील अनेक वर्षापासून पंचवटी नगर भागात जमिनीची धूप होत होती. अनेक वर्षे त्या ठिकाणचे रहिवासी असणारे राकेश कोकळे पाठपुरावा करीत असताना मी पाहत होतो. प्रत्येक वेळी या कामासाठी राजकीय अडथळे येत असताना याभागातील गोरगरीब व्यक्तीची घरे वाचली पाहिजे या सामाजिक भावनेने मी ठेकेदार आणि पालिका अधिकारी यांना सूचना केली होती. त्यानुसार याठिकाणी संरक्षण भिंतीचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे.”
>
> शिवाजी शिंदे
> गटनेते माथेरान नगरपरिषद

> “आमच्या पंचवटी नगर येथील माझ्या घराच्या मागील बाजूस दरवर्षीच्या अतिवृष्टीमुळे मोठया प्रमाणावर पावसाचे पाणी वाहून जात होते. त्यामुळे तेथील मातीची प्रचंड प्रमाणात धूप होऊन हा भाग पूर्णपणे धोकादायक बनला होता. याठिकाणी वास्तव्यास असणाऱ्या रहिवाशांना जीव मुठीत धरून पावसाळ्यात जीवन जगावे लागत होते. मी अनेकवेळा याबाबत प्रशासनाला लेखी निवेदने दिली होती की या ठिकाणी संरक्षण भिंत उभारावी परंतु याकडे दुर्लक्ष करण्यात आले होते. अनेकवेळा विविध वर्तमानपत्रात बातम्या सुध्दा दिल्या होत्या. अखेरीस नगरसेवक शिवाजी शिंदे यांनी पाठपुरावा करून याठिकाणी संरक्षण भिंतीचे काम सुरू करण्यात आले आहे त्यामुळे आम्हा रहिवाशांना दिलासा मिळाला आहे याबद्दल मुख्याधिकारी राहुल इंगळे, नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी, नगरसेवक तथा गटनेते शिवाजी शिंदे,तसेच पत्रकार मुकुंद रांजाणे यांच्या अथक प्रयत्नांमुळेच हे शक्य झाले आहे.”
>
> – राकेश कोकळे, रहिवासी,माथेरान

## आंब्याची कलमे मोहरली

**श्रीवर्धन :** गेल्या कित्येक वर्षात मोहरली नव्हती इतकी यंदा आंब्याची कलमे पानोपान मोहरली आहेत. त्यामुळे यंदा उन्हाळ्यात पोटभर आणि स्वस्त दरांतील आंबे खायला मिळणार या आनंदात नागरिक आहेत.हातातोंडाशी आलेला घास निसर्गाच्या अवकृपेमुळे हिरावून घेतल्याचे अनुभव शेतकरी, बागायतदारांना आहेत. कोकणाकडे पावसाची वक्रदृष्टी झाली नाही तर झाडे भरभरुन फळेही देतील आणि व्यापाऱ्यांनी दर वाढविले नाहीत तर ग्राहकांना यंदा आंबा-काजू वाजवी दरात भरपूर खायला मिळणार आहे.

## उरणमध्ये महाविकास आघाडीचा बोलबाला!

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यात महाविकास आघाडीने राजकीय मैदान गाजवले असून, भाजपची हवा पुरती उतरल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत आहे. एकूण १२ जागांपैकी किमान १० जागांवर विजय मिळवण्याचा ठाम दावा महाविकास आघाडीकडून केला जात आहे.

नवघर, जासई, चाणजे व चिरनेर या चार जिल्हा परिषद गटांसह नवघर, भेंडखळ, जासई, चिरले, चाणजे, केगाव, चिरनेर व आवरे या आठ पंचायत समिती गणांसाठी मतदान शांततेत पार पडले. ग्रामीण भागात शिवसेना, शेतकरी कामगार पक्ष, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस या महाविकास आघाडीतील घटक पक्षांची संघटनात्मक ताकद भक्कम आहे. याच्या तुलनेत भाजपची एकहाती ताकद अपुरी ठरत असून, जमिनीवर कार्यकर्त्यांचा आधार नसलेला पक्ष म्हणून भाजप उघडा पडत आहे.

त्यातच निष्ठावंत कार्यकर्त्यांना बाजूला सारून आयाराम गयारामांना उमेदवारी दिल्याने भाजपमध्ये प्रचंड नाराजी उसळली आहे. या अंतर्गत फुटीचा फटका थेट मतदानावर बसल्याची चर्चा उरणभर सुरू आहे.

## जिल्हा कारागृहातील १६९ बंदीवानांची कुष्ठरोग तपासणी



**| अलिबाग | वार्ताहर |**

जिल्हाधिकारी किशन जावळे व राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कुष्ठरोग आरोग्यसेवा सहाय्यक संचालक तथा जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर यांच्यामार्फत अलिबाग जिल्हा कारागृहात शिबीर आयोजित करण्यात आले.

कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) शोधमोहीम अभियान शिबीरात कारागृहातील एकूण १६९ बंदीवानांची तपासणी करण्यात आली.

महाराष्ट्रात २०२७ पर्यंत शून्य कुष्ठरोगप्रसारध्येयसाध्यकरण्यासाठी कुष्ठरोगमुक्त सुरक्षा महाराष्ट्र (कुसुम) शोधमोहीम कार्यक्रम ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ दरम्यान राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा कारागृहात शिबीर आयोजित करण्यात आले. वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन सकपाळ यांनी बंदीबांधवांना कुष्ठरोगाची लक्षणे, उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच कुष्ठरुग्णांचा शोध, निदान आणि मोफत उपचार यावर भर देण्याच्या अनुषंगाने कारागृहात दाखल १६९ बंद्यांची कुष्ठरोगाबाबतची तपासणी करण्यात आली.

## खारघर वसाहतीत बोअरवेलचा उतारा

**| पनवेल | प्रतिनिधी |**

गेल्या काही महिन्यांपासून खारघर वसाहतीत पाणीटंचाईची समस्या अधिक तीव्र होत आहे. यावर मात करण्यासाठी अनेक गृहनिर्माण सोसायट्यांनी बोअरवेल जोडणीचा पर्याय स्वीकारला आहे. सिडकोकडून कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा, तसेच पुढील काही दिवसांत उन्हाळा सुरू होणार आहे. उन्हाळ्यात सिडकोकडून रहिवाशांना पुरेसे पाणी मिळत नसल्याने सोसायट्यांवर स्वतःची पर्यायी व्यवस्था उभारण्याची वेळ आली आहे.

खारघर वसाहतीच्या लोकसंख्येत वाढ होत आहे. त्यात खारघर वसाहतीमधील पाणी अप्पर खारघर आणि तळोजा वसाहतीला उपलब्ध करून दिल्या जात असल्यामुळे रहिवाशांना पुरेसा पाणीपुरवठा होत नाही. त्यामुळे अनेक सेक्टरमध्ये रहिवासी सोसायट्यांमध्ये पिण्याच्या व घरगुती वापराच्या पाण्यासाठी मोठ्या प्रमाणावर टँकरवर अवलंबून रहावे लागत होते. मात्र, टँकरचे वाढते दर आणि अनिश्चित वेळेमुळे रहिवाशांची गैरसोय होत आहे.

#### रेनवॉटर हार्वेस्टिंगचा वापर

काही सोसायटी पदाधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, बोअरवेलमुळे सोसायटीमधील स्वच्छता, बागकाम, वाहन, तसेच कपडे धुणे आदी वापरासाठी लागणारे पाणी, तसेच टँकरवरील खर्चात काही प्रमाणात बचत होत असून, रहिवाशांवरील आर्थिक ताण कमी झाला आहे. काही सोसायट्यांनी पावसाळ्यात रेनवॉटर हार्वेस्टिंगची ही व्यवस्था केली असून, भूजल पातळी टिकवून ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

#### नियोजनाअभावी भविष्यात गंभीर संकट

बोअरवेल्समुळे तात्पुरता दिलासा मिळत असला तरी, योग्य नियोजनाशिवाय मोठ्या प्रमाणावर भूजल उपसा केल्यास भविष्यात गंभीर परिणाम भोगावे लागू शकतात. त्यामुळे बोअरवेल वापरासोबतच पाणी बचतला प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे मत पर्यावरण अभ्यासक व्यक्त करीत आहेत. तथापि भूजलाचा अतिवापर टाळण्याचा इशारा दिला आहे.

#### धोरण राबवण्याची गरज

नागरिकांकडून सिडकोकडे नियमित आणि पुरेशा दाबाने पाणीपुरवठा करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी सोसायट्यांनी उचललेले बोअरवेलचे पाऊल हे उपाय ठरत असले, तरी दीर्घकालीन शाश्वत जलव्यवस्थापनासाठी सर्वसमावेशक धोरण राबविण्याची गरज असल्याचे मत नागरिक व्यक्त करीत आहेत.

## सरकारी नोकरीच्या बहाण्याने महिलेची फसवणूक

**नवी मुंबई :** महसूल विभागात लिपिक पदावर नोकरी लावून देतो, असे प्रलोभन दाखवून एका व्यक्तीने घणसोलीतील एका सुशिक्षित महिलेची दोन लाख १० हजारांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

सुजीत पाटील हा त्याच्या पत्नीसाठी नोकरीच्या शोधात होता. फेब्रुवारी २०२५ मध्ये त्याच्या एका नातेवाईकामार्फत त्याची ओळख पनवेलमधील आदई गावात राहणाऱ्या संदीप महाले याच्याशी झाली होती. महाले याने सुजीतच्या पत्नीला नोकरीला लावून देण्याचे आश्वासन दिले होते. डीडी काढण्याच्या नावाखाली आणि नंतर टप्प्याटप्प्यानेमंत्रालयातीलसाहेबांना देण्यासाठी म्हणून त्याने एकूण दोन लाख १० हजार रुपये उकळले. काही महिन्यांच्या प्रतीक्षेनंतरही नोकरी मिळत नसल्याने पाटील कुटुंबीयांनी महालेच्या पाठीमागे पैशांसाठी तगादा लावला असता, त्याने टाळाटाळ केली. अखेर त्याच्या घरी जाऊन विचारणा केल्यानंतर त्याने दोन लाख ५० हजारांचा धनादेश दिला. मात्र, तो बँकेत न टाकण्याची विनंती केली. कालांतराने त्याने आपला मोबाईल बंद केला आणि राहते घर सोडून पलायन केले.

### ओल्या काजूगरांच्या हंगामाला सुरुवात | खवय्यांची खरेदीसाठी उडाली झुंबड

## कोकणचा रानमेवा बाजारात दाखल

**| पाली | प्रतिनिधी |**

कोकणचा रानमेवा म्हणून प्रसिद्ध असलेला काजूगर हंगामाची सुरुवात झाली आहे. आदिवासी महिला हा रानमेवा विकायला घेऊन येत असून, तब्बल ४०० रुपये शेकड्याने काजूगराची विक्री होत आहे. चढ्या भावताही खवय्ये खरेदीसाठी लगबग करत आहेत.

जिल्ह्यातील निसर्ग सौंदर्याने नटलेला डोंगराळ भाग व जंगलामध्ये काजूची झाडे विपुल प्रमाणात आहेत. अनेक बागायतदारांच्या स्वतःच्या खासगी काजूच्या



बागादेखील आहेत. जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यापासून या झाडांवर काजूच्या बिया येतात आणि या बिया तोडून त्यातील काजूगर काढून आदिवासी महिला बाजारात विकण्यासाठी घेऊन येतात. काजूगराच्या हंगामाची नुकतीच सुरुवात झाली असल्याने त्या मुबलक प्रमाणात उपलब्ध नाहीत. त्यांची चढ्या भावाने विक्री होत आहे. जून महिन्यापर्यंत ओल्या काजूगराचा हंगाम असतो.

#### चविष्ट काजू

चविष्ट काजूगर वेगवेगळ्या प्रकारे खाल्ले जातात. काजूगराचा रस्सा किंवा सुकी भाजी करून खाल्ली जाते. पुलाव व बिर्यानीदेखील केली जाते. तसेच मटन, मच्छी, व सुक्या मासळीमध्ये टाकूनसुद्धा खाल्ले जातात. असे हे चिविष्ट आणि स्वादिष्ट काजूगर जेवणाची लज्जत वाढवितात.

#### काजूगर काढताना आदिवासींची मेहनत

आदिवासीबांधव अनवाणी उन्हातान्हात काजूगर काढण्यासाठी जातात. या काजूगराच्या बियांना मोठ्या प्रमाणात चिक असतो. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये आदिवासीबांधव बिया काढतात. शासनाकडून त्यांना हातमोजे देणे आणि सहाय्य करणे गरजेचे आहे, असे मत व्यक्त करण्यात येत आहे.

#### भाव आणि विक्री

माणगाव, श्रीवर्धन, म्हसळा आदी ठिकाणी काजूगराच्या बिया शेकड्याने मिळतात, तर पाली, रोहा, पेण आदी ठिकाणी या बिया वाट्यावर मिळतात. मध्यम आकाराचा वाटा ५० रुपये इतका आहे. ज्यामध्ये १० काजूगर उभे कापून ठेवलेले असतात. खवय्ये मात्र चढ्या भावानेदेखील काजूच्या बिया खरेदी करत आहेत. उत्पादन वाढल्यावर काजूगर मुबलक उपलब्ध होतील. त्यामुळे त्यांचा भावदेखील कमी होईल.

## विकेंडला काशिद बिचवर पर्यटकांची रेलचेल



**| कोर्लई | प्रतिनिधी |**

पर्यटनात प्रसिद्ध असलेल्या काशिद बिचवर विकेंडला रविवारी पर्यटकांची रेलचेल दिसून येत होती. मुंबई, पुणे ठिकठिकाणाहून येणाऱ्या पर्यटकांमुळे दुतर्फा वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

रस्ता रुंदीकरणाच्या कामात साळाव-मुरुड रस्त्यावर भोईघर फाटा, ताराबंदर ते बारशिव रस्त्यावर चालेल्या कामात काही ठिकाणी दोन मोठी वाहने पास होतील, एवढा रस्ता नसल्याने तर भोईघर फाटा ताराबंदर ते बारशिव रस्त्यावर ऐन वळणावर रस्ते व म ऱ्यांच्या कामात वेळोवेळी ट्रॅफिक जॅम होत असल्याने वाहनचालक व प्रवासी वर्ग हैराण झाले असल्याचे चित्र दिसून येत होते. जंजिरा किल्ला पाहण्यासाठी व काशिद बिचवर मजा लुटण्यासाठी सुट्टीच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर रेलचेल असते.देश विदेशातील पर्यटकही आवर्जून येथील पर्यटन स्थळांना भेट देत असतात. रविवारी काशिद बिचवर विकेंडला पर्यटकांनी आनंद लुटला.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# आवळा देऊन कोहळा

अमेरिकेने आपल्यावरचे कर कमी केले म्हणून मोदी-भक्त आणि मिडिया नाचत आहेत. पण मुळात ट्रम्प येण्यापूर्वी आपल्या वस्तूंवर अमेरिकेतील कर सुमारे ३ टक्के होता. तो ट्रम्प यांनी आधी भयंकर वाढवला आणि आता कमी केला. हे म्हणजे आधी शंभर फटक्यांची शिक्षा जाहीर करायची व नंतर ती ५० वर आणायची असा प्रकार आहे. भारतीय मिडिया व भक्त मंडळी आता केवळ ५०च फटके खायला लागणार म्हणून आनंद व्यक्त करीत आहेत. दुसरी महत्वाची बाब म्हणजे अजूनही दोन्ही देशात प्रत्यक्षात कोणताही करार झालेला नाही. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर आधी २५ टक्के आयातशुल्क लावले. मग रशियातून तेल घेतो अशी सबब देऊन ते आणखी २५ टक्क्यांनी वाढवून ५० टक्क्यांवर नेले. आता अचानक त्यांची मर्जी फिरली. ते त्यांनी १८ टक्क्यांवर आणले आहे. हे करताना भारत व अमेरिकेच्या अधिकाऱ्यांनी किंवा नेत्यांनी संयुक्त घोषणा केलेली नाही. ट्रम्प नावाचा गुंड-कम हुकुमशहा मनात येईल त्याप्रमाणे निर्णय फिरवत असतो. त्यानुसार सध्या त्याने हा कर खाली आणला आहे इतकाच याचा अर्थ आहे. काल याबाबतची आदेश जारी करताना ट्रम्प यांनी ही कपात काही अटींवर केली गेली आहे हे पुन्हा बजावले आहे. रशियाकडून अजिबात तेल घ्यायचे नाही या मुख्य अटीवरच ही कपात असून जर या किंवा अन्य बाबतीत भारताचे वागणे ट्रम्प यांना पटले नाही तर पुन्हा दणकावून कर लागू होऊ शकतात असा सज्जड दमच या आदेशात देण्यात आला आहे. भारत हा जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. म्हणजे तो जगाच्या दयेवर जगणारा आफ्रिकेतील एखादा कंगाल देश नव्हे. तरीही ट्रम्प आपल्याला बरोबरीने वागवायला तयार नाहीत. आपल्यासोबतचा करार ते आपल्याला न विचारता परस्पर स्वतःच्या मर्जीने घोषित करीत आहेत. येत्या काही दिवसात आता भारत व अमेरिका याबाबत संयुक्त पत्रक प्रसिध्द करतील. नंतर मार्चच्या पहिल्या आठवड्यात कराराचा पहिला मसुदा तयार होईल व अंतिम मसुद्याला आणखी बराच वेळ जाईल. दरम्यानच्या काळात भारतातून अमेरिकेत जाणाऱ्या चामड्याच्या वस्तू, हिरे, कपडे, तांदुळ इत्यादी वस्तूंवरचा कर १८ टक्क्यांवर येईल व त्यांच्या व्यापाऱ्यांना थोडा दिलासा मिळेल एवढेच काय ते खरे आहे.

## शेतमालाबाबत गंडवणूक

अमेरिका सोयाबीन, कापूस, दूध, मका यांचे प्रचंड उत्पादन करतो. अलिकडपर्यंत चीन त्यांचा मोठा ग्राहक होता. पण आता चीनशी बिनसल्यामुळे चीनने अमेरिकी माल घेणे थांबवले आहे. याचा मोठा फटका अमेरिकी शेतकऱ्यांना बसतो आहे. हा माल खपवायला भारत ही चांगली बाजारपेठ आहे असे ट्रम्पना वाटते आहे. त्यासाठी गेल्या वर्षी सत्तेत आल्यापासून त्यांचा ओरडा चालू आहे. भारत आमच्याकडून आयात कमी करतो आणि आम्हाला निर्यात जास्त करतो, सबब भारताला सुमारे ४६०० कोटी डॉलरचा फायदा होतो असे ते सतत सांगतात. पण मुळात भारत हाही शेतीप्रधान देश आहे. इथेही सोयाबीन, दूध, मका यांचे मोठे उत्पादन होते. ते परदेशातून आयात करण्याची आपल्याला गरजच नाही. त्यामुळे आपल्या शेतकऱ्यांचे संरक्षण हा कळीचा मुद्दा होता. व्यापारमंत्री पियूष गोयल यांच्यावर विश्वास ठेवायचा तर तूर्तास तरी ट्रम्प यांनी भारताचे म्हणणे मानलेले दिसते. सध्या तरी अमेरिकी शेतमालाची आयात आपल्याकडे होणार नाही. पण हेही पूर्णांशाने खरे नाही. सोयाबीन तेल, मक्याचे पशुखाद्य, ज्वारीची दारु आणि कापूस यांच्या आयातीला आपण मंजुरी दिली आहे असे दिसते. सोयाबीन हे आता महाराष्ट्रासहित मध्य भारतातले मोठे पीक झाले आहे. गहू व तांदुळाच्या खालोखाल त्याचाचा बाजार आहे. आता सोयाबीन तेलाची आयात होऊ लागली तर इथल्या सोयाबीनचे दर आणखी कोसळतील. सध्याही ते हमीभावाच्या खालीच आहेत. म्हणजे आगामी काळात शेतकऱ्यांचे आणखी मरण ओढवणार आहे. कापसाच्या आयातीचा कोटा ठरवून दिला जाईल. त्या मर्यादेतच ही आयात होईल. पण तीदेखील आपल्या कापूस शेतकऱ्यांच्या जिवावर उठणार आहे. याखेरीज काही फळे, सुकामेवा इत्यादींच्या आयातीलाही परवानगी देण्यात आली असून त्याचे काय परिणाम होतात हे काहीच दिवसात कळणार आहे.

## मोदी सरकारची लाचारी

गोयल आणि कंपनी आम्ही शेतकऱ्यांचे हित जपले असे ओरडून सांगत आहेत. पण याचा अर्थ इतर क्षेत्रात भारताला दणका बसणार आहे का हे पाहायला हवे. कारण, अमेरिकेतून भारतात येणाऱ्या वस्तूंवरील कर भारत शून्य टक्के करील असेही ट्रम्प यांनी परस्पर जाहीर केले आहे. गोयल यांनी याला दुजोरा दिला आहे. याचा अर्थ, अमेरिकी औद्योगिक माल, मोटारी, यंत्रसामग्री, विमाने किंवा रोजच्या व्यवहारातील इलेक्ट्रॉनिक वस्तू इत्यादीं इथल्या बाजारात मोठ्या प्रमाणात आणून टाकल्या जातील असे दिसते. त्यावर शून्य टक्के कर असल्याने याच वस्तू बनवणारे इथले कारखाने व उद्योजक यामुळे अडचणीत येतील अशी शक्यता आहे. या वस्तू नेमक्या कोणत्या व किती प्रकारच्या मालावर शून्य टक्के कर असेल हे स्पष्ट झालेले नाही. गोयल यांनीही ते दडवले आहे. याचाच अर्थ ट्रम्प यांनी आवळा देऊन आपल्याकडून कोहळा काढून घेतलेला दिसतो. येत्या पाच वर्षात भारताने अमेरिकेकडून ५०० कोटी डॉलरचा माल आयात करण्याचे मान्य केले आहे असेही ट्रम्प यांनी परस्पर जाहीर केले आहे. मोदी हे माझे मित्र आहेत, भारत महान देश आहे असे म्हणतानाच ट्रम्प यांनी मोदी यांच्या विनंतीवरून आपण कर-कपात केली आहे असेही म्हटले आहे. याच ट्रम्प यांनी काही दिवसांपूर्वी मोदी आपल्याला सर आपली भेट मिळू शकेल का म्हणून कसे विनवणी करीत होते अशी खिल्ली उडवली होती. त्यामुळे एका अर्थाने मोदींची ही विनंती म्हणजे तीच ती विनवणी आहे हे ट्रम्प यांनी सूचित केले आहे. या सर्वांचा अर्थ एकच आहे. ट्रम्प यांच्या लेखी भारत, मोदी यांना काडीचीही किंमत नाही. त्यांचा मतलब साधेल तर ते मोदींवर काय वाटेल ती स्तुतीसुमने उधळतील. अन्यथा, एका क्षणात ५०० टक्के कर लावायलाही कमी करणार नाहीत. ट्रम्प मोदींसमोर नमले अशा ज्या गर्जना आपले मिडियावाले करीत आहेत त्या किती मूर्खपणाच्या आहेत हे यावरून स्पष्ट व्हावे. भारताने युरोपशी अलिकडेच केलेल्या करारामुळे ट्रम्प यांनी आपली भूमिका काहीशी बदलली हे खरे आहे. पण खुद्द युरोपदेखील अमेरिकेच्या कृपादृष्टीसाठी तरसत आहे. तिथे ते मोदींपुढे नमते घेतील ही शक्यताच वेडगळपणाची आहे. ट्रम्प यांनी भारताला अमेरिकेकडून तेल घ्यायची सक्ती केली आहेच. आता ते लष्करी खरेदीही रशियाऐवजी अमेरिकेकडून करायला भाग पाडणार आहेत. तसे स्पष्ट संकेत त्यांनी दिले आहेत. थोडक्यात हा जो काही तथाकथित करार व्हायचा आहे तो म्हणजे भारताने अमेरिकेपुढे पत्करलेली लाचारी आहे. तेलाप्रमाणे याही बाबतीत आपण कोणाकडून खरेदी करावी हे स्वातंत्र्य घालवून बसणार आहोत.

विचार

# हिमालयात बर्फाचा दुष्काळ

***दिल्लीसारख्या महानगरांमधून येणारी प्रदूषित हवा केवळ लोकांच्या आरोग्याला हानी पोहोचवत नाही, तर हिमालयालाही संक्रमित करत आहे. शास्त्रज्ञांच्या मते, शहरी भागातील वायू प्रदूषण सीमा ओलांडून हिमालयात पोहोचत आहे. हे सीमापार प्रदूषण केवळ हिमालयातील हिमनद्या वितळण्यास गती देत नाही, तर संपूर्ण प्रदेशाच्या हवामान चक्रांवरही परिणाम करत आहे. हिमालयात आता बर्फाचा दुष्काळ असून, हे संकट गंभीर आहे.***

**मिलिंद बेंडाळे**

काठमांडूमधील 'आयसीएमओडी', पुण्यातील भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्था आणि नैनितालमधील आर्यभट्ट संशोधन संस्था (एआरआयईएस) यांनी केलेल्या अभ्यासानुसार, हिमालयातील बर्फावर साचलेला काळा कार्बन त्याचे परावर्तक गुणधर्म (अल्बेडो) २० ते ३० टक्क्यांनी कमी करतो. यामुळे अधिक सौर ऊर्जा शोषून हिमनद्या वितळण्याचा दर वाढतो आणि हिमनदी तलाव फुटण्याचा धोका वाढतो. इथे काळ्या कार्बनचा प्रसारही महत्वाचा ठरतो. कार्बन हा डिझेल, कोळसा, लाकूड आणि इतर जैवइंधनांच्या अपूर्ण ज्वलनामुळे निर्माण होणारा सूक्ष्म कण आहे. त्याचा आकार अडीच मायक्रोमीटरपेक्षा कमी असतो. त्यामुळे तो बराच काळ वातावरणात राहू शकतो आणि श्वसनाद्वारे फुफ्फुसांपर्यंत पोहोचू शकतो. आयआयटी दिल्ली आणि कानपूर तसेच 'टेरी' यांच्या अभ्यासानुसार दिल्लीसारख्या महानगरांमध्ये पीएम २.५ प्रदूषणात काळ्या कार्बनचा वाटा १० ते ३० टक्के आहे. २०१३ ते २०२३ पर्यंतच्या दशकभराच्या विश्लेषणातून दिसून आले आहे, की मध्य गंगेच्या मैदानात काळ्या कार्बनचे सरासरी प्रमाण प्रति घनमीटर पाच ते दहा मायक्रोग्राम असते. ते हिवाळ्यात जवळजवळ दुप्पट होते. 'आयआयटीएम' आणि अमेरिकेची 'नॅशनल ओशनिक अँड ॲटमॉस्फेरिक ॲडमिनिस्ट्रेशन'च्या विश्लेषणानुसार, शहरांमधून निघणाऱ्या हवेच्या वस्तुमानांपैकी २३ ते ४० टक्के हिमालयीन प्रदेशात पोहोचतात. धुळीची वादळे ही प्रक्रिया आणखी वेगवान करतात. 'आयसीएमओडी', स्वित्झर्लंडमधील 'ईटीएच झुरिच' आणि 'वाडिया इन्स्टिट्यूट'च्या अभ्यासातून आढळून आले, की मध्य आणि पश्चिम हिमालयात ६० ते ७० टक्के काळा कार्बन जीवाश्म इंधनातून येतो.

'नासा'च्या मते, काळ्या कार्बनचा पातळ थरदेखील बर्फ पाच ते दहा टक्के कमी करतो. त्यामुळे पृष्ठभागाचे तापमान दोन ते चार अंश सेल्सिअसने वाढते. २०२५ मध्ये झालेल्या 'आयसीएमओडी'च्या अभ्यासात आढळून आले, की पूर्व हिमालयात काळ्या कार्बनचे प्रमाण वाढल्याने बर्फाच्या खोलीत ३० ते ४० टक्के घट होऊ शकते. जागतिक बँक आणि 'आयसीएम ओडी'च्या मते, काळ्या कार्बनमुळे हिमनद्यांचा विसर्ग २० ते २५ टक्क्यांनी वाढू लागला आहे. त्यामुळे गंगा आणि ब्रह्मपुत्रासारख्या नद्यांचा प्रवाह वाढला आहे. शास्त्रज्ञांचा विश्वास आहे की दक्षिण आशियाई देशांनी उत्सर्जन मानकांची काटेकोरपणे अंमलबजावणी केल्यास हिमालयातील हिम नद्यांवरील काळ्या कार्बनचे प्रमाण अंदाजे २३ टक्क्यांनी कमी होऊ शकते. 'यूएनईपी'च्या मते स्वच्छ इंधनांचा वापर करून इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देऊन आणि पिकांचे अवशेष जाळण्यावर नियंत्रण ठेवून काळ्या कार्बनचे उत्सर्जन ५० ते ८० टक्क्यांनी कमी करता येते. आशियातील पाण्याचा बुरुज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिमालयाला वाचवण्यासाठी आता प्रादेशिक सहकार्य आवश्यक आहे. 'आयसीएमओडी'च्या मते अनियंत्रित काळ्या कार्बन उत्सर्जनामुळे २०५० पर्यंत हिमालयातील ३० ते ४० टक्के बर्फाचे नुकसान होऊ शकते.

हिमालयाच्या शिखरांवर आता शहरी प्रदूषणाची सावली वाढत आहे आणि वेळेवर हस्तक्षेप हा एकमेव उपाय आहे. या हिवाळ्यात आतापर्यंत हिमालयीन पर्वतरांगांवर फारच कमी बर्फ पडला आहे. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि जम्मू आणि काश्मीरच्या अनेक भागांमध्ये जानेवारीच्या मध्यापर्यंत बर्फवृष्टी झाली नव्हती. नद्या कोरड्या पडण्याच्या मार्गावर आहेत. पर्यटनावर परिणाम झाला आहे आणि शेतकरी आणि बागायतदार चिंतेत आहेत; परंतु आता हवामान बदलणार आहे. हवामान विभागाच्या (आयएमडी) मते १९ जानेवारीपासून एक मजबूत पश्चिमी विक्षोभ सक्रिय होऊ लागला आहे. त्याच्या मागे आणखी एक शक्तिशाली विक्षोभ येत आहे. दोन्ही मजबूत पश्चिमी विक्षोभ सलग होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे पर्वतांवर जोरदार हिमवृष्टी होण्याची अपेक्षा आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून, पश्चिमी विक्षोभ कमकुवत आणि कमी संख्येने आहेत. हे विक्षोभ भूमध्य समुद्रातून उद्भवतात आणि हिमालयात बर्फ आणि पाऊस आणतात. तथापि, या वेळी बहुतेक विक्षोभ उत्तरेकडे वळले आणि हिमालय कोरडे राहिले. जम्मू, काश्मीर आणि लडाखमध्ये हिमवृष्टीत ९७ टक्के घट नोंदवण्यात आली आहे, तर हिमाचल प्रदेशमध्ये ९२ टक्के आणि उत्तराखंडमध्ये सुमारे शून्य हिमवृष्टी नोंदली गेली आहे. एके काळी बर्फाच्छादित असलेले पर्वत ओसाड पडले आहेत. बदलत्या वातावरणामुळे केवळ मानवांनाच नाही, तर वन्यजीवांनाही त्रास होत आहे.

पाणी, शेती, वीज, पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि राष्ट्रीय सुरक्षेमागे हिमालय आहे. हिमालयातील बर्फाचे प्रमाण कमी होणे ही केवळ पर्वतांची समस्या नाही, तर जागतिक संकट आहे. शास्त्रज्ञांच्या इशाऱ्यानुसार हिमनद्यांचे वितळणे आणि कमी होणारी बर्फवृष्टी पर्वतांना अस्थिर करत आहे. संयुक्त राष्ट्रांच्या हवामान अहवालांनुसार आणि राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या विश्लेषणानुसार संपूर्ण हिमालयीन प्रदेश हवामानबदलामुळे प्रभावित होत आहे. बर्फ पर्वतांसाठी सिमेंट म्हणून काम करतो. त्यांना एकत्र ठेवतो. बर्फाच्या अनुपस्थितीमुळे मॉन्सूनचे नमुने, अतिवृष्टी, वाढलेले तापमान आणि आपत्तींची वारंवारता, तीव्रता आणि व्याप्ती वाढली आहे. गेल्या १५ वर्षांपासून चीन तिबेटमध्ये मोठ्या प्रमाणात कृत्रिम पाऊस (क्लाउड सीडिंग) कार्यक्रम राबवत आहे. तिबेटच्या ओसाड पठारांना खतपाणी घालण्याचा हा प्रयत्न आहे. चीनला त्यांचे नैसर्गिक आणि कृत्रिम जलसाठे भरून ठेवायचे आहेत. कृत्रिम पावसामुळे हिमालयातील नैसर्गिक वातावरण बदलू शकते. हा प्रयत्न प्रत्यक्षात पाणी किंवा पावसाची चोरी आहे. हे थेट सिद्ध करणे अद्याप शक्य नसले, तरी त्यावर संशोधन आवश्यक आहे. चीन तिबेटमधून जाणाऱ्या यारलुंग त्सांगपो (भारतातील ब्रह्मपुत्र) नदीच्या सर्वात उंच वळणावर सर्वात मोठा जलविद्युत प्रकल्प बांधत आहे. या प्रकल्पाची किंमत १६८ अब्ज डॉलर असण्याचा अंदाज आहे. हा प्रकल्प ऊर्जा क्षेत्रात चीनसाठी वरदान ठरू शकतो. तथापि, जगातील सर्वात मोठा कार्बन उत्सर्जक चीन कोळशावर चालणाऱ्या ऊर्जेपासून दूर जाऊ शकेल.

चीनचे हे धरण उभारणे हवामानबदल कमी करण्याच्या जागतिक प्रयत्नांनाही मदत करू शकते. तरीही काही सुरक्षातज्ज्ञ या प्रकल्पाला 'वॉटर बॉम्ब' मानतात. बर्फाचा अभाव आणि पर्जन्यचक्रात बदल यांचा थेट समाजावर परिणाम झाला. ग्रामीण अर्थव्यवस्थाही कोलमडली. पाऊस आणि बर्फवृष्टीअभावी उत्तराखंडची ग्रामीण अर्थव्यवस्थाही उद्ध्वस्त झाली. आजही उत्तराखंडच्या डोंगराळ जिल्ह्यांमधील ८० टक्क्यांपेक्षा जास्त शेती पावसावर अवलंबून आहे. सरकारच्या उदासीनतेमुळे केवळ शेतेच ओसाड झाली नाहीत, तर पशुपालनावरही गंभीर परिणाम झाला. उत्तराखंडमध्ये शेती आणि पशुपालन हे एकत्रित जीवनशैलीचा भाग आहेत. शेतातील पेंढा, गवत आणि पिकांचे अवशेष हे प्राण्यांसाठी मुख्य चारा आहेत, तर प्राणी शेती आणि इतर कारणांसाठी खत पुरवतात. हे एक पूरक चक्र आहे, त्याने डोंगराळ समुदायाला पिढ्यानपिढ्या स्वावलंबी ठेवले आहे. हे चक्र तुटताच ग्रामीण व्यवस्था कोलमडू लागली. हिमालयीन शिखरे काळी पडल्याने जगाचे लक्ष वेधले गेले आहे. या हंगामात एकेकाळी बर्फाने झाकलेल्या औलीसारख्या टेकड्या अंधारात आल्या आहेत. हवामानशास्त्रज्ञांच्या मते या वेळी बर्फाच्या पांढऱ्या चादरीने झाकलेले हिमालयीन पर्वत आता कोरडे आणि खडकाळ दिसत आहेत. १९८० ते २०२० या कालावधीतील सरासरीच्या तुलनेत, गेल्या पाच वर्षातील बहुतेक हिवाळ्यात बर्फवृष्टीत लक्षणीय घट झाली आहे. भारतीय हवामान खात्याच्या मते, डिसेंबरमध्ये उत्तर भारतातील बहुतेक भागात नगण्य पाऊस पडला. जानेवारी ते मार्च दरम्यान उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर आणि लडाखसारख्या प्रदेशांमध्ये पाऊस सरासरीपेक्षा ८६ टक्के कमी होऊन बर्फवृष्टी होऊ शकते, असा अंदाज आहे. जागतिक तापमानवाढीमुळे युरोपमध्येही हे संकट दिसून येत आहे. जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि ईशान्येकडील प्रदेशदेखील बर्फवृष्टीच्या अभावामुळे प्रभावित आहेत. उत्तराखंडला सर्वाधिक फटका बसला आहे. या वर्षी कमी झालेल्या बर्फवृष्टीचे मुख्य कारण म्हणजे पश्चिमी विक्षोभ कमकुवत होणे. पूर्वी भूमध्य समुद्रातून येणारे थंड वारे हिमालयीन प्रदेशात मुबलक हिमवृष्टी आणत असत. हिमालय आता 'दुहेरी धक्क्या'ला तोंड देत आहे. एकीकडे, जुन्या हिमनदी वेगाने वितळत आहेत आणि दुसरीकडे नवीन बर्फ जमा होत नाही. हिमरेषा सुमारे ६० मीटरने कमी झाली आहे. ही परिस्थिती भविष्यात दक्षिण आशियाच्या मोठ्या भागासाठी गंभीर पाणी आणि पर्यावरणीय संकट निर्माण करून जलस्रोत, शेती आणि पर्यावरणावर गंभीर परिणाम होऊ शकतो. शास्त्रज्ञ याला 'बर्फाचा दुष्काळ' म्हणत आहेत, जो भविष्यात मोठ्या जलसंकटाकडे निर्देश करतो.

**(लेखक निसर्ग आणि प्राणीजीवनाचे अभ्यासक आहेत.)**

# मतदानानंतर निकालाची चर्चा



**वैष्णवी वाडकर**

रायगड जिल्ह्यात ५९ जिल्हा परिषद गट व ११८ पंचायत समिती गणांसाठी शनिवारी (दि. ७) मतदान प्रक्रिया पार पडली असून आता सर्वांचे लक्ष निकालाकडे लागले आहे. मतदानाची प्रक्रिया पूर्ण होताच गावागावांत शनिवारपासूनच निकालाबाबत जोरदार चर्चा रंगू लागली. कोण बाजी मारणार, कोणाचा प्रभाव वाढणार आणि स्थानिक सत्तेचे चित्र कसे बदलणार याची उत्सुकता मतदारांमध्ये शिगेला पोहोचली. मतदानानंतर आता निकालाकडून विकासाची अपेक्षा व्यक्त होत असून पुढील पाच वर्षांत रायगडच्या विकासाला गती मिळणार का, याची चर्चा अधिक रंगत आहे. रायगड जिल्ह्यात दुपारी साडेपाच वाजेपर्यंत ६९.९१ टक्के मतदान झाले. तब्बल ११ लाख ८८ हजार ८०४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यात ६० लाख चार हजार ८९६ पुरुष तर ५८ लाख तीन हजार ९०४ महिला व ४ इतर मतदारांचा समावेश होता. सुरुवातीला काही केंद्रांवर प्रतिसाद कमी दिसला. मात्र जस जसा दिवस पुढे जात होता मतदानाचा वेग वाढला. अनेक ठिकाणी मतदारांच्या रांगा लागल्या होत्या. महिला, तरुण आणि ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग उल्लेखनीय होता. या उत्स्फूर्त सहभागामुळे ही निवडणूक लोकशाहीचा खरा उत्सव ठरली. काही ठिकाणी लग्न समारंभ असल्याने घाई गडबडीत का होईना अनेक नवदाम्पत्यांनी मतदानाची जबाबदारी पार पाडली. मतदानादरम्यान काही ठिकाणी मशीन बिघाडाचा प्रश्न निर्माण झाला होता. सात मतदान केंद्रांवर यंत्रणा काही काळ बंद पडली होती. मात्र प्रशासनाने तातडीने पर्यायी व्यवस्था केल्याने मतदान पुन्हा सुरू झाले आणि मोठा गोंधळ टळला. पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त असल्याने मतदान प्रक्रिया शिस्तीत पार पडली. मात्र काही केंद्रांवर मंडपाचा अभाव आणि व्हीव्हीपॅट मशीनचा वापर न झाल्यामुळे काही मतदारांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे भविष्यातील निवडणुकांमध्ये या बाबी सुधारण्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. किरकोळ वाद वगळता जिल्हाभर मतदान शांततेत पार पडले. त्यामुळे ही समाधानाची बाब मानली जात आहे. शनिवारी (दि.७) मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडली असून आता गावपातळीवर निकालाबाबत विविध चर्चा सुरू आहेत. गावागावात निकालाबाबत वेगवेगळे अंदाज व्यक्त केले गेले. काही मतदारांनी विश्वास व्यक्त केला की पारंपरिक राजकीय गट पुन्हा सत्ता टिकवतील, तर काही जण नव्या चेहऱ्यांना संधी मिळेल असे सांगत होते. तरुण मतदारांमध्ये बदलाची अपेक्षा स्पष्ट दिसत आहे. 'काम करणाऱ्यालाच मत दिले' असे अनेक जण ठामपणे सांगताना दिसले. ज्येष्ठ मतदार स्थिर नेतृत्वाची गरज असल्याचे सांगत आहेत. त्यामुळे निकाल हा केवळ विजय-पराजयाचा नसून लोकांच्या अपेक्षांचा प्रतिबिंब ठरेल. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीचा निकाल ग्रामीण विकासाच्या दिशेला ठोस आकार देणारा ठरणार आहे, अशी भावना सर्वसामान्यांकडून व्यक्त होत आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती या संस्था गावपातळीवरील निर्णय प्रक्रियेचा भक्कम पाया आहेत. पाणीपुरवठा, रस्ते, शिक्षण, क्रीडा, आरोग्य सेवा, शेतीसंबंधित सुविधा आणि रोजगाराच्या संधी या प्रश्नांवर नव्या प्रतिनिधींना काम करावे लागणार आहे. त्यामुळे मतदारांचा निकालाकडे पाहण्याचा दृष्टिकोन केवळ राजकीय नाही तर विकासाभिमुख आहे. अनेक गावांमध्ये 'आता निवडणूक संपली, निकालानंतर कामाला सुरुवात झाली पाहिजे' अशी स्पष्ट भावना व्यक्त होत आहे. काही मतदारांकडून अपेक्षा व्यक्त केली जात आहे की, नव्याने निवडून येणारे प्रतिनिधी गावात अधिक उपस्थित राहावे, लोकांच्या अडचणी प्रत्यक्ष ऐकाव्यात आणि प्रशासकीय यंत्रणेला हाताशी घेऊन स्थानिक नागरिकांची कामे मार्गी लावावीत. त्यामुळे निवडणूक ही केवळ सत्तेची स्पर्धा नसून जबाबदारीची सुरुवात आहे अशी जाणीव मतदार वारंवार बोलून दाखवत आहेत. मतमोजणी आज (दि. ९) सकाळी १० वाजल्यापासून सुरू होत असून गावागावातील वातावरण अधिकच उत्सुकतेचे झाले आहे. गावागावातील नागरिक आपापले अंदाज मांडत आहेत, तर सामान्य मतदार शांतपणे निकालाची वाट पाहत आहे. चहाच्या टपऱ्या, बाजारपेठा, शेतातील बांध आणि घरगुती गाठीभेटी सर्वत्र चर्चा एकाच विषयाभोवती फिरताना दिसत आहेत. काही ठिकाणी मतदार आत्मविश्वासाने निकालाचा अंदाज व्यक्त करत आहेत, तर काही जण 'निकाल लागेपर्यंत काही सांगता येत नाही' असे सावध मत मांडत आहेत. या चर्चांमधून लोकशाहीबद्दलची जागरूकता आणि सहभाग स्पष्टपणे दिसून येतो. मतदानानंतरही लोक राजकीय प्रक्रियेपासून दूर गेलेले नाहीत उलट निकालाबद्दलची उत्सुकता त्यांचा सहभाग अधिक जिवंत ठेवताना दिसत आहे.

लोकसंसद

## भारतीय क्रिकेट संघाचे अभिनंदन!

विरारच्या मराठमोळ्या आयुष म्हात्रेच्या नेतृत्वातील १९ वर्षांखालील भारतीय क्रिकेट संघाने आयसीसी अंडर-१९ एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत अंतिम सामन्यात इंग्लंडला हरवून विश्वचषकावर आपले नाव दिमाखात कोरले आणि भारतीय क्रिकेट रसिकांनी एकच जल्लोष केला. झिम्बाब्वेची राजधानी हरारे येथील हरारे स्पोर्ट्स क्लबच्या मैदानावर पार पडलेल्या अंतिम सामन्यात प्रथम खेळताना मैदानात वैभव सूर्यवंशी नावाचे वादळ आले आणि १५ चौकार आणि १५ षटकारांची बरसात करून १७५ धावांची तुफानी खेळी करत या वादळाने इंग्लंडच्या गोलंदाजीचा पालापाचोळा केला. वैभव सूर्यवंशीच्या या वादळी खेळीच्या बळावर भारतीय संघाने पहिल्या डावात ४११ धावांचा जो डोंगर उभा केला तो अर्थात इंग्लंड संघाला सर करता आला नाही आणि १०० धावांनी भारताने हा सामना जिंकला. भारतीय संघाने याआधी २००० साली (कर्णधार मोहम्मद कैफ), २००८ (कर्णधार विराट कोहली), २०१२ (कर्णधार उन्मुक्त चंद), २०१८ (कर्णधार पृथ्वी साव) आणि २०२२ साली (कर्णधार यश धूल) यांच्या नेतृत्वाखाली अंडर-१९ विश्वचषक जिंकण्याचा पराक्रम केला आहे. असा पराक्रम सहाव्यांदा करणाऱ्या कर्णधार आयुष्य म्हात्रेच्या १९ वर्षांखालील या अंडर-१९ विश्वचषक विजेत्या संघाला बीसीसीआयकडून ७.५ कोटी रुपयांचे बक्षीस मिळणार आहे. अंडर-१९ विश्वचषक विजेत्या युवा भारतीय क्रिकेट संघाचे अभिनंदन!

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# बॅरिस्टर ए. आर. अंतुले हे संघर्षशील आणि सहृदय नेते



एकीकडे महाराजांना राजकारणाचा मुद्दा बनवले जात आहे. पण, एकेकाळी स्वत: मुस्लिम समाजाचे असूनही महाराजांना दैवत म्हणून पुजणारे लोकप्रिय मुख्यमंत्री बॅरिस्टर अब्दुल रहमान अंतुले यांची छत्रपती शिवाजी महाराजांवर असलेली श्रद्धा कौतूकास्पद आहे. बॅरिस्टर अब्दुल रहमान अंतुले हे महाराष्ट्राचे आठवे मुख्यमंत्री होते.

अब्दुल रहमान अंतुले यांचा जन्म ९ फेब्रुवारी १९२९ रोजी झाला. रायगड जिल्ह्याच्या आंबेत हे त्यांचे मूळ गाव आहे. अंतुले ह्यांनी मुंबई विद्यापीठ व लंडन येथे शिक्षण घेऊन बॅरिस्टरची पदवी मिळवली. महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये १९६२ साला-पासून कार्यरत असलेले अंतुले १९६२ ते १९७६ दरम्यान विधानसभेचे सदस्य होते. १९७६ ते १९८० दरम्यान राज्यसभा सदस्य राहिल्यानंतर १९८० मध्ये अंतुले पुन्हा विधानसभेवर निवडून आले. व जून १९८० ते जानेवारी १९८२ दरम्यान महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावर राहिले. मुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्यावर त्यांनी छत्रपती शिवाजी महारांजाचा खऱ्या अर्थाने सन्मान केला. 'कुलाबा' जिल्ह्याचं नाव 'रायगड' करणं असो वा लंडनहून छत्रपती शिवाजी महाराजांची भवानी तलवार आणण्याची घोषणा असो, बॅरिस्टर अंतुले यांचा मुख्यमंत्रिपदाचा कार्यकाळ अनेक घोषणांनी, घटनांनी गाजला. अंतुले यांचे रायगड जिल्ह्याबद्दल अपार प्रेम होते. रायगड जिल्ह्याचे पूर्वीचं नाव मकुलाबाफ होते. मात्र, ही शिवरायांची भूमी आहे. त्यामुळे त्यांचेच नाव या जिल्ह्यालाही हवे असे ठरवून अंतुले यांनी मरायगडफ असं कुलाबाचे नामांतर केले. मंत्रालयात छत्रपती शिवाजी महाराजांचे एक तैलचित्र लावण्यात आले आहे. हे चित्रही तत्कालिन मुख्यमंत्री ए.आर. अंतुले यांच्याच काळात लावण्यात आले. मंत्रालयाच्या बाहेरून जाणाऱ्या लोकांनाही ते स्पष्ट दिसावे असा या मागील उद्देश होता. त्यामूळे स्वतः बाहेरून फेरफटका मारून ते सर्वांना दिसते का हे तपासले होते.

भवानी तलवार परत आणण्यासाठी ही प्रयत्न केले छत्रपती शिवाजी महाराजांची भवानी तलवार इंग्लडमध्ये आहे. ही तलवार परत यावी असे सर्वांनाच वाटते. मात्र, त्यासाठी प्रयत्न खूप कमी होताना दिसतात. पण, मुख्यमंत्री अंतूले यांनी तलवार परत आणण्यासाठी त्यांनी ब्रिटनच्या राणी एलिझाबेथ यांच्याशी बैठकही ठरवली होती. पण, या चर्चेच्या आधीच त्यांना मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला, त्यामूळे ते काम अपूर्णच राहिले. १९८२मध्ये त्यांच्यावर सिमेंट घोटाळ्याचा आरोप करण्यात आला. भ्रष्टाचाराच्या आरोपावरून मुख्यमंत्रीपदाचा राजीनाम देणे भाग पडले. १९८९ पर्यंत आमदार राहिल्यानंतर अंतुले ९ व्या लोकसभेवर निवडून गेले व १९९८ पर्यंत खासदारपदावर राहिले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे सदस्य असलेले अंतुले मनमोहन सिंग केंद्र सरकारमध्ये २००६ ते २००९ दरम्यान पहिले केंद्रीय अल्पसंख्यांक कार्य मंत्री होते. २००४ साली १४ व्या लोकसभेवर निवडून आल्यानंतर २००९ सालच्या लोकसभा निवडणुकीमध्ये त्यांना रायगड मतदारसंघामधून अनंत गीते ह्यांच्याकडून पराभव पत्कारावा लागला. त्यानंतरही ते राजकारणात सक्रीय होते. पण, मुत्रपिंडाच्या आजाराने त्यांचे २ डिसेंबर २०१४ रोजी मुंबईत निधन झाले.

# देवगडचा हापूस नव्या संकटात

## • झाडावरच मोहोर पडतोय काळा; बागायतदार चिंतेत

। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।

प्रसिद्ध देवगड हापूस आंबा आता नव्या संकटात सापडला आहे. यावर्षीच्या नव्या हंगामात पहिलाच मोहोर झाडावरच कोळश्यासारखा काळा पडल्याने बागायतदार चिंतेत पडले आहेत. बदलत्या वातावरणात मोहोर चांगल्याप्रकारे टिकून चांगली फळे मिळण्यासाठी महागड्या कीटकनाशकांच्या फवारण्या केल्यानंतरही गुलाबी थंडीच्या धुक्यात साठलेल्या मोहोरावर बुरशी लागली आहे.



बुरशीजन्य रोगाची ही परिस्थिती तालुक्यात प्रथमच उद्भवली असून तालुक्यातील सुमारे ९९ टक्के बागायती या बुरशीजन्य रोगाच्या अधीन आहे. परिणामी, त्यात फंगल इन्फेक्शन झाले. अर्थात बुरशी निर्माण झाली. त्यात तुडतुड्याचे प्रमाणही अधिक राहिले. त्यामुळे हा संपूर्ण मोहोर कोळश्यासारखा काळा बनला. त्यात मोहोर निर्जीव झाल्याने कमी पडली नाही. तालुक्यातील ९९ टक्के बागायतींमध्ये हा प्रकार दिसून आला असून हा प्रकार पहिल्यांदाच घडला आहे. अशा प्रकारातून मोहोराला वाचविण्यासाठी ज्या बागायतदारांनी अथक मेहनत घेतली, त्यांनाही मेहनतीचे फळ मिळाले नाही. तुडतुड्यांचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी बागायतदारांनी कीटकनाशक फवारणीच्या माध्यमातून विशेष लक्ष दिले होते. परंतु, बुरशीजन्य रोगाने झाडावरील मोहोरच गिळकृत नव्हे, तर चक्क फसवाच निघाल्याने बागायतदार झाल्याने बागायतदार चिंताग्रस्त बनले आहेत. यावर्षी नव्या हंगामात आंबा कलमांना चांगल्याप्रकारे मोहोर आला होता. त्यामुळे बागायतदारही खूश होते. हा मोहोर टिकवून चांगली फळे मिळण्यासाठी बागायतदारांनी महागड्या कीटकनाशकांची फवारणीदेखील केली. तसेच यावर्षी थंडीचे प्रमाण चांगले राहिल्याने लवकरात लवकर फळधारणा होईल, अशी अपेक्षा बागायतदार बाळगून होते.

कृषी विद्यापीठाने आंबा हंगामात बदलत्या वातावरणात बागायतदारांनी फळझाडांची निगा कशी राखावी? कोणत्या किटकनाशकांचा वापर करावा? आदी माहितीचे मार्गदर्शक बुलेटीन आठवड्यात किमान एकदा प्रकाशित करणे आवश्यक आहे. जेणेकरून या बुलेटीनद्वारे सर्व बागायतदारांना चालू परिस्थितीची माहिती होईल. आंबा बागायतदारांच्या प्रश्नांना शासनदरबारी आवाज उठविण्यासाठी, विविध संघटना संशोधक यांच्याशी बागायतदार संघटनांचा अथवा आंबा बागायतदारांचाही योग्य समन्वय दिसून येत नाही.

# सोन्याच्या दागिन्यांसाठी शेजारीकडून फसवणूक

। पनवेल । प्रतिनिधी ।

माघी गणपतीला जाण्यासाठी शेजारी राहणाऱ्या महिलेकडून घेतलेले सोन्याचे गंठण परत न करता ते घेऊन शेजारीण पसार झाली. ही घटना खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. याप्रकरणी पोलिसांनी गंठण घेऊन पसार झालेल्या शेजारणीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. नेवाळी येथे राहणाऱ्या उज्ज्वला गोटीराम पाटील यांच्या शेजारी शीतल काथारा नावाची महिला राहते. शीतल काथारा हिला चिंधरण येथे माघी गणपतीला जायचे होते. त्यामुळे तिने उज्ज्वला पाटील हिच्याकडे असलेले सोन्याचे गंठण घालण्यासाठी मागितले होते. त्यावर उज्ज्वला यांनी तिला हे गंठण दिले होते. दोन दिवसांनी उज्ज्वला या गंठण मागण्यासाठी शीतलच्या घरी गेले असता तिने गंठण घेऊन येते, असे त्यांना सांगितले. तिच्या बोलण्यावर विश्वास ठेवून त्या घरी परतल्या. मात्र, शीतल गंठण घेऊन आली नाही. त्यामुळे त्या काथारा हिच्या घरी गेले असता शीतल घरातून निघून गेल्याचे समजले. त्यावर उज्ज्वला यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली.

# बेशिस्त वाहनचालकांना आळा बसणार

## • आरटीओच्या ताफ्यात अत्याधुनिक इंटरसेप्टर वाहने दाखल

। पालघर । प्रतिनिधी ।

विरार परीसरातील वाढती वाहतूक समस्या आणि अपघातांचे प्रमाण लक्षात घेता, प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सुरू केला आहे. वाहतूक नियमांचे उल्लंघन रोखण्यासाठी आरटीओच्या ताफ्यात दोन अत्याधुनिक इंटरसेप्टर वाहने दाखल झाली आहेत. त्यामुळे रस्त्यांवरील नियंत्रण अधिक कडक होणार आहे. या नव्या इंटरसेप्टर वाहनांमध्ये प्रगत रडार प्रणाली, उच्च दर्जाचे कॅमेरे आणि ऑटोमॅटिक नंबर प्लेट ओळख यंत्रणा बसवण्यात आली आहे. ही वाहने रस्त्याच्या एका ठिकाणी उभी राहून आजूबाजूच्या परिसरातील वाहनांवर लक्ष ठेऊ शकतात. वाहनांचा वेग, चुकीचा लेन बदल, ओव्हरटेकिंग, तसेच संशयास्पद हालचाली रडारद्वारे सहज ओळखल्या जाणार आहेत.

विशेष म्हणजे वाहनचालकाने नियम मोडताच काही क्षणातच ई-चलान तयार होणार आहे. यासाठी वाहन थांबवण्याची गरज भासणार नाही. त्यामुळे तपासणी अधिक जलद आणि पारदर्शक होईल. आरटीओ अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, ही प्रणाली तासाला सुमारे ८०० चलान काढण्याची क्षमता ठेवते. या हायटेक यंत्रणेमुळे चोरीची वाहने, बेकायदा नंबर प्लेट वापरणारी वाहने तसेच संशयास्पद वाहनांवर नजर ठेवणे सोपे होणार आहे. अपघात झाल्यास इंटरसेप्टर वाहन तात्काळ घटनास्थळी पोहोचून मदत कार्यात सहभागी होऊ शकते. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीतही ही वाहने उपयुक्त ठरणार आहेत. तसेच, नव्या प्रणालीमुळे अशा बेशिस्त वाहनचालकांवर आळा बसण्याची शक्यता आहे. रस्त्यावरील शिस्त सुधारून अपघातांचे प्रमाण कमी करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

# जगबुडी नदीला प्रदूषणाचा विळखा

## पालिका प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष

। खेड । प्रतिनिधी ।

जगबुडी नदीकिनारी शासकीय जागेत मोठ्या प्रमाणात अनधिकृत झोपड्या उभ्या राहिल्या आहेत. निसर्गसौंदर्य लाभलेल्या या नदीकिनाऱ्याला बकाल स्वरूप प्राप्त झाले आहे. या किनाऱ्यावरच पालिकेचे मटणमार्केट असून, त्यातून निर्माण होणारा ओला व सुका कचरा येथेच फेकला जातो. त्यामुळे जगबुडी नदीकिनाऱ्यावर अस्वच्छता पसरली आहे. मात्र याबाबत पालिका प्रशासन अक्षम्य दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे.



मच्छीमार्केट इमारत उपलब्ध असतानाही बंदरमार्गाच्या दुतर्फा दररोज मासळी बाजार भरत असून, या मार्गाने ये-जा करणाऱ्या पादचारी व वाहनचालकांना अडथळा शर्यत पार करावी लागते. जगबुडी किनाऱ्यावर अस्वच्छता, आरोग्यासाठी हानिकारक कचरा, अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे यांचा वाढता विळखा चिंतेची बाब आहे. जगबुडी नदीवरील भोस्ते पुलालगत पालिकेने गणेश विसर्जन घाट व प्रेक्षक गॅलरी लाखो रुपये खर्च करून उभारून किनाऱ्याचे सुशोभीकरण केले आहे; मात्र या गणेशघाटापासून अवघ्या काही फूट अंतरावर असलेल्या अनधिकृत झोपडपट्ट्या व त्यामधून बाहेर पडून उघड्यावर शौचास बसतात. स्वच्छता अभियान राबविताना केवळ काही दिवसांकरिता दाखविलेला सुज्ञपणा प्रशासन व नागरिकांनीदेखील सोडून दिल्याचे निदर्शनास येत आहे. नदीकाठी पडलेला कचरा याची साक्ष देत आहे. पालिका प्रशासनाने मच्छी-मटणमार्केट उभारण्यासाठी लाखो रुपये खर्च केले आहेत; मात्र त्या इमारतीत मासे विक्रेत्यांना बसविण्यात पालिका प्रशासन अपयशी ठरले आहे.

मासळी खरेदीसाठी येथे येणारे याच मार्गाच्या दुतर्फा बेशिस्तपणे वाहने उभी करत असल्याने येथे वाहतुकीची कोंडी झालेली दिसते, तर ग्राहकांची मासळी येथेच विक्रेते साफ करत असल्याने या ठिकाणी दुर्गंधी पसरलेली असते.

# औषधाच्या नावाखाली दारूची तस्करी

। पालघर । प्रतिनिधी ।

पालघरमध्ये औषधांच्या नावाखाली दारूची तस्करी सुरु असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी तलासरी पोलिसांनी कारवाई करत या तस्करीचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईमध्ये २६.२८ लाखांचा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई मुंबईअहमदाबाद महामार्गावर करण्यात आली आहे.



पालघर जिल्ह्यात अंमली पदार्थांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेअंतर्गत तलासरी पोलिसांनी अवैध दारू वाहतूक करणाऱ्या आरोपीवर कारवाई केली आहे. महामार्गावरुन मुंबईकडे जाणाऱ्या टाटा टेम्पोमधून औषधांच्या नावाखाली औषधांच्या नावाखाली महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या दारूची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. हिमाचल-पंजाब ढाबा परिसरात टेम्पोची तपासणी केली असता, ९ लाख २८ हजार ३२० रुपयांची दारू आढळून आली. वाहनासह एकूण २६.२८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी चालक शिवेंद्रकुमार लालबाबु ठाकुर (वय ४१, रा. मुंबई) याला अटक करण्यात आली आहे.

# नागरिकांसाठी अग्निसुरक्षा प्रशिक्षण

। मुंबई । प्रतिनिधी ।

मुंबई अग्निशमन दलाने प्रोजेक्ट मुंबईच्या भागीदारीत, 'अग्नि रक्षक, मेकिंग मुंबई फायर सेफ' हा एक अनोखा नागरिक स्वयंसेवक कार्यक्रम सुरू केला आहे. मुंबईकरांना अग्निसुरक्षेबद्दल जागरूकता आणि प्रथमोपचारासाठी सज्जतेचे प्रशिक्षण देणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. 'मुंबई क्लायमेट वीक २०२६' या उपक्रमांतर्गत नागरिकांसाठी मोफत अग्निसुरक्षा प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये नागरिकांना थेट आघाडीच्या तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळाले. सहभागींना आग प्रतिबंध, सुरक्षा प्रोटोकॉल, आपत्कालीन प्रतिसादाची मूलभूत माहिती आणि सज्जतेच्या उपायांवर संरचित प्रशिक्षण देण्यात आले. या कार्यक्रमाचा उद्देश नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत प्रभावीपणे प्रतिसाद देण्यासाठी आवश्यक ज्ञान आणि व्यावहारिक कौशल्ये देऊन सक्षम करणे आणि आपत्ती टाळण्यास मदत करणे आहे. यात नागरिक स्वयंसेवक, गृहनिर्माण संस्थांचे प्रतिनिधी, कॉर्पोरेट स्वयंसेवक, विद्यार्थी आणि समुदाय नेते व गट यांचा सहभाग होता.



## नियोजनासाठी २५ समित्यांची स्थापना | पूर्वतयारीचा विभागीय आयुक्तांनी घेतला आढावा

# हिंद-दी-चादर कार्यक्रमासाठी प्रशासन सज्ज

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त आयोजित 'हिंद दी चादर' या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी शुक्रवारी (दि.६) सविस्तर आढावा घेतला. या ऐतिहासिक व प्रेरणादायी कार्यक्रमाच्या आयोजनात कोणत्याही त्रुटी राहू नयेत, यासाठी प्रशासनाने दक्षतेने व समन्वयाने काम करावे, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.



कोकण विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित आढावा बैठकीला रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, अपर आयुक्त फरोग मुकादम, उपायुक्त विजय म्हसाळ, पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते, रश्मी करंदीकर, नियोजन उपायुक्त प्रमोद केंभावी, या कार्यक्रमाचे राज्य समन्वयक उपजिल्हाधिकारी (रोहयो) रविंद्र राठोड यांच्यासह कोकण विभागातील महसूल, शिक्षण, आरोग्य, महानगरपालिका, पोलीस विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. जेएनपीए आणि सिडकोचे अधिकारी दूरदृष्यप्रणालीव्दारे या बैठकीस उपस्थित होते.

आढावा बैठकीत कार्यक्रमाची एकूण रूपरेषा, जनजागृती, प्रभात फेऱ्या, विद्यार्थी व युवकांचा सहभाग, मुख्य सोहळ्याचे नियोजन तसेच कायदा-सुव्यवस्था, वाहतूक, सुरक्षा, स्वच्छता व आरोग्य सुविधांबाबत सविस्तर चर्चा झाली. 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त खारघर, नवी मुंबई येथे २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या ऐतिहासिक सोहळ्याच्या यशस्वीततेसाठी जिल्हा प्रशासनाने व्यापक तयारी सुरू केली आहे. कार्यक्रमाच्या सुयोग्य नियोजनासाठी शासकीय अधिकारी, गुरुद्वारा प्रशासन तसेच विविध समाजघटकांच्या सहभागातून तब्बल २५ समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. कार्यक्रमाच्या माध्यमातून श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा त्याग, शौर्याचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवावा, असे आवाहन आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी यावेळी केले. नागपूर व नांदेड येथे हा समागम यशस्वीरित्या पार पडला असून, खारघर येथे होणाऱ्या या ऐतिहासिक कार्यक्रमासाठीही अत्यंत शिस्तबद्ध आणि सूक्ष्म नियोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही, याची विशेष काळजी घेऊन कार्यक्रम शिस्तबद्ध, शांततापूर्ण व उत्साहात पार पाडावा, यासाठी सूक्ष्म नियोजन करावे. तसेच सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून जबाबदारीने काम करावे, प्रत्येक विभागाने प्रचार व प्रसाराचे नियोजन करावे, असे निर्देशही त्यांनी सर्व यंत्रणांना दिले. 'हिंद दी चादर' कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक ऐक्य, सद्भावना व ऐतिहासिक मूल्यांची जाणीव निर्माण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी हिंद दी चादर कार्यक्रमाच्या अनुषंगाने केलेल्या तयारीबाबत सविस्तर माहिती दिली.

---

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

९ फेब्रुवारी

१)श्री.राजेश अनंतराव पंड्या अलिबाग ०९-०२-१९५६

२)श्रीम.पद्मिनी संजय पावशे चेंढरे- अलिबाग ०५-०२-१९५१

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**

कु. अनिश सुनिल पाटील
वाढदिवस अलिबाग

# अंगणवाडी सेविकांचा गौरव

। ठाणे । प्रतिनिधी ।

रमाबाई भीमराव आंबेडकर जयंतीनिमित्त ठाण्यात अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृती प्रतिष्ठान, खोज फाउंडेशन व गौतम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात सुमारे २०० अंगणवाडी सेविका व मदतनीस भगिनींचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. बालकांचे पोषण, आरोग्य, शिक्षण व संस्कार या मूलभूत बाबींची जबाबदारी खांद्यावर घेऊन समाजाचा पाया मजबूत करणाऱ्या अंगणवाडी सेविकांचे कार्य अनेकदा दुर्लक्षित राहते. अत्यल्प मानधनात, प्रतिकूल परिस्थितीतही या सेविका प्रामाणिकपणे आपले कर्तव्य बजावत असतात. त्यांच्या या सेवाभावाची दखल घेऊन त्यांना सन्मानित करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमामुळे अंगणवाडी सेविकांच्या कार्याची समाजात अधिक ठळक दखल घेतली जाईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

---

## निवडक

### किरकोळ वादातून दोन कुटुंबात हाणामारी

**रत्नागिरी** : रत्नागिरी शहरातील हिंदू कॉलनी येथे किरकोळ वादातून दोन कुटुंबात हाणामारी झाली. ही धक्कादायक घटना बुधवारी (दि.४) रात्रीच्या सुमारास घडली. खालीद करीम मजगांवकर (३५) आणि त्यांच्या पत्नी सना मजगांवकर या दांपत्याला त्यांच्याच इमारतीत राहणाऱ्या हनिप मेमन याने घरात घुसून रॉडने मारहाण केली, अशी तक्रार शहर पोलिसांत दाखल करण्यात आली आहे. या हल्ल्यात मजगांवकर पती-पत्नी जखमी झाले असून त्यांच्यावर तातडीने जिल्हा शासकीय रूग्णालयात उपचार करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच दोन्ही बाजूंच्या नातेवाईकांनी आणि समर्थकांनी जिल्हा रूग्णालयात मोठी गर्दी केली होती. ज्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून शहर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी आणि रूग्णालयात धाव घेतली. पोलिसांनी जमावाला पांगवून परिस्थिती नियंत्रणात आणली.

### जुन्या दरानेच आकारणार घरपट्टी

**चिपळूण** : चिपळूण शहरातील नागरिकांना करवाढीचा तितकासा चटका न देता नगर परिषदेचा २०२६-२०२७ सालचा १६४ कोटीचा अर्थसंकल्प राहणार आहे. यावर बुधवारी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. गेल्या काही वर्षापासून गाजत असलेला घरपट्टीच्या विषयावर चर्चा करताना जुन्या दरानेच घरपट्टी आकारणीचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. मात्र पाणी विभागासाठी नाममात्र करवाढ करण्यात येणार आहे. नगर परिषदेची निवडणूक झाल्यानंतर बुधवारी नगराध्यक्ष उमेश सकपाळ यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीत मुख्याधिकारी संजय जाधव यांच्या उपस्थितीत स्थायी समितीची पहिलीच बैठक डिबीजे महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडली. १६४ कोटीच्या अर्थसंकल्पावर चर्चा झाली. यातील १५६ कोटी खर्च, ८ कोटीचा शिलकी अर्थसंकल्प असणार आहे. हा अर्थसंकल्प आता मुख्य सभेपुढे ठेवला जाणार असून येथे मंजुरी मिळाल्यानंतर तो पुढील मंजुरीसाठी जिल्हाधिकारी मनुज जिंदल यांच्याकडे जाणार आहे. अर्थसंकल्पाचा विचार करता नळ कनेक्शन बंद करण्यासाठी २५० ऐवजी ३०० रुपये, नळ कनेक्शन दुरुस्तीसाठी ७५० ऐवजी ९०० रुपये, नळकनेक्शन जागा बदलण्यासाठी १००० ऐवजी ११०० रुपये, नळकनेक्शन नाव दुरुस्त करण्यासाठी यापूर्वी कोणतेही शुल्क घेतले जात नव्हते. मात्र आता व्यापाऱ्यांना २०० रुपये, घरगुती नळकनेक्शन धारकांना १५० रुपये कर द्यावा लागणार आहे. हा नाममात्र कर वाढवताना घरपट्टी मात्र जुन्या दरानेच आकारण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

### गावठी दारूसह आरोपी ताब्यात

**रत्नागिरी** : संगमेश्वर तालुक्यातील निवे बुद्रुक येथील गुरववाडी परिसरात देवरुख पोलिसांनी मोठी कारवाई करत एका हातभट्टी दारू विक्रेत्याला रंगेहाथ पकडले आहे. बुधवारी (दि.५) सकाळी ११:१६ वाजताच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. आरोपीच्या राहत्या घरामागील लाकडी खोपीत लपवून ठेवलेली ५ लिटर गावठी हातभट्टीची दारू पोलिसांनी जप्त केली असून, आरोपीला अटक करण्यात आली आहे. देवरुख पोलिसांनी मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे निवे बुद्रुक, गुरववाडी येथील सचिन राजाराम इप्ते (४३) याच्या घराजवळच्या परिसरात छापा टाकला. त्यावेळी आरोपी सचिन इप्ते हा बेकायदेशीरपणे आणि कोणताही परवाना नसताना गावठी हातभट्टीची दारू विक्री करण्याच्या उद्देशाने ती आपल्या ताब्यात बाळगून असल्याचे आढळून आले. या कारवाईत पोलिसांनी ५ लिटर गावठी हातभट्टीची दारू जप्त करण्यात आली. अधिक चौकशी केली असता आरोपी सचिन राजाराम इप्ते याने ही दारू अनधिकृतपणे विक्रीसाठी ठेवली असल्याचे निष्पन्न झाले.

### महिलेच्या बॅगेतून रोकड चोरीला

**चिपळूण** : चिपळूण बस स्थानकावर प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेत एका अज्ञात चोरट्याने महिलेच्या बॅगेतून ५ लाख रुपयांची रोकड चोरून नेली. फिर्यादी प्रज्ञा प्रशांत हरेकर (वय ३८, रा. मुंडे तर्फे सावर्डे, पोरनाकवाडी, ता. चिपळूण) या गुरुवारी (दि.५) दुपारी ३:४० च्या सुमारास चिपळूण ते वीरबंदर या बसमध्ये चढत होत्या. यावेळी बस स्थानकावर असलेल्या गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने लबाडीच्या इराद्याने त्यांच्या पाठीवरील काळ्या रंगाच्या सॅकची चैन हळूच उघडली. सॅकमध्ये ठेवलेली मोठी रोकड फिर्यादीच्या नकळत काढून घेऊन चोरटा पसार झाला. बसमध्ये बसल्यानंतर काही वेळाने बॅगेची चैन उघडी असल्याचे प्रज्ञा यांच्या लक्षात आले, मात्र तोपर्यंत चोरटा तेथून निसटला होता. दिवसाढवळ्या घडलेल्या या धाडसी चोरीमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

### पाण्याच्या डबक्यात पडून चिमुकलीचा मृत्यू

**ठाणे** : दिवा येथील शिळफाटा परिसरात सहा वर्षांच्या चिमुकलीचा पाण्याच्या डबक्यात पडून मृत्यू झाला. ही घटना शनिवारी उघडकीस आली असून या घटनेने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. या प्रकरणी डायघर पोलीस ठाण्यात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. दिवा येथील शिळफाटा परिसरातील आशना हाईट्स येथे कशफ नबीला खान (६) ही रहात होती. शुक्रवारी संध्याकाळी ही चिमुरटी आपल्या मित्रांसोबत घराशेजारील परिसरात खेळत होती. खेळता-खेळता ती परिसरात सुरू असलेल्या एका बांधकामस्थळाजवळ गेली. त्या ठिकाणी एक खड्डा होता. शिवाय त्यात पाणी ही भरले होते. त्यात ती खेळता खेळता पडली. उशीरापर्यंत कशफ घरी आली नाही म्हणून कुटंबीयांनी सर्वत्र शोधाशोध सुरू केली. परंतु, ती न सापडल्याने अखेर तिच्या कुटंबीयांनी डायघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलीस आणि अग्निशमन दलाचे अधिकारी हे घटना स्थळी पोहोचले. त्यांनी तिची शोधाशोध सुरू केली. त्याच वेळी तिथे असलेल्या डबक्यात ही शोध घेण्यात आला. त्यावेळी कशफचा मृतदेह त्या डबक्यात आढळून आला. पोलिसांच्या उपस्थितीत मृतदेह बाहेर काढून पुढील वैद्यकीय तपासणीसाठी कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात पाठवण्यात आला. या प्रकरणी डायघर पोलीस पुढील तपास करत आहेत. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### मेडिकल विद्यार्थी ठरला देवदूत

**मुंबई** : गोवा-मुंबई इंडिगो विमान प्रवासादरम्यान वसईच्या डॉ. आर्यन लोलयेकर याच्या प्रसंगावधानामुळे एका सहप्रवाशाचा जीव वाचला. पालघर जिल्ह्यातील वेदांत मेडिकल कॉलेजचा अंतिम वर्षाचा विद्यार्थी असलेल्या डॉ. आर्यन याने विमानातच तातडीने उपचार करून आपले कर्तव्य बजावले. ३ फेब्रुवारी रोजी मुंबईकडे निघालेल्या विमानात एका प्रवाशाला श्वास घेण्यास तीव्र त्रास होऊ लागला. क्रू मेंबर्सच्या आवाहनानंतर डॉ. आर्यन यांनी रुग्णाची तपासणी करत रक्तातील साखर झपाट्याने कमी होत असल्याचे ओळखले. त्यांनी त्वरित प्रथमोपचार करत आपत्कालीन विमानात उपलब्ध असलेल्या आपत्कालीन ऑक्सिजन सिलिंडरचा वापर करून रुग्णाला कृत्रिम श्वासोच्छ्वास देण्यात आला. डॉ. आर्यन यांच्या या तत्परतेमुळे काही वेळातच रुग्णाची प्रकृती स्थिर झाली. त्यानंतर सुमारे ४५ मिनिटांच्या प्रवासानंतर विमान मुंबई विमानतळावर सुरक्षित उतरले. तिथे इंडिगोच्या ग्राउंड स्टाफने रुग्णाला पुढील उपचारांसाठी तातडीने रुग्णालयात हलवले.

# पनवेल टोल नाक्यावर राडा

## वाहतूक कोंडी असतानाही वसुली सुरू; वाहनधारकांची नाराजी

। पनवेल । प्रतिनिधी ।

काही दिवसापूर्वी मुंबई पुणे एक्सप्रेस-वे वर गॅसचा टँकर पलटी झाला होता. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. ही घटना ताजी असताना आता जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर वाहनांच्या रांगा लागल्यानंतर पनवेल टोल नाक्यावर राडा झाल्याची घटना समोर आली आहे. पनवेल टोल नाक्यावर २ किमी पेक्षा जास्त अंतरापर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. मात्र तरीही टोल वसुली केली जात असल्यानं वाहनधारक संतप्त झाले होते. वाहनधारकांनी रस्त्यावर उतरून निषेध केला. तसंच टोल नाक्यावर गोंधळही घातला. याचा व्हिडीओ आता व्हायरल होत आहे. गेल्या काही दिवसांपासून पुणे-मुंबई महामार्गावर होणाऱ्या वाहतूक कोंडीचा मुद्दा पुन्हा तापताना दिसत आहे. प्रचंड वाहतूक कोंडी असतानाही टोल नाक्यावर वसुली सुरू असल्यानं वाहनधारकांकडून नाराजीही व्यक्त केली गेली. आता पुन्हा वाहतूक कोंडी झाल्यानंतरही टोल नाक्यावर टोल आकारला जात असल्यानं प्रवाशांसह वाहनचालकांना जाब विचारला. यामुळे काही काळ तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं.पनवेल येथील शिडून टोल नाक्यावर दोन किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. मात्र, एवढी प्रचंड वाहतूक कोंडी असतानाही टोल वसुली सुरूच ठेवल्याने वाहनचालकांमध्ये तीव्र संताप पाहायला मिळाला. वेळेवर पोहोचण्याची घाई, अडकलेली वाहतूक आणि टोल प्रशासनाची भूमिका यामुळे वातावरण चिघळलं.



टोल नाक्यावर प्रवासी आक्रमक झाले होते. अनेक संतप्त वाहनचालक आपल्या वाहनांमधून खाली उतरले आणि त्यांनी रस्त्यावर येऊन आपला निषेध दर्शवला. या घटनेमुळे पनवेल टोल नाक्यावर काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. वाहनचालाकांनी संताप व्यक्त करत कॅमेऱ्यांची तोडफोड करण्याचाही प्रयत्न केला. कर्मचाऱ्यांशी वाद घालत टोल न घेता गाड्या सोडायला संतप्त प्रवाशांनी भाग पाडलं. वाहनांच्या इतक्या लांब रांगा लागल्या असतानाही टोल कसा घेता, असा संतप्त सवाल वाहनचालकांनी केला. वाहतूक कोंडीचा सामना करत असतानाही टोल भरावा लागत असल्याने चालकांमध्ये तीव्र नाराजी होती. यामुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला, तर टोल नाक्यावरील व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## बेलापूर परिसरात बिबट्याचा वावर

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

नवी मुंबईत खारघर हिलनंतर आता बेलापूर येथील सेक्टर आठ आणि सेक्टर नऊ परिसरात बिबट्याचे दर्शन झाले आहे. बुधवारी (दि.४) रात्रीच्या सुमारास बिबट्या रस्त्यावरून चालताना, पार्किंग परिसरात फिरताना आढळून आला. काही सतर्क नागरिकांनी याबाबत व्हिडिओ टिपून समाजमाध्यमांवर प्रसिद्ध केला. यानंतर बेलापूर सेक्टर आठ-नऊ परिसरात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाइल्डलाइफ वेल्फेअर असोसिएशनकडून जनजागृतीया घटनेनंतर वन्यप्राणी, पक्ष्यांसाठी काम करणाऱ्या वाइल्डलाइफ वेल्फेअर असोसिएशनकडून वन विभागासमवेत बिबट्या आढळून आलेल्या ठिकाणची पाहणी करण्यात आली.

# निवडक

## कामोठे परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** कामोठे परिसरात एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध कामोठे पोलीस करीत आहेत. सदर इसमाचे अंदाजे वय ४० वर्षे, सडपातळ बांधा, डोक्यावरील केस काळे, दाढी वाढलेली असून, उजव्या हातावर कालीमातेचे चिन्ह, तसेच डाव्या हातावर आर.बी.सी. असे इंग्रजीमध्ये गोंदलेले आहे. अंगात मरुण रंगाचा टी-शर्ट व त्यावर निळ्या रंगाच्या नक्षीचा शर्ट घातलेला आहे आणि फिक्कट निळ्या रंगाची जीन्स पॅन्ट परीधान केलेली आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी कामोठे पोलीस ठाणे किंवा सहा. पो.नि.प्रशांत तायडे यांच्याशी संपर्क साधावा.

## अशरफ याच्या नातेवाईकांचा शोध सुरू

**पनवेल :** अशरफ याचा आकस्मित मृत्यू झाल्याने त्याच्या नातेवाईकांचा शोध कामोठे पोलीस करीत आहेत. अशरफ (पूर्ण नाव माहित नाही) वय ४० वर्षे, अंगाने सडपातळ, डोक्याचे केस काळे, दाढी वाढलेली असून अंगात पिवळ्या रंगाचा टी-शर्ट व काळ्या रंगाची ट्रॅक पॅन्ट घातलेली आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी कामोठे पोलीस ठाणे किंवा सहा. पो.नि.प्रशांत तायडे यांच्याशी संपर्क साधावा.

## हजारांचे बूट नेले चोरून

**पनवेल :** अज्ञात चोरट्याने एका घराबाहेर रॅकमध्ये ठेवलेले ५२ हजार रुपये किमतीचे बूट चोरून नेले. ही घटना खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रजापती औरनाईट को-ऑपरेटिंग हाऊसिंग सोसायटी, सेक्टर १० (राजीव गांधी मैदानासमोर नवीन पनवेल) या सोसायटीतील रहिवाशाने त्यांच्या घराबाहेर शूज रॅकमध्ये महागडे बूट ठेवले होते. ते अज्ञात चोरट्याने चोरून नेले. याप्रकरणी या रहिवाशाने दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरोधात खांदेश्वर पोलिसांनी गन्हा नोंद केला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.




## माणगाव येथे मोफत दिव्यांग शिबीर

**माणगाव :** रायगड जिल्ह्यातील माणगाव येथे भारत विकास परिषद संचलित दिव्यांग पुनर्वसन केंद्र, पुणे (ट्रस्ट-नव भारत विकास फाउंडेशन) यांच्या वतीने मोफत दिव्यांग शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. या शिबिरामध्ये कृत्रिम मॉड्युलर पाय, हात व कॅलिपर बसविण्यासाठी दिव्यांगांची तपासणी करण्यात आली. एकूण १२३ दिव्यांग लाभार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला. शिबिराचे आयोजन रोटरी क्लब ऑफ पुणे, भारत विकास परिषद तसेच स्थानिक स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने करण्यात आले होते. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी दिव्यांग व वृद्धत्व केंद्रप्रमुख विनय खुटवळकर (पुणे) यांनी उपस्थित दिव्यांगांना आधुनिक कृत्रिम अवयवांबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच भविष्यात पात्र दिव्यांगांना कृत्रिम पाय व हात मोफत बसविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. या उपक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ पुणेचे प्रोजेक्ट कोऑर्डिनेटर आर्या पवार यांनी मार्गदर्शन केले. दिव्यांग बांधवांनी आवश्यक अर्ज करून या आधुनिक साधनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले. या शिबिराला माणगाव तालुक्यातील विविध स्वयंसेवी संस्था, कार्यकर्ते व नागरिकांची उपस्थिती लाभली. दिव्यांगांच्या जीवनात आत्मनिर्भरता व आत्मविश्वास निर्माण करणारा हा उपक्रम असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## दामोदर ठाकूर यांचे निधन

**अलिबाग :** पेण येथील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक दामोदर हशा ठाकूर यांचे वयाच्या ८९व या वर्षी अल्पशा आजारामुळे निधन झाले. प्राथमिक शिक्षक म्हणून त्यांनी ३८ वर्षे सेवा केली. त्यांच्या पश्चात मुलगा, सुन, नातू असा परिवार आहे. कर्जत, किकवी, रोहा, काळकाई, पळस, कातळावाडी, तिसे, लांडर, आमडोशी, पोलादपूर, कोडंवी, या शाळांवर शिक्षक म्हणून ज्ञानदानाचे कार्य त्यांनी केले आहे. त्यामुळे आज असंख्य विद्यार्थी इंजिनिअर, वकील, शिक्षक, पोलीस अधिकारी आदी वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत आहे. त्यांना संगीत, भजनाची फार आवड होती. धार्मिक कार्यासह सामाजिक कार्यातदेखील ते सक्रीय होते. दामोदर ठाकूर यांचे अल्पशा आजारामुळे नुकतेच निधन झाले. गावातील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक, पत्रकारिता, क्रिडा, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर मंडळी, नातेवाईक, मित्रमंडळींनी उपस्थित राहून त्यांना श्रध्दांजली अर्पण केली. दशक्रिया विधी १० फेब्रुवारीला पाली येथील उध्दव रामेश्वर येथे होणार आहे. उत्तरकार्य १४ फेब्रुवारीला खारपाले येथे राहत्या घरी होणार असल्याची माहिती ठाकूर कुटूंबियांकडून देण्यात आली.




## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- फर्निचर पॅकींगसाठी मुले पाहिजेत. शिक्षणाची अट नाही. ठिकाण- बामणसुरे, चोंढी, पगार- १२००० महिना, संपर्क : ९८२३५८५३२१
- कुरूळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क : ९६२३८४९३४९
- नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. रेस्टॉरंट मॅनेजर,रिसेप्शनिस्ट,कॉन्टिनेंटल,मेन्टेनन्स,वेटर, हाऊसकिपींग, रिसॉर्ट मॅनेजर (क्वालिटी कंट्रोल) १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- अलिबाग शहर येथील हॉस्पिटलच्या कामासाठी सिस्टर व मावशी यांची आवश्यकता आहे. संपर्क : ९८२२४०९८४९/९८५०३४८५०६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


## रस्तासुरक्षा स्पर्धेत तटकरे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश

। माणगाव । प्रतिनिधी ।

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरुड यांच्या वतीने व लायन्स क्लब ऑफ अलिबाग यांच्या सहकार्याने आयोजित राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाईन रस्ता सुरक्षा जनजागृती स्पर्धेत माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव (रायगड) येथील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले.



या स्पर्धेत पथनाट्य स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून सानिया जाधव, शाहिद मुल्ला, वैष्णवी पुजारी, श्रेयश मोरे, राज ओव्हाळ व सूरज रक्ते या विद्यार्थ्यांनी आपल्या सशक्त अभिनय, प्रभावी संवाद व सामाजिक आशयपूर्ण सादरीकरणाद्वारे परीक्षकांची मने जिंकली. तसेच भाषण स्पर्धेत प्रथम क्रमांक सीमा धनसे हिने, तर निबंध लेखन स्पर्धेत प्रथम क्रमांक शाश्वती महाडिक हिने मिळवून महाविद्यालयाचा नावलौकिक राष्ट्रीय पातळीवर पोहोचविला. याशिवाय पोस्टर मेकिंग स्पर्धेत द्वितीय क्रमांक रुतुजा सुतार हिने पटकावून आपल्या सर्जनशीलतेची छाप उमटवली.

ही सर्व यशस्वी कामगिरी महिला विकास कक्ष प्रमुख प्रा. वृषाली सलसकर, प्रा. स्वप्नील सकपाळ, प्रा. श्रावणी बक्कम तसेच सर्व समिती सदस्यांच्या मार्गदर्शनाखाली साध्य झाली. त्यांच्या प्रेरणादायी नेतृत्वामुळे विद्यार्थ्यांमध्ये रस्ता सुरक्षा विषयक सामाजिक जाणीव, जबाबदारीची भावना व कलागुणांना योग्य दिशा मिळाली. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एम. खामकर व उपप्राचार्य डॉ. आर. एम. आचार्य यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे तसेच मार्गदर्शक प्राध्यापकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले व त्यांच्या पुढील शैक्षणिक व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ''योग्य मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण मेहनत यांची सांगड घातली की उत्कृष्टतेचा जन्म होतो,'' असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.




## गजानन महाराज प्रगट दिन उत्साहात

। रोहा । प्रतिनिधी ।

रोहा येथे ज्ञानदेव चौधरी व भारती चौधरी यांच्या निवासस्थानी संत गजानन महाराज (शेगांव) यांच्या १४८ वा प्रगट दिन सोहोळा आध्यात्मिक व मोठ्या धार्मिक पद्धतीने पार पडला. हा प्रगटदिन सोहोळा गेली ३४ वर्षे नित्यनियमाने येथे साजरा केला जातो. रविवारी (दि.८) रोजी पहाटे ५.३० वाजता काकड आरती, सकाळी ७ वाजता श्रींच्या पादुकांची षोडशोपचार पूजा, सकाळी ९ वाजता विविध स्तोत्रे पठण व श्री गणपतीची आवर्तने, सकाळी १०.३० ते १२ वा.पालखी मिरवणूक, दुपारी १२-३०वा. आरती मंत्रपुष्प दुपारी १ ते ३ वाजता मिष्ठान्न महाप्रसाद आणि त्यानंतर हरिपाठ, श्री गजानन विजय ग्रंथ अध्याय वाचन झाले. सायंकाळी ७.३० वा. तीर्थप्रसादीचा कार्यक्रम. सकाळपासून दिवसभर श्री गजानन महाराज यांची गोड भक्तिमय गाणी, रंगीबेरंगी फुलांच्या माळा, आकर्षक रांगोळ्या व विद्युत रोषणाई परिसर सुशोभीत केला होता.

## घरफोडीत लाखोंचा ऐवज लंपास

। पनवेल । प्रतिनिधी ।

नवीन पनवेल, सेक्टर-१२ येथील एका बंद घरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून ८ लाख ११ हजारांचा ऐवज लांबवल्याची घटना घडली. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

प्रमोद कोरडे हे निवांत बंगला, सेक्टर १२, नवीन पनवेल येथे राहतात. त्यांच्या नातीचे लग्न असल्याने ते घर बंद करून चेंबूर (मुंबई) येथे लग्नाला गेले होते. घरात कोणीही नसल्याचा फायदा घेत चोरांनी त्यांच्या घरात प्रवेश केला आणि सोन्याचे दागिने, घड्याळ, रोख रक्कम असा ८ लाख ११ हजारांचा ऐवज चोरून नेला.

प्रमोद कोरडे हे घरी परतले असता हा प्रकार त्यांच्या निदर्शनास आला. त्यांनी तात्काळ याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. याबाबत पुढील तपास खांदेश्वर पोलीस करत आहेत.



पनवेल महानगरपालिकेच्या स्व मालकीचा देहरंग धरणाच्या बॅक वॉटर परिसरात मोठ्या प्रमाणावर पांढऱ्या फुलांची चादर पसरली आहे. या फुलांमुळे जलाशय परिसर अधिकच निसर्गमय दिसत आहे. बाजूला उभे असलेले हिरवेगार डोंगर आणि पाण्यावर तरंगणारी पांढरी फुले मन मोहून घेत आहेत. सकाळ-संध्याकाळी या परिसरात रम्य दृश्य पाहायला मिळत आहे. निसर्गप्रेमी नागरिकांसाठी हे दृश्य आकर्षण ठरत आहे. (छायाचित्र : राजेश डांगळे)

## रमाबाई आंबेडकर जयंती साजरी

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यामधील डिकसळ शांतीनगर येथे माता रमाबाई आंबेडकर यांची १२८ वी जयंती रमाबाई महिला मंडळाच्या वतीने साजरी करण्यात आली. माता रमाई आंबेडकर यांच्या फोटोला रमाबाई महिला मंडळाच्या संस्थापकीय अध्यक्ष हिराबाई हिरे यांनी पुष्पहर अर्पण केला. तर दीप प्रज्वलन अगरबत्ती प्रज्वलन शांताबाई गायकवाड, सुजाता गायकवाड, कमल ब्राह्मणे, शारदा वाघमारे यांनी केले. बुद्ध पूजा रेखा गायकवाड यांनी घेतली. यावेळी माता रमाबाई आंबेडकर यांच्या जीवनावर महिला मंडळाच्या अध्यक्षा अर्चना गायकवाड, विजया साळवी, सारीक हिरे, सोनाली वाघमारे, पूर्वा गायकवाड, तनुजा गायकवाड, रेखा गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. माता रमाबाई यांच्या आठवणींना उजाळा दिला.



माता रमाई आंबेडकर यांच्या महिला मंडळाच्या वतीने महिलांसाठी आणि मुलींसाठी विविध खेळ आयोजित करण्यात आले होते. त्यात संगीत खुर्ची, तळ्यात मळ्यात असे अनेक खेळ झाले. या खेळामध्ये भाग घेतला होता अशा सर्व विजेत्यांना बक्षीस देण्यात आले. महिला संगीत खुर्चीच्या प्रथम मानकरी भारती भोईर तर द्वितीय क्रमांक तनुजा गायकवाड यांनी पटकावला. लहान गटातील मुलींमधील संगीत खुर्चीच्या प्रथम मानकरी वृषाली सोनवणे, द्वितीय क्रमांक रुजिता चव्हाण यांना बक्षीस देण्यात आले.

## पार्वतीबाई काते यांचे निधन

**बोर्लीपंचतन :** बोर्लीपंचतन येथील पार्वती गणपत काते यांचे मंगळवारी (दि.३) अल्पशा आजाराने खुजारे येथील त्याच्या रहात्या निधन झाले. त्यांचे अंत्यसंस्कारांवेळी त्यांचे नातलग, ग्रामस्थ, बहुसंख्येने उपस्थित होता.



त्यांच्या पश्चात त्यांचे पती गणपत काते, तीन मुले संदेश, संदिप, जितेंद्र आणि मुलगी शितल खेडेकर, जावई, नातवंड, सुना, दीर असा मोठा काते परीवार आहे. त्यांचे दहावे विधी दि.१२ फेब्रुवारी रोजी दक्षीण काशी हरिहरेश्वर येथे होणार आहे. तर बारावे त्यांच्या रहात्या घरी खुजारे येथे होणार आहे.

## सायबर चोरट्याकडून लाखोंची फसवणूक

। पनवेल । प्रतिनिधी ।

व्हॉट्सॲपवर गॅस कनेक्सन कापले जाणार असल्याचा मेसेज पाठवून सायबर गुन्हेगाराने पनवेलमध्ये राहणाऱ्या शरदचंद्र प्रधान यांच्या डेबिट व क्रेडिट कार्डमधून २ लाख ७० हजार ७७२ रुपयांची रक्कम काढून त्यांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञात सायबर गुन्हेगाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

शरदचंद्र हे पनवेल येथे राहतात. त्यांना त्यांचे गॅस कनेक्शन रात्री कट करण्यात येणार आहे, असा व्हॉट्सॲपवर मेसेज आला. त्यावर मी पेमेंट केल्याचा त्यांनी मेसेज केला. त्यावर समोरच्या व्यक्तीने पेमेंट अपडेट झाले नसल्याने ते अपडेट करावे लागेल, असे व्हिडीओ कॉलवर सांगितले. त्यामुळे शरदचंद्र यांच्या मुलीने ते अपडेट करण्याची प्रक्रिया केली. त्यावर त्यांच्या व्हॉट्सॲपवर महानगर गॅसची डॉट एपीके फाईल पाठवून त्यावर १२ रुपये पाठवण्यास सांगितले आणि त्यांच्या डेबिट व क्रेडिट कार्डची डिटेल मागितले. त्यांनी क्रेडिट कार्डची डिटेल दिली. मात्र पेमेंट डिकलाईन होत असल्याचे सांगून दुसऱ्या कार्डची डिटेल्स मागितली. त्यांनी डेबिट कार्डची डिटेल्स समोरच्या व्यक्तीला दिली. त्यावर सायबर चोरट्याने शरदचंद्र प्रधान यांच्या दोन्ही एटीएम कार्डमधून २ लाख ७० हजार ७२२ रुपयांची फसवणूक केली.

'काला घोडा' आर्ट फेस्टिव्हलची सहल | विविध कलांचे प्रत्यक्ष दर्शन

# आदिवासी मुलांनी अनुभवले पुस्तकांपलिकडचे जग

। नेरळ । प्रतिनिधी ।

ग्रुप ग्रामपंचायत पोशीर हद्दीतील वारे -चिंचवाडी येथील ठाकर आदिवासी वाडीत सुरू असलेल्या 'वडाखालच्या शाळे'च्या विद्यार्थ्यांना पुस्तकांपलीकडचे जग अनुभवता यावे, त्यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळावी आणि आत्मविश्वास बळकट व्हावा, या उद्देशाने मुंबईत भरवण्यात आलेल्या 'कला घोडा आर्ट फेस्टिव्हल २०२६'ला नेण्यात आले. या चार दिवसांच्या शैक्षणिक सहलीमुळे आदिवासी भागातील मुलांसाठी शिकण्याचे नवे दालन खुले झाले.



३१ जानेवारी ते ८ फेब्रुवारी दरम्यान मुंबईतील ऐतिहासिक काळा घोडा परिसरात भरवण्यात येणारा हा कला महोत्सव आशिया खंडातील सर्वात मोठ्या कला महोत्सवांपैकी एक मानला जातो. दरवर्षी येथे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे कलाकार सहभागी होतात. चित्रकला, शिल्पकला, नाटक, नृत्य, संगीत, साहित्य, हस्तकला, छायाचित्रण, कार्यशाळा, बालकलाकारांसाठी विशेष उपक्रम अशा तब्बल ५०० हून अधिक कार्यक्रमांच्या माध्यमातून कला आणि संस्कृतीचा भव्य आविष्कार येथे अनुभवता येतो. या महोत्सवात सहभागी झालेल्या वडाखालच्या शाळेतील विद्यार्थ्यांना पहिल्यांदाच विविध प्रकारच्या कलांचे प्रत्यक्ष दर्शन घडले. रंगीबेरंगी चित्रप्रदर्शने, जिवंत शिल्पकला, रस्त्यावरील नाट्यप्रयोग, लोकनृत्य, संगीत मैफिली आणि सहभागी कार्यशाळांमधून मुलांना आपले विचार मोकळेपणाने व्यक्त करण्याची संधी मिळाली. कला ही केवळ पाहण्याची गोष्ट नसून, ती अनुभवण्याची, प्रश्न विचारण्याची आणि स्वतःला शोधण्याची प्रक्रिया आहे, हे या मुलांना प्रत्यक्ष अनुभवातून उमगले.

ग्रामीण व आदिवासी भागातील मुलांसाठी असा महोत्सव अत्यंत महत्त्वाचा ठरतो. विविध संस्कृती, वेगवेगळ्या विचारधारा आणि अभिव्यक्तीचे प्रकार जवळून पाहिल्यामुळे मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळाली. आपणही काहीतरी वेगळं करू शकतो हा आत्मविश्वास त्यांच्या मनात रुजला.

अनेक मुलांनी पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणावर कला आणि संस्कृतीचा अनुभव घेतल्याने त्यांच्यात कुतूहल, उत्सुकता आणि शिकण्याची ओढ वाढल्याचे दिसून आले.या निमित्ताने वडाखालच्या शाळेतील मुलांना चार दिवस छोट्या गटांमध्ये मुंबईला नेण्यात आले. या प्रवासात केवळ कला महोत्सवच नव्हे, तर महानगरातील जीवनशैलीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधीही त्यांना मिळाली. अनेक मुलांनी पहिल्यांदाच समुद्र पाहिला, स्वतः तिकीट काढून मेट्रोतून प्रवास केला, डबल डेकर बेस्ट बसमध्ये बसले.

यासोबतच भारतीय रिझर्व्ह बँकेला आतून भेट देत देशाची आर्थिक व्यवस्था समजून घेतली. दूरून का होईना मंत्रालय, विधान भवन आणि महानगरपालिका पाहून प्रशासनाची रचना आणि कामकाजाची माहिती मिळाली.

# शेतीत डिजिटल क्रांती!

## महाविस्तार एआयमुळे बाजारभाव एका क्लिकवर

**। रायगड । प्रतिनिधी ।**

शेतीमधील वाढती जोखीम कमी करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने महाविस्तार एआय हे क्रांतिकारी मोबाईल ॲप विकसित केले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करणारे हे ॲप शेतकऱ्यांसाठी एक विश्वासार्ह डिजिटल साथीदार ठरत असून, संपूर्ण महाराष्ट्रात याला मोठा प्रतिसाद मिळत आहे.

या ॲपमध्ये केवळ तांत्रिक माहितीच नाही, तर कृषी विभागाच्या विविध योजना, अनुदान, पीक विमा आणि अर्जाची स्थिती याबद्दलची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. आधुनिक शेती पद्धती आणि खत व्यवस्थापनाचे व्हिडिओ मार्गदर्शनही मराठीत उपलब्ध आहे.




भाजीपाला, फळपिके, कापूस, ऊस आणि कडधान्यांसाठी शास्त्रोक्त पद्धतीने शेती कशी करावी, याचे सविस्तर मार्गदर्शन ॲपमध्ये दिले आहे. गुगल प्ले स्टोअरवर मोफत उपलब्ध असलेले महाविस्तार एआय ॲप जास्तीत जास्त शेतकरी, महिला लाभार्थी व नागरिकांनी डाऊनलोड करून डिजिटल शेतीच्या नव्या युगाचा भाग व्हावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे. २०२६ हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. त्यानिमित्त महिला शेतकऱ्यांनी या तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करावा आणि आपली नोंदणी करावी, यासाठी कृषी विभागातर्फे विशेष मोहीम आणि प्रोत्साहन दिले जात आहे.

**पीकनिहाय मार्गदर्शन**

ॲपमध्ये भात, नाचणी, बाजरी, ज्वारी, कडधान्ये, तेलबिया, ऊस, कापूस, भाजीपाला, फळपिके व मसाला पिकांसाठी प्रमाणित कार्यपद्धती उपलब्ध आहेत. पूर्व मशागत, बियाण्यांची निवड, पेरणी, खत व पाणी व्यवस्थापन, कीड-रोग नियंत्रण, कापणी आणि साठवणूक याबाबत सविस्तर माहिती दिली आहे.


एआय तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेतकरी पिकांचे फोटो अपलोड करून कीड व रोगांचे निदान करू शकतात आणि त्यावर योग्य प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपायांची माहिती मिळवू शकतात. खत मात्रा गणकामुळे जमिनीचा प्रकार, क्षेत्रफळ आणि माती परीक्षण अहवालानुसार योग्य खतांचे प्रमाण सहज समजते.

**ॲपची प्रमुख वैशिष्ट्ये**

स्थानिक पातळीवरील हवामानाची रिअल-टाइम माहिती मिळाल्यामुळे पेरणी, कापणी आणि खत व्यवस्थापनाचे नियोजन करणे सोपे झाले आहे. शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी मराठी भाषेत संवाद साधणारा चॅटबॉट उपलब्ध आहे.

पिकावर पडलेल्या कीड किंवा रोगाचा फोटो अपलोड करताच एआय तंत्रज्ञानाद्वारे त्याचे निदान होऊन योग्य उपाययोजना सुचवल्या जातात. स्थानिक आणि राष्ट्रीय बाजारपेठेतील पिकांचे अद्ययावत दर शेतकऱ्यांना घरबसल्या समजतात

## मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक कोंडीचा मनस्ताप




**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

माणगाव व इंदापूर येथे शनिवारी (दि. ७) व रविवारी (दि.८) सलग दोन दिवस प्रवासी व पर्यटकांना वाहतूक कोंडीचा फटका बसला आहे. याच मार्गावर वाकण नाका येथे तसेच कोलाड येथे देखील मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला.

इंदापूर ते माणगाव येथे सतत वाहतूक कोंडी होत आहे. या दोन्ही ठिकाणी बाह्यवळण मार्गाचे काम अनेक वर्षांपासून खोळंबले आहे. परिणामी इंदापूर व माणगाव या गावातूनच वाहने जातात. येथील अरुंद रस्ता असल्यामुळे दोन्हीकडचे वाहनांना जाण्यास अडथळा निर्माण होतो आणि वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. शिवाय कोलाड या ठिकाणी फ्लायओव्हरचे काम सुरू आहे. तिथे देखील कोंडी होते. वाकण नाक्यावर देखील तिन्ही बाजूने वाहने येत असल्यामुळे कोंडी होते.

> **शनिवारी (दि. ७) नवी मुंबईवरून श्रीवर्धन येथे सहकुटुंब गावी जाण्यासाठी निघालो असता इंदापूर येथे तब्बल दोन तास वाहतुक कोंडीत अडकलो होतो. रविवारी (दि. ८) सायंकाळीदेखील तीच परिस्थिती होती. तेव्हाही वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला आणि तब्बल दोन तास वाहतूक कोंडीत अडकावे लागले. यामुळे हकनाक खूप त्रासाला सामोरे जावे लागले.**
>
> **प्रकाश मुद्राळे, नागरिक, बोर्लीपंचतन, श्रीवर्धन**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या कालखंडात मुंबई गोवा महामार्गावर अवजड वाहतुकीला बंदी असल्यासंदर्भात जिल्हा प्रशासनाने अधिसूचना जाहीर केली. पण याबाबत अंमलबजावणी केली नाही.

## श्रीवर्धनचा सीएनजी पंप एप्रिलमध्ये कार्यान्वित

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन एसटी आगारातील सीएनजी पंपाचे काम अंतिम टप्प्यात असून, हा पंप एप्रिल महिन्यात कार्यान्वित होणार असल्याची माहिती आगार प्रमुख महिबूब मणेर यांनी दिली. सीएनजी गॅसवर चालणाऱ्या एकूण ४० बस श्रीवर्धन आगारातून प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहेत. या बसेस प्रामुख्याने लांब पल्ल्याच्या तसेच ग्रामीण भागातील फेऱ्यांसाठी वापरण्यात येणार आहेत. पंपावर एका मशीनवर चार नॉझल असून, एकाच वेळी दोन बसमध्ये गॅस भरण्याची सुविधा उपलब्ध असेल.आगारातील सीएनजी बसची संख्या वाढल्यानंतर लांब पल्ल्याच्या, ग्रामीण भागातील तसेच माणगाव व महाडकडे जाणाऱ्या फेऱ्या वाढवाव्यात, अशी मागणी होत आहे.

### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री.अजय हरिश्चंद्र गायकवाड, श्री.अजित हरिश्चंद्र गायकवाड यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**

मौजे कडाव, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत

वरील शेतजमीन मिळकत सर्व्हे नं ९१/२ ब एकुण ०.२०.०० गुंठे क्षेत्र विकत घेणार आहेत. तरी शेतजमिन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १० दिवसाच्या आत लेखी पुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक ०९/०२/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमीन मिळकत ही या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. यशवंत गोविंद म्हसकर, रा. मु.पो. सासवणे, ता.अलिबाग, जि. रायगड, यांचेकडुन कायम खरेदीने विकत घेण्याचा माझे अशिलांचा मानस आहे. याकरिता सदर मिळकत विकत घेणेबाबत माझे अशिलांनी या मिळकतीचे विद्यमान मालकांशी तशी बोलणी केली आहेत व माझे अशील व श्री. यशवंत म्हसकर यांचेमधे रितसर साठेकरार देखील स्वाक्षरीत झालेला आहे. या मिळकतीबाबत मालकीहक्काचा शोध घेण्याचे काम मजकडे सोपवण्यात आले आहे.

**-: मिळकतींचे वर्णन :-**

| मौजे | ग.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|---|
| सासवणे | १३० | - | ०-०३-००<br>०-०१-८०<br>०-०४-८० | ०-७० |
| या मिळकतीमध्ये असलेले घर, ग्रामपंचायत सासवणे, घर नं. ९१३ हे १५० चौ.मी. क्षेत्राचे. | | | | |

सदर मिळकत ही पुर्णपणे निर्वेध व बोजारहित असुन या मिळकतीमधील आपले मालकी हक्क अबाधित आहे. तसेच सदर मिळकत ही आपले प्रत्यक्ष ताबे, कब्जा, वहिवाटीत आहे असा निर्वाळा मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

सबब, या मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाण, दान, लिज, लिन, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क अथवा हरकत असल्यास अथवा श्री. यशवंत गोविंद म्हसकर, यांचेसोबत माझे अशिल करत असलेल्या व्यवहारांस कोणाची काही हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्यासंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार खरेदीदारांचे वकील यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व विद्यमान मालकांना या मिळकती बाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर मागाहुन येणारी कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही, व या प्रकारे मागाहुन आलेली अशी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक देखील राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

हे सर्वांस कळविले.

अलिबाग
दिनांक : ७/०२/२०२६

सही/-
Cjayant Law Office
करीता
**ॲड. जयंत हरेश्वर चेऊलकर**
२०१, सृष्टी, २ रा मजला,
वेधशाळेसमोर, अलिबाग, रायगड

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस प्रस्तुत जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे आशिलांनी मौजे मुशेत तालुख अलिबाग जिल्हा रायगड येथील भुमापन क्रमांक व उपविभाग ३०/३/२ सर्व ऋणबोजेमुक्त अशी अकृषीक मिळकतीचे एकूण क्षेत्र १५२० चौरस मिटर मिळकत, जिल्हा परिषद अलिबाग, ग्राम पंचायत मुशेत सर्व ऋणबोजेमुक्त अशी खालील परिशिष्टात नमुद केलेली अकृषीक मिळकत (इथून पुढे 'सदर मिळकत' असा उल्लेख केला आहे. सदर मिळकत स्ट्रेटकोर रीअलिटी एल. एल.पी तर्फे भागिदार सायली प्रदीप राणे यांचेकडून खरेदीने घेण्याचे निश्चित केले आहे, सदर मिळकत स्ट्रेटकोर रीअलिटी एल.एल.पी तर्फे भागिदार सायली प्रदीप राणे यांच्या मालकी व कब्जेवहीवाटीची असून सदर मिळकतीकरीता दिनांक १२.११.२०१९ रोजी मा. जिल्हाधिकारी यांचेकडून अकृषक परवानगी घेण्यात आलेली आहे सदर मिळकतीचे भागाबाबत मालकी हक्क, बयाणा, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, लीन, जामीन, कुळ, भाडेकरू, वारसा हक्क देखभाल, लिव्ह ॲन्ड लायसेन्स, साठेकरार वा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास वा तसा दावा करणाऱ्या व्यक्तींनी, संस्था व संबंधितांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांचे आत आपले हक्क हितसंबंध विषद करून खालिल नमुद पत्यावर लेखी कळवावे, वरील नमुद मुदतीत कोणतीही हरक्त, दावा, तक्रार वा लेखी म्हणणे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून योग्य तो दस्त नोंदवून हक्क दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरक्त विचारात घेतली जाणार नाही व मुदतीनंतर घेतलेली हरकत आमचेवर व आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही, कळावे ही जाहिर नोटीस.

**परिशिष्ट**

**जमिनीचे वर्णन** : मौजे मुशेत तालुका अलिबाग जिल्हा रायगड येथील भुमापन क्रमांक व उपविभाग ३०/३/२ सर्व ऋणबोजेमुक्त अशी अकृषीक मिळकतीचे एकूण क्षेत्र १५२० चौरस मिटर मिळकत जिल्हा परिषद अलिबाग, ग्राम पंचायत मुशेत.

**दिनांक : ०९.०२.२०२६**

**कविता संदीप भोसले (वकील)**
केशव हाईटस्, बी विंग ९० फीट रोड
पारसिक नगर, कळवा, ठाणे ४००६०५
Email shreekrupabuilders@yahoo.com मोबाईल नं. ९९८७८०६०२२

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

सिडको
शहरांचे शिल्पकार

## CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.

## PUBLIC NOTICE

### OFFICE OF THE ARBITRATOR

**PRELIMINARY TOWN PLANNING SCHEME, NAINA NO. 12**

**(Vakadi, Umroli, Chinchavali tarf Vaje, Usarli Bk., Ritghar, Morbe, Kondale, Mahalungi)**

[under Section 72(7) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966]
[read with Rule 13(9) of the Maharashtra Town Planning Schemes Rules, 1974]
No. ARB/TPS-12/Preliminary/Award/2025/581

WHEREAS, the Draft Town Planning Scheme, NAINA No. 12 prepared by the Special Planning Authority, NAINA (CIDCO) for the part areas from villages Vakadi, Umroli, Chinchavali Tarf Vaje, Usarli Bk., Ritghar, Morbe, Kondale and Mahalungi of the Tahasil Panvel, Dist. Raigad has been sanctioned by the Vice Chairman & Managing Director, CIDCO under sub-section (2) of section 68 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter, referred to as the 'said Act') vide his Notification No. CIDCO/NAINA/TPS-12/Draft Scheme/2024/105; dated 8th July 2024, in exercise of the powers delegated to him by the Government in Urban Development Department vide its Notification No.TPS-1817/973/C-103/17/UD-13, dated 13th September, 2017. The said Notification is published in Maharashtra Government Gazette, Extraordinary; Part-II, dated 9th July 2024;

And whereas, the Government of Maharashtra in Urban Development Department has appointed Shri S. V. Surve, Retired Deputy Director of Town Planning as the Arbitrator for the said sanctioned Draft Scheme vide its Notification No. TPS-1224/1343/CR-78/24/TPS-12/UD-12; dated 7th August 2024 under sub-section (1) of Section 72 of the said Act;

And whereas, the Arbitrator, in accordance with Rule No. 13 (1) of Maharashtra Town Planning Schemes Rules, 1974 (hereinafter referred to as the 'said Rules') has declared under his notice dated 3rd October 2024 published in Maharashtra Government Gazette, Extraordinary; Part-II, dated 11th October 2024 and also in local Newspapers that, he has commenced the duties of the Arbitrator in respect of the said Town Planning Scheme, NAINA, No. 12 with effect from 3rd October 2024;

And whereas, the special notices in the form No. 4 prescribed under Rule No. 13(3) of the said Rules have been served on to each and every owner of the lands included in the said scheme and hearing of those who appeared before the undersigned have been taken by recording minutes thereof in this respect.

And whereas, after following the prescribed procedure, the said Town Planning Scheme, NAINA No. 12 has been sub-divided by the Arbitrator into Preliminary Scheme and the Final Scheme vide his declaration No. ARB/TPS-12/Sub-Dn/2025/572 dated 3rd June 2025 as provided under sub-section (3) of section 72 of the said Act;

And whereas, the Arbitrator has, after following the procedure prescribed under Rule No. 13 of the said Rules has carried out the duties laid down in sub-sections (4) and (7) of section 72 of the said Act.

Now, therefore, the undersigned as Arbitrator hereby declares that the Preliminary Town Planning Scheme, NAINA No. 12 has been drawn up within the prescribed time limit by him on 17th November, 2025 as provided under sub-section (7) of Section 72 of the said Act read with rule No. 13 (9) of the said Rules.

The Preliminary Scheme so drawn up by the undersigned has been published along with all its accompaniments and the copies thereof have been kept open for the inspection of the land owners and of the public during office hours at the offices of the Arbitrator and of the Special Planning Authority, NAINA at 7th floor, Tower No. 10, Belapur Railway Station Complex, CBD, Belapur, Navi Mumbai - 400614.

**Address :** NAINA Office ,
7th Floor, Tower No. 10,
CBD-Belapur, Navi Mumbai, 400614
Dated 17th November 2025.

S. V. Surve,
Arbitrator,
Town Planning Scheme, NAINA No. 12

## शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र मर्यादित

## जाहीर सूचना

### लवाद यांचे कार्यालय

**प्रारंभिक नगर रचना परियोजना, नैना क्र. १२**

**(वाकडी, उमरोली, चिंचवली तर्फ वाजे, उसर्ली (बुद्रुक), रिटघर, मोर्बे, कोंडळे, महालूंगी)**

(महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ७२(७) अन्वये)
(महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम, १९७४ च्या नियम क्र. १३(९) सहित)
लवाद/नरयो-१२/ प्रारंभिक निवाडा/२०२५/५८१

ज्याअर्थी, प्रारुप नगर रचना परियोजना, नैना क्र. १२, हि रायगड जिल्हाच्या पनवेल तालुक्यामधील मौजे वाकडी, उमरोली, चिंचवली तर्फ वाजे, उसर्ली (बुद्रुक), रिटघर, मोर्बे, कोंडळे, महालूंगी या गावांमधील काही भागांसाठी विशेष नियोजन प्राधिकरण नैना (सिडको) यांनी तयार केली असून ती उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, यांनी नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टीपीएस/१८१७/९७३/प्र.क्र.१०३/१७/नवि-१३, दिनांक १३/०९/२०१७ अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ६८ च्या पोटकलम (२) अन्वये त्यांची अधिसूचना क्र. सिडको/नैना/न.र.यो. १२/२०२४/१०५ दिनांक ८ जुलै २०२४ प्रमाणे मंजूर केली आहे. उक्त अधिसूचना ही **महाराष्ट्र शासन राजपत्रात** असाधारण भाग-२ वर दिनांक ९ जुलै २०२४ रोजी प्रसिध्द झालेली आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाने श्री सु. व. सुर्वे, निवृत्त उपसंचालक, नगर रचना यांची नेमणूक उक्त अधिनियमाच्या कलम ७२ च्या पोटकलम (१) प्रमाणे उक्त मंजूर प्रारुप परियोजनेसाठी लवाद म्हणून अधिसूचना क्र. टीपीएस-१२२४/ १३४३/ प्र.क्र.७८/२४/ नरयो-१२/ नवि -१२, दिनांक ७ ऑगस्ट २०२४ अन्वये केली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम क्र. १९७४ च्या नियम क्र. १३ (१) अन्वये **महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण, भाग-२ मध्ये दिनांक ११ ऑक्टोबर २०२४ रोजी आणि स्थानिक वृत्त पत्रात सूचना प्रसिद्ध करुन उक्त नगर रचना परियोजना क्र. १२, नैना करीता लवादीय कर्तव्ये पार पाडण्याचे काम दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ पासून सुरु केल्याचे निम्न निम्नस्वाक्षरीकार लवाद यांनी घोषित केले आहे.

आणि ज्याअर्थी, विहीत केलेल्या नमुना क्रमांक ४ मधील विशेष सूचना उक्त नगर रचना परीयोजनेमध्ये समाविष्ट झालेल्या सर्व जमीन मालकांना बजावण्यात आलेल्या असून निम्न स्वाक्षरीकार यांचे समोर उपस्थित झालेल्यांची या संदर्भातील सुनावणी पूर्ण करून त्याबाबतची टिपणे नोंदविण्यात आलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, विहित केलेली सर्व कार्यवाही पूर्ण करून उक्त नगर रचना परियोजना, नैना क्र. १२, हीची उक्त अधिनियमांच्या पोटकलम (३) कलम ७२ अन्वये लवाद/ नरयो-१२/विभागणी/२०२५/५७२ अन्वये दिनांक ३ जून २०२५ रोजी जाहीर केल्याप्रमाणे लवादांकडून प्रारंभिक परियोजना व अंतिम परियोजना अशी उपविभागणी करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त नियमांमधील नियम क्र.१३ प्रमाणे सर्व कार्यवाही पूर्ण करुन उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोटकलम (४) व (७) मधील कर्तव्ये पार पाडण्यात आलेली आहेत.

त्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, नगर रचना परियोजना, नैना क्र. १२, या परियोजनेचे लवाद म्हणून उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोटकलम (७) अन्वये तसेच उक्त नियमांच्या नियम क्र.१३ (९) प्रमाणे ही परियोजना दिनांक १७ नोव्हेंबर, २०२५ रोजी तयार करण्यात आली आहे असे जाहीर करीत आहेत.

ही प्रारंभिक परियोजना निम्नस्वाक्षरीकार, लवाद यांच्या कडून तयार करण्यात आल्यानंतर जनतेच्या तसेच या परीयोजनेत समाविष्ट झालेल्या जमीनींच्या मालकांच्या अवलोकनार्थ लवादांच्या व नैनाच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत, नैना कार्यालय, टॉवर नं. १०, सातवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन संकुल, सीबीडी बेलापूर- नवी मुंबई ४०० ६१४ येथे प्रसिध्द करण्यात आली आहे.


**पत्ता-:** नैना कार्यालय, टॉवर नं. १०,
सातवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन संकुल,
सी.बी.डी. बेलापूर- नवी मुंबई ४०० ६१४
**दिनांक:** १७ नोव्हेंबर, २०२५

**एस. व्ही. सुर्वे**
**लवाद,**
**नगर रचना परियोजना, नैना क्र.१२**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

**सिडको/जनसंपर्क/४८४/२०२५-२६**

# क्रिकेटची "अविट आणि आटीव" गोडी!



क्रिकेट या खेळाने या घडीला खूपच प्रगती केली आहे. क्रिकेट टी-२० क्रिकेट याचे मूर्तीमंत उदाहरण.२००७ मध्ये आयसीसी ने केलेला छोटेखानी टी ट्वेंटी क्रिकेटचा प्रयोग कमालीचा यशस्वी ठरला. फक्त आयसीसीच्या विश्वचषक स्पर्धा किंवा उभय देशांमधील मालिकांपुरता हा खेळ मर्यादित राहिला नाही. या खेळाने जनमानसात, नव्या पिढीमध्ये, तरुणाईत एवढं मानाचा स्थान मिळवल, की प्रत्यक्ष विश्वचषक स्पर्धे इतक्याच ट्वेंटी-ट्वेंटी क्रिकेटच्या विविध लीग स्पर्धा, त्यापेक्षा अधिक आकर्षक ठरल्या, गाजल्या. प्रचंड आर्थिक ओघ या क्रिकेटच्या दिशेने सुरू झाला. अपेक्षेपेक्षा अधिक पुरस्कर्ते या २०-२० क्रिकेटला लाभले. क्रिकेटच्या 'टीआरपी' मध्ये एवढी प्रचंड वाढ झाली की क्रिकेटचे प्रक्षेपण करणाऱ्या वाहिन्यानी प्रक्षेपणाचे हक्क मिळवण्यासाठी अक्षरश: खोऱ्याने पैसा ओतला. आणि त्यापेक्षा कितीतरी अधिक पटीत तो कमावलाही.

**विनायक दळवी**

पैशापलीकडे जाऊन विचार केला तर रेड बॉल क्रिकेटमध्ये नसलेल्या काही गोष्टी या क्रिकेटने दिल्या. म्हणजे सणासुदीला दिसणारे चौकार - षटकार अगदी मुबलक स्वरूपात प्रेक्षकांना पाहायला मिळाले. क्षेत्ररक्षण करताना सीमारेषेपलीके षटकार जाणारा चेंडू एका क्षेत्ररक्षकाने हवेत उडवून मैदानाच्या आत फेकून नंतर टिपण्यात आलेले थरारक झेल प्रेक्षकांच्या कायम स्मरणात राहिले. गोलंदाजांनी देखील आपले कसब अधिक धारदार केले आणि फलंदाजांनी, रिव्हर्स स्वीप पासून स्विच हिट पर्यंत अनेक नवीन नवीन प्रयोग केले आणि ते यशस्वी करून प्रेक्षकांना एक वेगळ्याच प्रकारची झिंग दिली.

फलंदाजी गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाड्यावर नवीन नवीन प्रयोग आणि प्रेक्षकांना चित्त थरारक अनुभव देणाऱ्या अनेक गोष्टी घडत असताना, तंत्रज्ञानाने देखील या क्रिकेटमध्ये अत्याधुनिकतेची विविधता प्रेक्षकांसमोर पेश केले अधिक सखोल सूक्ष्म चित्रीकरण करून प्रेक्षकांना हा खेळ अधिकाधिक जवळून दाखवण्याची किमया या तंत्रज्ञानाने केली. त्याचप्रमाणे खेळ अधिक सोपा व समजवा यासाठी स्टेडियम मध्ये साईड स्क्रीन आणणे. प्रेक्षकांना त्यांची छबी दिसणे अशा गोष्टी घडत गेल्या. आणि प्रत्येक वर्षी या प्रयोगांमध्ये नव्या नव्या अविष्कारांची भर पडत गेली.

पंचांना निर्णय अधिक सक्षमपणे आणि सुस्पष्टपणे देता यावा यासाठी देखील तंत्रज्ञान अधिक विकसित केलं गेलं. ड्रोन कॅमेरा पासून माईक कॅमेरा सीमारेषेनजीकचे कॅमेरे यांनी हा खेळ अधिक पारदर्शक आणि रोमहर्षक केला. सीमारेषेपलीकडे प्रेक्षकांना खेळवून ठेवण्यासाठी अनेक युक्त्या क्लूप्त्या लढविल्या गेल्या.

५० षटकांच्या क्रिकेट मधील चित्तथरारकता आणखी आटवली गेली. पिझ्झा आणि बर्गर च्या जमान्यातील क्रिकेट २० - २० षटकांच्या सामन्यात बंदिस्त करण्यात आले. तमाम क्रिकेट विश्व या क्रिकेटच्या अवताराकडे आत्ता एक उद्योग म्हणून पाहू लागले आहे.यजमान भारत क्रिकेटमध्ये फारशी ओळख नसलेल्या अमेरिकन संघाशी दोन हात करणार केले. मात्र अमेरिकेच्या या संघाने. भारताला विजय मिळविण्यासाठी घाम फोडला.

भारतीय क्रिकेट संघाने २००७ मध्ये, महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वाखाली,आयसीसी ची पहिली टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धा जिंकली होती. या स्वरूपाच्या क्रिकेटचं भवितव्य त्यावेळी अधांतरीच होतं मात्र भारताच्या यशाने टी-ट्वेंटी क्रिकेटचा वृक्ष झपाट्याने फोफावत गेला. आय पी एल सारखी क्रिकेट स्पर्धा या क्रिकेटला नवी आर्थिक दृष्टी देणारी ठरली.जगभरात आत्ता अशा लीगचे पेव फुटले आहे. २००७ च्या विश्वविजेत्या भारतीय संघातील एक प्रमुख खेळाडू रोहित शर्मा हाच सध्या भारतीय संघाचे नेतृत्व करीत आहे. २००७ च्या विश्व विजेत्या संघातील तो एकमेव खेळाडू अजूनही भारतीय संघातर्फे खेळत आहे. गत विश्वचषक विजेता संघाचा देखील तो कप्तान होता. भारतीय संघ आपलं विजेतेपद राखण्यासाठी या स्पर्धेत उतरत आहे. २०२६ च्या

"टी ट्वेंटी" विश्वचषकाचे रणशिंग मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर फुंकले गेले आहे.विजेतपद राखण्यासाठी भारताला मनात करावी लागणार आहे.अमेरिकन संघाने भारताला वेक अप कॉल दिला आहे.

टी २० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धा

# भारताची विजयी सुरूवात







**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

टी २० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेत भारताने आपल्या मोहिमेला विजयाने सुरुवात केली आहे. शनिवारी (दि.७ ) झालेल्या पहिल्या सामन्यात भारताने अमेरिकेविरुद्ध २९ धावांनी विजय मिळवला. त्यामुळे भारताने महत्त्वाचे २ गुण मिळवले आहेत. या सामन्यात भारताच्या गोलंदाजांकडून सांघिक कामगिरी पाहायला मिळाली. तसेच कर्णधार सूर्यकुमार यादवचाही मोलाचा वाटा उचलला. या सामन्यात भारताने अमेरिकेसमोर १६२ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना अमेरिकेला २० षटकात ८ बाद १३२ धावाच करता आल्या.

लक्ष्याचा पाठलाग करताना अमेरिकेकडून फारशी चांगली सुरुवात झाली नाही. दुसऱ्याच षटकात मोहम्मद सिराजने अँड्रिया गॉसला ६ धावांवर बाद केले. तिलक वर्माने त्याचा झेल घेतला. त्यानंतर पुढच्याच षटकात मोनांक पटेलला अर्शदीप सिंगने शून्यावर बाद केले. साईतेजा मुक्कामल्लालाही सिराजने २ धावांवर बाद केले. पण नंतर मिलिंद कुमार आणि संजय कृष्णमुकर्ती यांनी संघाला स्थिरता दिली. पण त्यांच्याकडून मोठे शॉट्स येत नव्हते. त्यांनी ५८ धावांची भागीदारीही केली.

अखेर त्यांची भागीदारी १२ व्या षटकात वरुण चक्रवर्तीने तोडली. त्याने ३४ चेंडूत ३ चौकार आणि १ षटकारांसह ३४ धावांची खेळी केली. त्यानंतर अक्षर पटेलने टाकलेल्या १६ व्या षटतकात अमेरिकेला दुहेरी धक्का बसला. त्याने संजयलाही ३७ धावावर आणि हरमीत सिंगला शून्यावर बाद केले. त्यानंतर अमेरिकेसाठी धावगती वाढली होती. मोहम्मद मोहसिनला ८ धावांवर अर्शदीप सिंगने बाद केले. तरी शेवटी शुभम रांजणेने आक्रमक खेळ केला, पण तोपर्यंत उशीर झाला होता. तो शेवटच्या चेंडूवर बाद झाला. त्याने २२ चेंडूत २ चौकार आणि ३ षटकारांसह ३७ धावांची खेळी केली. शाजली वॅन शाल्क्विक २ धावांवर नाबाद राहिला.भारताकडून मोहम्मद सिराजने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. अर्शदीप सिंग आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. वरुण चक्रवर्तीने १ विकेट घेतली.

तत्पुर्वी भारताने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ९ बाद १६१ धावा केल्या. भारताने सुरुवातीलाच अभिषेक शर्मा (०), इशान किशन (२०), तिलक वर्मा (२५), शिवम दुबे (०), रिंकू सिंग (६) आणि हार्दिक पांड्या (५) यांच्या विकेट्स लवकर गेल्या होत्या. त्यामुळे भारतीय संघ संकटात सापडला होता. पण सूर्यकुमार यादवने भारताच्या डावाला सावरले. त्याने ४९ चेंडूत १० चौकार आणि ४ षटकारांसह ८४ धावा केल्या आहेत.अमेरिकेकडून शॅडली वॅन शाल्क्विकने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या. हरमीत सिंगने २ विकेट्स घेतल्या. अली खान आणि मोहम्मद मोहसिन यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

# महेंद्र घरत यांच्या हस्ते राम पाटील चषकाचे उद्घाटन



**| चिरनेर | प्रतिनिधी |**

विनोद स्पोर्टस गावठाण तर्फे चिर्ले येथील राधेय मैदानावर रविवारी (दि.८) आयोजित करण्यात आलेल्या दिवंगत राम बाळू पाटील चषकाचे उद्घाटन काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी महेंद्र घरत यांनी पक्ष-पंथ बाजूला ठेवा, गावचा विकास महत्त्वाचा आहे. मैदान हा आपला हक्क आहे. दिबांचे कार्य अतुलनीय आहे. दि. बा. पाटील साहेब आपणा सर्वांची अस्मिता आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार हुतात्म्यांचे रक्त वाया जात नाही, जाऊ द्यायचे नसते. त्यामुळे मी हक्कांसाठी लढत आहे. एखादे काम मार्गी लावायचे असेल तर राजकीय इच्छाशक्ती असली पाहिजे. सध्याचे आमदार उरणमधील मैदानांसाठी पुढाकार का घेत नाहीत. जनतेने त्यांना जाब विचारायला हवा. सिडकोकडून गावांच्या विकासासाठी पाच टक्के निधी मिळणे गरजेचे आहे, पण अलीकडे तसे होताना दिसत नाही. तरुणांना नोकऱ्या उपलब्ध आहेत, परंतु अनेक ठिकाणी त्यांना डावलले जाते. मात्र असे असताना देखील मी वर्षाला साडेतीनशे नोकऱ्या देतो, असे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी उपस्थितांना सांगितले.

यावेळी विनोद म्हात्रे, समीर मढवी, युवा नेते मेघनाथ मढवी, राजेश पाटील, विजय मढवी, राकेश माळी, श्रीकांत पाटील, विकास पाटील, विवेक म्हात्रे, शनिदास म्हात्रे, विकास पाटील, पांडुरंग आप्पा चव्हाण यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# इटलीमध्ये विंटर ऑलिम्पिक प्रारंभ

**| मिलान | वृत्तसंस्था |**


विंटर ऑलिम्पिक २०२६ ची सुरुवात झाली आहे आणि सध्या मेक्सिकोच्या आई-मुलाच्या जोडीची, सारा श्लेपर (४७) आणि लासे फेडेरिको गॅक्सिओला (१८) यांची सर्वाधिक चर्चा होत आहे. विंटर ऑलिम्पिकच्या १०२ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच आई आणि मुलगा जगातील सर्वात मोठ्या क्रीडा मंचावर एकत्र स्पर्धा करताना दिसतील. ही जोडी या वर्षीच्या पाच सदस्यीय मेक्सिकन संघाचा भाग आहे.

सारा श्लेपरचे हे सातवे ऑलिम्पिक आहे, जो कोणत्याही महिला अल्पाइन स्कीअरसाठी एक विक्रम आहे. १९९८ मध्ये नागानो ऑलिम्पिकमधून आपल्या प्रवासाची सुरुवात करणाऱ्या साराने ४ वेळा अमेरिका आणि ३ वेळा मेक्सिकोचे प्रतिनिधित्व केले आहे.

१८ वर्षांच्या लासेचे हे ऑलिम्पिक पदार्पण आहे. लासेचे नाव दिग्गज नॉर्वेजियन चॅम्पियन लासे क्यूस यांच्या नावावरून ठेवण्यात आले आहे. लासे म्हणतात की, आम्ही या मंचावर एकत्र आहोत याचा अभिमान आहे.

सांगायचे म्हणजे, २०११ मध्ये जेव्हा साराने पहिल्यांदा निवृत्ती घेतली होती, तेव्हा तिने तिच्या शेवटच्या शर्यतीत ४ वर्षांच्या लासेला कडेवर घेऊन स्कीइंग केली होती. आता तोच छोटा मुलगा आईसोबत खांद्याला खांदा लावून स्पर्धा करत आहे.

अमेरिकेत जन्मलेल्या साराने १९९८ ते २०१० दरम्यान अमेरिकेसाठी ऑलिम्पिकमध्ये भाग घेतला होता. २०१४ मध्ये मेक्सिकन



- **९२ देशांचा सहभाग**
- **आई-मुलाच्या जोडीची चर्चा**

प्रशिक्षक फेडेरिको गॅक्सिओला यांच्याशी लग्न केल्यानंतर, तिने मेक्सिकोचे नागरिकत्व मिळवले. तेव्हापासून ती मेक्सिकन हिवाळी खेळांचा चेहरा बनली आहे आणि तिने मेक्सिकोकडून दोन हिवाळी ऑलिम्पिक खेळले आहेत.

मिलान आणि कोर्टिना दरम्यान हिवाळी ऑलिम्पिकची भव्य सुरुवात झाली. इतिहासात पहिल्यांदाच दोन वेगवेगळ्या ठिकाणी मशाली प्रज्वलित करण्यात आल्या. सॅन सिरो स्टेडियममध्ये ९२ देशांतील खेळाडूंनी संचलनात भाग घेतला.

यावेळी यूएईने २०२६ मध्ये पहिल्यांदाच पाऊल टाकले आहे. त्यांनी इस्काय दुबईफ सारख्या इनडोअर स्की केंद्रांमध्ये आणि युरोपमध्ये कठोर प्रशिक्षण घेऊन दोन खेळाडूंना तयार केले. तर भारताकडून स्तांजिन लुंदुप क्रॉस-कंट्री स्कीयरमध्ये आणि आरिफ खान अल्पाइन स्कीइंगमध्ये भाग घेत आहेत. अमेरिकेची स्कीइंग दिग्गज लिंडसे वॉन ४१ वर्षांच्या वयात निवृत्तीतून परतल्या आहेत.

माथेरान मैत्री ग्रुप आयोजित क्रिकेट स्पर्धा

# प्रमोद इलेव्हन बंड्या बॉईज विजेता



**| नेरळ | प्रतिनिधी |**

माथेरान येथील सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या मैत्री ग्रुपचे वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव निमित्त क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत प्रमोद इलेव्हन बंड्या बॉईज हा संघ अंतिम विजेता ठरला.

माथेरानमधील युवकांमध्ये क्रीडा भावना,एकता आणि मैत्री वृद्धिंगत व्हावी यासाठी मैत्री ग्रुप कार्य करीत आहे.माथेरान शहरात मैत्री प्रतिष्ठान ग्रुप मागील पाच वर्षांपासून छत्रपती शिवाजी महाराज चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करीत आहे.येथील हुतात्मा वीर भाई कोतवाल क्रीडा संकुलामध्ये तीन दिवसीय भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या क्रीडा स्पर्धेत माथेरान शहरामधील एकूण १६ संघ सहभागी झाले होते. अंतिम सामना प्रमोद इलेव्हन बंड्या बॉईज क्रिकेट संघ विरुद्ध गोल्डन स्टार क्रिकेट संघ यांच्यामध्ये रंगला. यात विजेतेपदाचा मानकरी प्रमोद इलेव्हन बंड्या बॉईज क्रिकेट संघ ठरला. बक्षीस वितरण सोहळ्यात मैत्री प्रतिष्ठानतर्फे माथेरानमधील सर्व लोकप्रतिनिधी यांचा सत्कार करण्यात आला.

या स्पर्धेसाठी उद्योजिका रेखा चौधरी, सामाजिक कार्यकर्त्या वर्षा शिंदे आणि नगरसेवक किरण पेमारे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. मैत्री प्रतिष्ठानच्या सर्व सहकाऱ्यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

# वेस्ट इंडीजचा स्कॉटलंडवर विजय

**| कोलकाता | वृत्तसंस्था |**

दोन वेळा विश्वविजेता ठरलेल्या वेस्ट इंडीज संघाने टी-२० विश्वकरंडकाची सुरुवात दणक्यात केली. हेटमायरची अर्धशतकी खेळी, रोमारियोच्या हॅट्ट्रिकसह पाच विकेट व जेसन होल्डरची प्रभावी गोलंदाजी हे विजयाचे वैशिष्ट्य ठरले. वेस्ट इंडीजकडून स्कॉटलंड संघासमोर १८३ धावांचे आव्हान होते. कर्णधार रिची बेरिंग्टन याने ४२ धावांची, टॉम ब्रुसने ३५ धावांची खेळी साकारत झुंज दिली. स्कॉटलंडच्या इतर फलंदाजांकडून सपशेल निराशा झाली. जेसन होल्डर याने ३० धावा देत तीन फलंदाज बाद केले. रोमारियो शेफर्ड याने २० धावा देत स्कॉटलंडचा निम्मा संघ गारद केला.

अंडर-१९ वर्ल्डकप स्पर्धा | बीबीसीसीआयने जाहीर केली कोट्यवधी बक्षिसाची रक्कम

# भारताचा विजेता संघ मालामाल

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारताच्या अंडर-१९ संघाने २०२६च्या विश्वचषकाचे जेतेपद पटकावले. कर्णधार आयुष म्हात्रेच्या नेतृत्त्वाखाली युवा टीम इंडियाने स्पर्धेत अपराजित राहत ट्रॉफी आपल्या नावे केली. अंतिम सामन्यात टीम इंडियाने इंग्लंडचा तब्बल १०० धावांनी पराभव करत एकतर्फी विजय मिळवला. यासह भारताने विक्रमी सहाव्यांदा अंडर-१९ विश्वचषक ट्रॉफीवर नाव कोरलं. या विजयानंतर बीसीसीआयने टीम इंडियासाठी कोट्यवधींची बक्षिसाची रक्कम जाहीर केली आहे.

भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना वैभव सूर्यवंशीच्या ८० चेंडूत १७५ धावांच्या खेळीच्या बळावर ४११ धावांचा डोंगर उभारला. भारताच्या इतर फलंदाजांनीही महत्त्वाचं योगदान दिलं. तर गोलंदाजीत टीम इंडियाच्या गोलंदाजांनी कमालीची गोलंदाजी करत इंग्लंडच्या फलंदाजांना फार काळ मैदानावर टिकू दिलं नाही आणि सामना १०० धावांनी जिंकला.

२०२६ चा १९ वर्षांखालील विश्वचषक जिंकल्याबद्दल बीसीसीआयने भारताच्या अंडर-१९ संघाला ७.५ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केलं. बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी एएनआयशी बोलताना सांगितलं की, २०२६ चा अंडर-१९ विश्वचषक जिंकल्याबद्दल संपूर्ण देश आणि बीसीसीआयला आमच्या अंडर-१९ संघाचा अभिमान आहे.

आमच्या संघाने अंतिम सामन्यात इंग्लंडला ज्या पद्धतीने हरवलं आणि स्पर्धेत ते ज्या प्रकारे अपराजित राहिले त्याचा आम्हाला सर्वांना अभिमान आहे. बीसीसीआय संघाला ७.५ कोटी रुपयांचे रोख बक्षीस देऊन सन्मानित करेल.

तत्पूर्वी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अंडर-१९ संघाच्या विश्वचषकातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल अभिनंदन केलं होतं, भारताच्या प्रतिभावान क्रिकेटपटूंची चमकदार कामगिरी! विश्वचषक मायदेशी आणल्याबद्दल अंडर-१९ संघाचा अभिमान आहे.

संपूर्ण स्पर्धेत संघ खूप छान खेळला, अपवादात्मक कौशल्य दाखवलं. या विजयामुळे अनेक तरुण खेळाडूंना प्रेरणा मिळेल. आम्ही खेळाडूंना त्यांच्या आगामी जीवनासाठी शुभेच्छा देतो.

भारतीय अंडर-१९ संघाने २०२६ चा आयसीसी अंडर-१९ विश्वचषक जिंकला, अंतिम सामन्यात इंग्लंड अंडर-१९ संघाचा १०० धावांनी पराभव केला आणि झिम्बाब्वेच्या हरारेमध्ये त्यांचे सहावे विजेतेपद पटकावले.

बीसीसीआयने, प्रत्येक स्तरावर विश्वविजेत्या संघाचा सन्मान करण्याची परंपरा बीसीसीआयने सुरू ठेवली. १९ वर्षांखालील संघाला बीसीसीआयने दिलेली ही आतापर्यंतची सर्वात मोठी बक्षीस रक्कम आहे. यापूर्वी, २०२५ मध्ये १९ वर्षांखालील महिला विश्वचषक जिंकणाऱ्या महिला संघाला बीसीसीआयने ५ कोटी रुपयांचे बक्षीस दिलं होतं.

# विकी ओस्तवालच्या अचूक गोलंदाजीने महाराष्ट्राला निर्णायक विजयाची संधी

**| पुणे | प्रतिनिधी |**



बीसीसीआयच्या वतीने मालपाडू येथे सुरू असलेल्या २३ वर्षांखालील गटाच्या कर्नल सी. के. नायडू करंडक साखळी क्रिकेट स्पर्धेत विकी ओत्सवालने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर महाराष्ट्राने आंध्र प्रदेश संघावर फॉलोऑन लादला त्यांचा पहिला डाव १८७ धावांत आटोपल्यानंतर दुसऱ्यादिवस अखेर दुसऱ्या डावात दोन बाद ५७ अशी अवस्था झाली आह.

मालपाडू येथील डीव्हीआर मैदानावर सुरू असलेल्या या सामन्यात महाराष्ट्राने पहिल्या डावात ४१६ धावा केल्या होत्या. त्यानंतर आंध्र प्रदेशचा पहिला डाव १८७ धावांत गुंडाळला गेला त्यात प्रमुख वाटा विकी ओस्तवालने सात गडी बाद करताना केलेल्या अचूक गोलंदाजीचा होता. आंध्र प्रदेशची सुरवात बिनबाद ४९ वरून चार बाद ७७ अशी झाली.

यानंतर मधल्या फळीतील एम. अभिनव आणि जीएसपी तेजा या जोडीने ९४ धावा जोडल्या. मात्र, ही जोडी फुटली आणि आंध्र प्रदेशचा डाव गडगडला. अवघ्या सोळा धावांत आंध्र प्रदेशचे अखेरचे सहा फलंदाज बाद झाले. त्यामुळे चार बाद १७१ वरून १८७ धावांवर संघाचा डाव आटोपला.

महाराष्ट्राने पहिल्या डावात २२९ धावांची आघाडी मिळवली. त्यामुळे महाराष्ट्राने फॉलोऑन लादण्याचा निर्णय घेतला. दुसऱ्या डावात दुसऱ्या दिवसअखेर २ बाद ५७ अशी आंध्र प्रदेशची स्थिती झाली. हे दोन्ही फलंदाज विकी ओस्तवालने बाद केले. डावाने पराभव टाळण्यासाठी आंध्र प्रदेशचा संघ अद्याप १७२ धावांनी पिछाडीवर आहे. सामन्याचे अजून दोन दिवस बाकी आहेत.

संक्षिप्त धावफलक

महाराष्ट्र सर्वबाद ४१६ विरुद्ध आंध्र प्रदेश सर्वबाद १८७

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)